पूर्व आणि पश्चिम



स्वामी विवेकानंद

पूर्व आणि पश्चिम

स्वामी विवेकानंद

अनुवादक :
स्वामी शिवतत्त्वानंद

रामकृष्ण मठ
नागपूर

प्रकाशक :
स्वामी ब्रह्मस्थानंद
अध्यक्ष, रामकृष्ण मठ
रामकृष्ण आश्रम मार्ग
धंतोली, नागपूर-४४० ०१२

श्रीरामकृष्ण-शिवानंद-स्मृतिग्रंथमाला
पुष्प १७

वर्ष १९५७ ते २००६ पर्यंत : २६,२५०
आठवे पुनर्मुद्रण : ३.७.२०१२
मुद्रित प्रती : ३०००

मुद्रक :
लक्ष्मी ऑफसेट, नागपूर

भूमिका

(प्रथम आवृत्ती)

आजकाल नाना कारणांनी आमची दृष्टी स्वत:कडे वळत आहे. पण आपण कोण आहोत, आपल्या राष्ट्रीय जीवनाचे उद्दिष्ट काय इत्यादींसंबंधी स्पष्ट, असंदिग्ध कल्पना फारच थोड्यांना असते. आपण खरोखर कोण आहोत, आपला राष्ट्रीय जीवनोद्देश काय आहे, आणि पाश्चात्त्य सभ्यतेतून काय घेतल्याने आपली प्रगती नि उन्नती होऊ शकेल, याचे विवेचन करून स्वामी विवेकानंदांनी काही लेख बंगालीत लिहिले होते, ते 'प्राच्य ओ पाश्चात्त्य' नामक पुस्तकाच्या रूपाने प्रसिद्ध झाले होते. 'पूर्व आणि पश्चिम' हा त्या मूळ ग्रंथाचा मराठी अनुवाद होय.

मूळ लेख स्वामीजींनी अगदी रोजच्या व्यवहारातील, घरगुती भाषेत लिहिले आहेत. मुळातील ती शैली आणि एकंदर वातावरण अनुवादातही आणण्याचा प्रयत्न केला आहे.

आम्हाला स्वत्वाची जाणीव व्हावी या हेतूने स्वामीजींनी हे तुलनात्मक पुस्तक लिहिले आहे. प्रभू करोत आणि प्रस्तुत पुस्तकाचा उद्देश सफल होवो.

नागपूर
दि. १५.६.१९५७

— **प्रकाशक**

पूर्व आणि पश्चिम

आजच्या भारताचे बाह्य रूप

दुथडी भरून खळखळत वाहणाऱ्या मोठमोठाल्या नद्या, त्यांच्या काठी नंदनवनाला लाजवितील अशी उपवने, त्या उपवनांमधे कारागिरीचे अपूर्व नमुनेच असे ऐश्वर्यशाली गगनचुंबी संगमरवरी महाल.

आणि –

त्यांच्याच आजुबाजूला, आगेमागे, मातीने लिंपलेली, कूड उघडे पडलेली, मोडक्या छपराची चंद्रमौळी खोपटी. चहूकडे सुकल्या शरीरांचो, लक्तरे गुंडाळलेली, युगायुगांची निराशा चेहऱ्यावर उमटलेली बाया – माणसे नि पोरी-पोरे. त्याच घोळक्यात अधेमधे तसलीच मरतुकडी, दीनवाणी जनावरे – हाडकुळ्या गाई-म्हशी-बैल. अन् सगळीकडे धूळ-माती-घाण.

असा आहे आमचा आजचा भारत.

हवेल्यांच्या उरावर पडकी खोपटी, देवळांच्या मांडीवरच घाणीचे ढीग, भपकेदार पोशाखाच्या जोडीलाच चिंध्या, आणि आकंठ तृप्तीच्या ढेकरांबरोबरच भुकेल्या, लसलसत्या अतृप्तीचे हताश उसासे –

ही आमची जन्मभूमी.

पाश्चात्त्यांच्या दृष्टीने आम्ही

प्लेग-कॉलऱ्याचा हैदोस, मलेरियाचा धुडगूस, उपास-फाके अगदी सवय जडण्याइतपत मुबलक, अधूनमधून दुष्काळाचे विक्राळ तांडव, रोग-शोकांचे रणमैदान, आशा-उद्यम-आनंद-उत्साहाच्या थडग्यांनी गजबजलेली स्मशानवट, आणि ह्याच साऱ्यांमध्ये केवळ मोक्षावर नजर खिळवून ध्यान

लावून बसलेले योगी – विलायती प्रवाशांच्या दृष्टीला भारतात हे दिसत असते.

शतकानुशतके स्वकीयांच्या आणि परकीयांच्या, स्वधर्मियांच्या आणि विधर्मियांच्या लाथांखाली तुडविले जाऊन निस्त्राण बनलेले; राबण्यात गुलामासारखे पटाईत, गुलामांसारखेच प्रयत्नपराङ्मुख; कसलीच आशा नाही, भूतकालाचा आसरा नाही, भावीकालाची ओढ नाही, वर्तमान जीवन 'येन केन प्रकारेण' फक्त 'जगू' इच्छिणारे; गुलामांना साजेलशा मत्सरी वृत्तीचे, स्वकीयांच्या उत्कर्षाने जळफळणारे; कशाविषयीच आस्था नसणाऱ्यांसारखे श्रद्धाहीन विश्वासहीन मनोवृत्तीचे; कोल्ह्यांसारखे कावेबाज नि कपटी, पराकाष्ठेचे आप्पलपोटे; बलिष्ठांचे पायचाटू आणि स्वत:परीस दुबळ्यांचे काळ; बलहीनांच्या नि आशाहीनांच्या ठायी आढळणाऱ्या हिडीस, वेडगळ समजुतींनी पछाडलेले, नीतीचा कणा नसलेले; मांसाच्या सडक्या तुकड्यांत वळवळणाऱ्या जंतूप्रमाणे भारतभर बजबज माजविणारे, मनुष्याचा नुसता आकार असलेले तीस कोटी प्राणी – इंग्रज अधिकाऱ्यांच्या दृष्टीतून हे आमचे चित्र!

आणि आमच्या दृष्टीतून त्यांचे – पाश्चात्त्यांचे?

आमच्या दृष्टीने पाश्चात्त्य

नवनव्या शक्तींच्या लाभाने माज चढलेले; भले काय व बुरे काय याची जाणीव नसलेले; हिंस्त्र श्वापदांसारखे भयंकर; स्त्रीलंपट, कामान्ध, मद्याने आपादमस्तक सदा भिजलेले; सदाचारांची पर्वा नाही की शुचितेची चाड नाही; जडवादी – केवळ जडावरच सारा भरवसा, संस्कृती-सभ्यता सारेकाही जडाच्याच मदतीने उभारणारे – निव्वळ भौतिक, वाटेल त्या मार्गाने दुसऱ्यांच्या देशाचा, दुसऱ्यांच्या धनाचा अपहार करणारे; परलोक, पुनर्जन्म सब झूट म्हणून धुत्कारणारे; देहालाच आत्मा समजणारे, देहाचे चोचले पुरविणे हेच जीवितसर्वस्व मानणारे – भारतीयांच्या दृष्टीने पाश्चिमात्य म्हणजे असले असुर!

परस्परांविषयी परस्परांच्या चुकीच्या कल्पना व त्यांचे कारण.

ही झाली दोन्ही पक्षातील वरवर पाहणाऱ्या, अजाण लोकांची मते.

विदेशी, युरोपियन लोक भारतात येतात, इथल्या शहरांतील सगळ्यात चांगल्या, स्वच्छ, निरोगी भागांमधे सुसज्ज, टोलेजंग बंगल्यांमधून राहतात, आणि इथल्या गावठी मोहोल्ल्यांची स्वत:च्या देशातील रेखीव उभारणीच्या नीटनेटक्या नगराशी तुलना करतात. भारतवासीयांशी त्यांचा संबंध येतो तो म्हणजे फक्त एका वर्गाशी – खाविंदांची नोकरी करणाऱ्यांशी. अन् दु:खदारिद्र्य तर खरोखरच भारतवर्षातल्याइतके दुनियेत आणखी कुठे नाही. धूळ, घाण सर्वत्र पडलेली असते हे तरी कोणत्या तोंडाने नाकबूल करायचे! असल्या घाणीत, असल्या गुलामीत, असल्या हीनतेत काही चांगले असणे शक्य आहे यावर बिचाऱ्या युरोपियनांचा विश्वास बसत नाही.

उलट भारतीयांच्या दृष्टीला पडते – बेटे शौचाला जातात तिथे पाणी वापरीत नाहीत, तिथून आल्यावर हातपाय धुण्याचे, चूळ भरण्याचे काम नाही; काय वाटेल ते खातात, शिवाशिव, विटाळचंडाळ म्हणून काही गोष्टच नाही; दारू ढोसतात अन् बायकांचे हात धरून नाच नाच नाचतात. ह्या साहेबांमधे काही चांगले असणे शक्य आहे? रामा शिवा गोविंदा!

ही दोन्ही मते आत न जाता, खोलात न शिरता, बाहेरून वरवर बघून बनविलेली आहेत. एकमेकांचे अंतरंग कुणालाच कळलेले नाही. आतली खबर एकालाही नाही. विदेशीयांना आम्ही आमच्या समाजात मिसळू देत नाही – त्यांना 'म्लेंच्छ' म्हणतो. तेही 'काला आदमी' म्हणून आमचा तिटकारा करतात.

प्रत्येक जातीचे जीवनोद्देश्य वेगवेगळे असते

दोन्ही मतांमध्ये सत्य अर्थात थोडेफार आहेच. परंतु एकानेही दुसऱ्याच्या अंतरंगाचा ठाव घेतलेला नाही.

प्रत्येक माणसाचा एक भाव – एक आदर्श – असतो. बाहेरून दिसणारा माणूस हा त्या आतील भावाचा केवळ बाह्य आविष्कार असतो. विचार आणि

भाषा यांचा जो संबंध, तोच ह्या दोहोंचा आहे. जसें व्यक्तीचे, तसेच जातीचेही. प्रत्येक जातीचा असा एकेक भाव असतो. हा भाव जगाचे काही कार्य साधीत असतो – जगताच्या स्थितीसाठी त्याची आवश्यकता असते. ज्या दिवशी जगाच्या स्थितीच्या दृष्टीने असलेली त्यांची ती तेवढी आवश्यकता संपेल, त्याच दिवशी तो भाव बाळगून असणारी व्यक्ती वा जात नाश पावेल. आम्ही भारतवासी जे इतके दु:ख, दारिद्र्य, घरच्यांचे-बाहेरच्यांचे इतके अत्याचार सोसूनही अजून तगून आहोत, त्याचा काही अर्थ आहे. आम्हा लोकांचा असा एक भाव आहे की जगाला अजूनही त्याची आवश्यकता आहे. असाच युरोपियनांचाही एक भाव आहे. त्याच्याखेरीज जगाचे भागणार नाही. म्हणूनच ते आज इतके प्रबळ आहेत. अगदीच शक्तिशून्य झाल्यास माणूस काय मग वाचू शकत असतो? जात म्हणजे व्यक्तींची गोळाबेरीज. अगदीच शक्तिहीन, क्रियाहीन झाल्यास जात काय वाचेल! हजार वर्षांच्या नानातऱ्हेच्या धामधुमीत आमची हिंदूंची जात मेली नाही ती का? आमचे आचारविचार जर इतके खराब, तर मग आम्ही एवढ्या अवधीत नामशेष कसे झालो नाही? तसले प्रयत्न विदेशी विजेत्यांनी कमी का केलेत? – आमचे निसंतान करण्यासाठी त्यांनी कोण जंग जंग पछाडले आहेत. तरीपण हिंदू सारे मरून खतम झाले नाहीत ते काय म्हणून? तसल्याच परिस्थितीत इतर मागासलेले, असभ्य देश झालेतच ना नेस्तनाबूत? मग तसले काही भारतात का घडू शकले नाही? हिंदू निर्वंश होऊन भारताची भूमी निर्मनुष्य का होऊन गेली नाही? लगेच विदेशीय येऊन शेतीभाती करून इथे छान नांदायला लागले असते – जसे अमेरिकत झाले आहे, आफ्रिकेत झाले आहे, ऑस्ट्रेलियात झाले आहे – अन् होत आहे तसे.

याचा अर्थ हाच की, विदेशीयांनो, तुम्ही स्वत:ला जितके बलवान समजता तितके तुम्ही नाही. तो तुमचा भ्रम आहे – निव्वळ तुमची तशी समजूत आहे. भारतातसुद्धा जोम आहे, राम आहे – पहिल्याप्रथम हे नीट समजून घ्या. आणि हेही समजून असा की जगाच्या सभ्यतेमध्ये भर

घालण्यासारखे आमच्यापाशी अजूनही काही आहे – आणि म्हणूनच आम्ही जिवंत आहोत. अन् हे तुम्हीदेखील चांगले समजून घ्या – तुम्ही, आत-बाहेर साहेब सजलेल्यांनो, आणि 'आम्ही नरपशू आहोत, हे युरोपियनांनो आम्हाला उद्धारा' म्हणून ओरडत फिरणाऱ्या स्वदेशियांनो; आणि तुम्हीही – 'येशू भारतात आले आहेत' म्हणून टिऱ्या बडविणाऱ्यांनो, नीट, नीट समजून घ्या. अरे बाबांनो, येशूही आले नाहीत अन् जिहोवाही आले नाहीत – येणारही नाहीत. ते बापडे सध्या आपले स्वतःचेच घर सावरण्यात गुंतले आहेत, त्यांना आमच्या या देशात यायला फुरसत आहे कुठे! आमच्या ह्या देशात आपला तोच बुड्ढा शिव ठाण मांडून बसला आहे, काली बळी मटकावत आहे अन् बन्सीधर बासरी फुंकत आहे. हा बुड्ढा शिव सांडावर बसून डमरू वाजवीत एकदा भारतवर्षातून एकीकडे सुमात्रा, बोर्निओ, सेलिबिस, ऑस्ट्रेलिया, अन् अमेरिकेचा किनारा फिरला होता, तर दुसरीकडे तिबेट, चीन, जपान, सैबेरियापर्यंत त्याने आपला सांड चरविला होता; आणि अजूनही चरवीत आहे. ही जी काली, ती अद्याप चीन-जपानमधे देखील पूजा वसूल करीत आहे. तिलाच येशूची आई मेरी बनवून ख्रिश्चन पूजत आहेत. हा जो हिमालय दिसतो ना? त्याच्याच उत्तरेला कैलास. तोच बुड्ढ्या शिवाचा बालेकिल्ला. तो जो कैलास दहा मुंड्यांच्या नि वीस हातांच्या रावणाला ढिम हालला नाही, तो आता ह्या पाद्र्या फादऱ्यांना दाद देणार आहे! – हे त्याला आता सरविणार आहेत!! हा बुड्ढा शिव डमरू वाजविणार, काली बकरे मटकावणार नि कान्हा बासरी वाजविणार – इथे, या देशात हे असेच चालणार – अगदी कायमचे. हिमालयासारखे अढळ आहेत ते. कधी कुणाच्यानेही ढळणार नाहीत – मग पाद्री झटोत की आणखी कुणी. तुम्हाला जर ते आवडत नसतील तर करा ना काळं, कोणी धरून ठेवलं आहे तुम्हाला? तुम्हा चारदोनजणांसाठी साऱ्या देशाला का उगीच त्रास बुवा? नाही पसंत ना, मग जा की हवे तिकडे – एवढी मोठी दुनिया पडली आहे. पण नाही, तसं नाहीच करणार. धमक हवी ना तसं करायला. ती कुठे आहे? निमकहराम

खातील त्या बुड्ढ्या शिवाचं, अन् गुण गातील येशूचे. राम राम! अन् सदान्कदा हे जे साहेबांपुढे तोंड वेंगाडून रडगाणं गात असता – 'आम्ही अति नीच, आम्ही अगदी कुचकामाचे, आमचे सारेच वाईट' – खरं असेल कदाचित ते. तुम्ही खोटं बोलणार नाही. तुम्ही अचाट सत्यवादी आहात, प्रश्नच नाही. पण या 'आम्ही'मधे साऱ्या देशाला का बरं गोवता गड्यांनो? ही कुठची रीत बुवा?

पूर्वेचे उद्दिष्ट आहे मुक्ती; पश्चिमेचे 'धर्म'

आधी हे समजून घ्यायला हवे की, असा कोणताही सद्गुण नाही की एखाद्या विशिष्ट जातीनेच ज्याचा ठेका घेतला आहे. आता हे अर्थातच खरे की, जसे एखाद्या व्यक्तीच्या ठायी तसेच एखाद्या जातीच्या ठायीही एखाद्याएखाद्या गुणाचे आधिक्य वा प्राधान्य आढळून येणे शक्य आहे.

आमच्या देशात मोक्षलाभाच्या इच्छेचे प्राधान्य आहे, पाश्चिमात्य देशात प्राधान्य आहे 'धर्मा'चे. आम्हाला हवी आहे – 'मुक्ती'. त्यांना हवा आहे – 'धर्म'. इथे 'धर्म' शब्द मीमांसकांच्या अर्थाने वापरला आहे. 'धर्म' म्हणजे काय? जो माणसास इहलोकी वा परलोकी सुखोपभोगास प्रवृत्त करतो त्याला म्हणतात 'धर्म'. हा धर्म क्रियामूलक असतो – कर्मावर आधारलेला असतो. हा धर्म माणसाला रात्रंदिवस सुख शोधायला, सुखासाठी धडपड करायला लावतो.

आणि मोक्ष म्हणजे? मोक्ष शिकवतो की इहलोकातील सुखदेखील गुलामी, नि स्वर्गाबिर्गातील सुखसुद्धा तेच. कारण प्रकृतीच्या नियमांच्या बाहेर हाही लोक नाही अन् परलोकही नाही. ह्या लोकातल्या गुलामीत आणि परलोकातल्या गुलामीत फरक फक्त इतकाच की इथे आपल्याला बांधणाऱ्या साखळ्या लोखंडाच्या आहेत तर तिथे सोन्याच्या. बस. पण दोन्ही साखळ्याच. शिवाय, सुख, मग ते इथले-तिथले कुठलेही असो, प्रकृतीच्या राज्यातील असल्यामुळे विनाशशील असणारच – ते कायमचे टिकणारे असूच शकत नाही. आज ना उद्या केव्हातरी संपणारच. म्हणून माणसाने मुक्त

होण्याची आकांक्षा धरायला हवी. मुक्त झाले पाहिजे. प्रकृतीच्या बंधनाबाहेर जावयास हवे. शरीराच्या बंधनाबाहेर जावयास हवे. गुलामी काय कामाची? गुलाम राहून कसं चालेल? हा मोक्षमार्ग फक्त भारतात आहे, अन्यत्र कुठे नाही. म्हणून हे जे म्हणतात ना की मुक्त पुरुष फक्त भारतातच आहेत, आणखी कुठे नाहीत, ते बरोबर आहे. अर्थातच पुढे दुसरीकडेही होतील. आणि ते तर चांगलेच होईल. किती आनंदाची गोष्ट ही.

'धर्मा'चा लोप झाल्याने भारताची अवनती

एके काळी ह्याच भारतवर्षांत धर्म आणि मोक्ष दोघेही गुण्यागोविंदाने नांदत होते. त्या वेळी युधिष्ठिर, अर्जुन, दुर्योधन, भीष्म, कर्ण वगैरेंबरोबरच व्यास, शुक, जनकप्रभृतीही विद्यमान होते – धर्माचे उपासक आणि मुक्तीचे आकांक्षी, दोन्ही. बौद्धांच्या उदयानंतर धर्माची अगदीच उपेक्षा झाली. केवळ मोक्षमार्गालाच प्राधान्य आले. म्हणूनच अग्निपुराणात रूपकाच्या भाषेत म्हटले आहे की, गयासुर (बुद्ध)* सगळ्यांनाच मोक्षमार्ग दाखवून जगाचा ध्वंस करू जात होता, म्हणून देवतांनी जमून युक्ती योजून त्याला कायमचे चूप केले. थोडक्यात काय की ही जी देशाच्या दुर्दशेची कहाणी सगळ्यांच्या तोंडून ऐकू येते, त्या दुर्दशेचे कारण म्हणजे ह्याच 'धर्मा'चा अभाव. देशातले सगळेच्या सगळेच लोक जर मोक्षमार्गाचे अनुसरण करायला निघाले तर अर्थातच फार छान. पण तसं कधी होत नसतं. भोग झाल्याखेरीज त्याग होत नसतो. आधी भोग संपू द्या, मग त्याग करू शकाल. एरवी देशभऱ्यातले लोक उठले नि सुटले आपले संन्यास घ्यायला! – ना हा पार ना तो पार

---

* गयासुर म्हणजेच बुद्ध हे स्वामीजींचे मत पुढे बदलले होते. देहत्यागाच्या काही थोड्याच दिवसांपूर्वी काशीहून आपल्या एका शिष्याला पाठविलेल्या पत्रात एके ठिकाणी त्यांनी लिहिले होते –

"अग्निपुराणातली गयासुराची गोष्ट डॉ. राजेंद्रलाल मित्र म्हणतात त्याप्रमाणे बुद्धदेवांना उद्देशून मुळीच नाही. पूर्वीपासून प्रचलित असलेली ती एक कथा आहे, आणखी काही नाही.

"बुद्ध गयाशीर्ष पर्वतावर राहावयास गेले होते यावरून ते स्थान त्यांच्या पूर्वीपासूनचेच आहे हे सिद्ध होते".

करून ज्याची चित्तशुद्धी झाली आहे तो, म्हणजेच – 'धार्मिक'. इतके करून कद्‌दू मिळण्याचे कारण हे आहे. नीट समजून घ्या. कधी विसरता कामा नये ते.

प्रत्येक जीव एका विशिष्ट शक्तीच्या प्रकटीकरणाचे एकेक केंद्र असतो. आपल्या पूर्वकर्मांचे फल असलेली ती शक्ती आपल्यात संचित झालेली असते, ती घेऊनच आपण जन्मत असतो. जोपर्यंत ती शक्ती कार्याच्या रूपाने प्रकट होऊन जात नाही तोपर्यंत कर्म टाकून देऊन कोण चुपचाप राहू शकेल बरे? तोवर भल्याबुऱ्या कर्मांचा कडूगोड फलभोग कोण चुकवू शकेल बरे? मानगुट पकडून तोवर ती शक्ती त्याच्याकडून कर्म करून घेईल. भोग जर याप्रमाणे चुकणारच नसेल तर मग दुःखभोगापेक्षा सुखभोग बरा नव्हे का? कर्म चुकतच नसेल तर मग कुकर्मापेक्षा सुकर्म बरे नव्हे काय? पूज्यपाद रामप्रसाद* म्हणतात – "चांगलं आणि वाईट दोन्ही आहे. त्यांपैकी चांगलं करणंच चांगलं."

मुक्तिकामी आणि धर्मकामी यांचे आदर्श वेगवेगळे आहेत

आता प्रश्न आहे की 'चांगलं' म्हणजे काय? ज्याला मुक्ती हवी आहे त्याचं 'चांगलं' वेगळं, आणि ज्याला धर्म हवा आहे त्याचं 'चांगलं' वेगळं. गीतोपदेशक भगवान श्रीकृष्णांनी गीतेत हेच महान सत्य मोठ्या प्रयासांनी पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या महासत्यावरच हिंदूंचा 'स्वधर्मा'चा सिद्धांत, त्यांची वर्णाश्रमव्यवस्था उभी आहे. गीतेमधली **'अद्वेष्टा सर्वभूतानाम्मैत्रः करुण एव च'** (जगात कुणाहीविषयी त्याच्या चित्तात द्वेष नसतो, तो सर्वांचा मित्र असून सर्वांविषयी करुणा बाळगतो) इत्यादी भगवंतांची वचने मोक्षेच्छूंसाठी आहेत. आणि **"क्लैब्यं मा स्म गमः पार्थ"** (अर्जुना, तू असा दुबळा बनू नकोस) **"तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व"** (म्हणून तू उठ, युद्धात शत्रूंचा पराभव करून यश मिळव) इत्यादी वचनांद्वारा

---

* बंगालमधील एक सुप्रसिद्ध कालीभक्त आणि संतकवी. त्यांची पदे बंगालमधे आबालवृद्धवनिता सर्वांना परिचित आहेत.

भगवंतांनी धर्म-लाभाचा उपाय दाखवून दिला आहे! आता हे खरे की कर्म करू जाता काही ना काही पाप हे लागणारच. लागले तर लागले, अजीबात उपास पडण्यापेक्षा अर्ध पोट जेवण चांगले नाही? काहीच न करण्यापेक्षा, मातीचे पेंड होऊन पडण्यापेक्षा कर्म, मग त्यात भल्या-बुऱ्या दोहोंची मिसळ असेना का, तेच करणे चांगले नाही का? गाय कधी खोटं बोलत नाही, भिंत कधी चोरी करीत नाही. पण गाय ती कायमची गायच आणि भिंत ती भिंतच राहणार. माणूस चोरी करतो, खोटं बोलतो, परत तोच माणूस देवता बनतो. सत्त्वगुणाचा प्रकर्ष झाल्यास माणूस निष्क्रिय होतो, त्याला परम ध्यानाची अवस्था प्राप्त होते. रजोगुणाचे प्राधान्य झाल्यास तो चांगलीवाईट कामे करतो. आणि तमोगुणाचे प्राबल्य झाल्यानेही माणूस परत निष्क्रिय, जड होतो. आता बाहेरून बघता, तुमच्यात सत्त्वगुण वाढला आहे की तुम्हाला तमोगुणाने झपाटले आहे हे कसं समजायचं सांगा बघू? सुखदु:खाच्या पलीकडे, क्रियातीत, शांतिमय अशा सात्त्विक अवस्थेत आपण आहोत की चेतनाहीन, निर्जीव, मातीच्या गोळ्यासारख्या जड, शक्तीच्या अभावी क्रियाहीन अशा घोर तामसिक अवस्थेमधे पडलो असून हळूहळू चुपचाप कुजत आहोत, ह्याचं उत्तर द्या बघू – नीट आपल्या मनाला विचारून उत्तर द्या. उत्तराबित्तराची गरज तरी काय आहे म्हणा, – 'फलेन परिचीयते' – फळावरून झाडाची पारख आपोआपच होते. सत्त्वगुण वृद्धिंगत झाल्याने माणूस निष्क्रिय होतो, शांत होतो खरा. पण ते निष्क्रियत्व म्हणजे महाशक्तीची घनीभूत अवस्था होय, ती शांती महावीर्याची खाणच असते. त्या महापुरुषाला मग तुमच्या-आमच्यासारखे हातापायांनी काम करावे लागत नाही. त्याच्या केवळ इच्छेने सारी कामे अगदी सहज, लीलेने होऊन जातात. असा पुरुषच सत्त्वगुणप्रधान, ब्राह्मण – सर्वलोकपूज्य. त्याला काय मग 'माझी पूजा करा हो' असे म्हणत गल्लोगल्ली ओरडत फिरावे लागते? जगदंबा त्याच्या कपाळावर स्वत:च्या हाताने लिहून देते की ह्या पुरुषाची सगळेजण पूजा करा. अन् तिचा तो आदेश जगाला मान तुकवून ऐकावा लागतो, मानावा लागतो.

असा महापुरुषच खरोखरी "**अद्वेष्टा सर्वभूतानाम् मैत्रः करुण एव च.**" अन् हे जे मिळमिळीत, पुचाट, मरतुकडे, आवंढा गिळत गिळत बायकीपणा करीत बोलतात, सुकडे कुणीकडचे, आवाज तर असा की जसे काही साता दिवसांचे उपाशी, थोबाडात दोन लगावल्या तरी हां नाही की हूं नाही – हा सारा तमोगुण. मृत्यूची चिन्हं ही सारी, हा सत्त्वगुण नव्हे. सारं सडलेलं, कुजलेलं – घाण सुटलेली. अर्जुन ह्या अशांच्या मेळ्यात सामील व्हायला निघाला होता म्हणूनच ना त्याची समजूत काढण्यासाठी भगवंतांनी गीतेत जंगजंग पछाडले आहे? भगवंतांच्या तोंडून अगदी पहिल्याप्रथम काय निघालं बघा – 'क्लैब्यं मा स्म गमः पार्थ.' आणि अखेर – 'तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व.' या जैनांच्या अन् बौद्धांच्या तावडीत सापडून आम्ही ह्या तमोगुण्यांच्या मेळ्यात सामील झालो आहोत. साऱ्या देशभरातले लोक हरिनामाचा गजर करीत आहेत, भगवंतांच्या नावाने हाका मारीत आहेत – आज हजार वर्षे झालीत. भगवान मख्ख; काहीकेल्या काही कानावरच घेत नाहीत. कशाला घेतील? बेकुबांचं बोलणं माणूसच कानी घेत नाही, मग भगवान कुठले घ्यायला बसलेत. आता उपाय आहे, भगवंतांचं हे वचन ऐकणं – "क्लैब्यं मा स्म गमः पार्थ" "तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व."

पाश्चात्त्य लोक कृष्णाचे आणि प्राच्य लोक येशूचे अनुसरण करीत आहेत!

असो. वळू या आता आपण आपल्या विषयाकडे. प्राच्य आणि पाश्चात्त्य. आधी एक मजा सांगतो बघा. युरोपियनांचा देव येशू, त्यानं उपदेश केला आहे – "निर्वैर व्हा, कुणी एका गालात थापड मारल्यास दुसरा गाल त्याच्यापुढे करा, कामकाज सारं बंद करा, आपापल्या गाठोड्या बांधून तयार राहा, मी परत आणखी येईन, लवकरच जगाचा ध्वंस होणार आहे". आणि आपला देव गीतेत सांगत आहे – "खूप उत्साहाने कर्म करा, शत्रूंचा निःपात करा, दुनियेचा उपभोग घ्या." झालंय मात्र सगळं उलटं! युरोपियनांनी येशूचं सांगणं कधी कानावर घेतलंच नाही. महा रजोगुणी, महा कार्यशील; प्रचंड उत्साहाने देशदेशांतरींची भोगसुखं आपल्याकडे ओढून घेऊन मजा लुटीत

आहेत. आणि कृष्णाचे चेले आम्ही गाठोड्याबिठोड्या बांधून कोपऱ्यात बसून रात्रंदिवस मरणाचा विचार करीत आहोत – **"नलिनी-दलगतजलमतितरलं तद्वत् जीवितमतिशयचपलम्"** (कमळाच्या पानावरील पाण्याच्या बिंदूसारखे जीवन अगदी चपल आहे, ते केव्हा घरंगळेल याचा नेम नाही) गात आहोत, अन् यमाच्या भयानं हातपाय पोटात घुसताहेत. अन् जळला तो यम तरी! तोही भलताच सोकावला आहे – दुनियेतले सारे रोग आमच्याच देशात शिरले आहेत. गीतेचा उपदेश पाळताहेत कोण? तर युरोपियन! आणि येशू ख्रिस्तांच्या इच्छेनुसार वागत आहेत कोण तर कृष्णाचे वंशज!! हे नीट समजून घ्यायला हवं. मोक्षमार्ग तर प्रथम वेदांनीच दाखविला आहे. त्यानंतर मग बुद्ध म्हणा की येशू म्हणा, सगळ्यांनी तिथूनच तर सारंकाही घेतलं आहे. आता ते होते संन्यासी. "अद्वेष्टा सर्वभूतानाम् मैत्रः करुण एव च" त्यांना लागू होतं. त्यांच्यापक्षी ते ठीक होतं. फार छान होतं. पण जबरदस्ती करून सगळ्याच्या सगळ्या दुनियेला त्या मोक्षमार्गाने फरफटत नेण्याचा अट्टाहास का? घासूनपुसून रूप अन् मारूनमुटकून प्रेम कधी होत असतं? ज्याला मोक्ष नको आहे, जो मोक्षाला लायक नाही त्याच्यासाठी बुद्धाचं वा येशूचं काय सांगणं आहे बोला? काहीच नाही! "एकतर मोक्ष घ्या नाहीतर चुलीत जा" हेच त्यांचं सांगणं! मोक्षाखेरीज इतर कशासाठी प्रयत्न करण्याचे तुमचे रस्ते सगळे बंद. ह्या दुनियेचा थोडा उपभोग घेतो म्हणाल तर त्याचा काही उपाय नाही. रस्ता बंद. नुसता बंदच नाही, तर पदोपदी अडथळे. फक्त वैदिक धर्मात हे चतुर्वर्ग साधण्याचा उपाय आहे – धर्म, अर्थ, काम, मोक्ष. बुद्धांनी केला आमचा सत्यानाश, येशूंनी केला ग्रीस – रोमचा सत्यानाश!!! पुढे सुदैवाने युरोपियनांनी प्रॉटेस्टंट होऊन येशूंचा धर्म झटकून टाकला, तेव्हा कुठे सुटकेचा निःश्वास सोडून वाचले बिचारे! भारतवर्षात कुमारिलांनी फिरून कर्ममार्ग चालू केला, शंकर-रामानुजांनी चतुर्वर्गांची सांगड घालणारे सनातन वैदिक मत फिरून प्रवर्तित केले – देश वाचण्याची शक्यता झाली. पण भारतवर्षात तीस कोटी लोक, म्हणून वेळ लागत आहे. तीस कोटी लोकांना

चेतवणं काय एका दिवसात व्हायचंय?

बौद्ध धर्माचा आणि हिंदू धर्माचा दोघांचाही उद्देश एकच आहे. पण बौद्धधर्माचा उपाय मात्र ठीक नाही. उपाय जर ठीक असता तर हा आमचा सर्वनाश का झाला? 'काळाच्या ओघात असे आपोआपच होत असते' असे म्हणून कसे चालेल? काळ काय कार्यकारणसंबंध डावलून काम करू शकेल?

धर्मरक्षणच जातीच्या कल्याणाचा उपाय

म्हणून, उद्देश एक असला तरी उचित उपाय न अवलंबल्यामुळे बौद्धांनी भारताला खाली आणले आहे. बौद्ध बांधव रागावतील. रागावोत. दोन पोळ्या जास्त खा म्हणावं. खरं ते सांगणं उचित. खराखरा उपाय आहे वैदिक उपाय – 'जातिधर्म' (वर्णाश्रम धर्म), – 'स्वधर्म' (प्रत्येकाच्या स्वभावानुसार प्राप्त होणारी कर्तव्ये). तोच आहे वैदिक धर्माचा, वैदिक समाजाचा पाया. माझ्या ह्या विधानानं कदाचित माझे दुसरे काही मित्र रागावतील. ते म्हणतील की माझ्या ह्या (जातिधर्मविषयक) विधानाने मी आपल्या स्वदेशीयांची खुशामत करीत आहे. ज्यांना असे वाटेल त्या माझ्या मित्रांना मला विचारायचं की गड्यांनो, ह्या स्वदेशातल्या लोकांची खुशामत करून मला काय मिळणार आहे? न खाता माझ्यावर मरण्याची पाळी आली तरी स्वदेशातले लोक मूठभर अन्न द्यायला रिकामे नाहीत. भिक्षाबिक्षा मागून बाहेरच्या देशातून काही आणून दुष्काळाने पीडलेल्या अनाथांना खाऊ घालू गेलो तर त्यातला वाटा उचलायला स्वदेशातले लोक विशेष तत्पर. हाती काही लागलं नाही तर वर मला शिव्यांची लाखोली!! हे स्वदेशीय पंडितांनो, असे तर माझ्या देशातले लोक. त्यांची हो कसली खुशामत करायची? पण त्यांना झाला आहे उन्माद. उन्माद झालेल्याला जो कुणी औषध पाजायला जाईल त्याच्या हाताचे दहापाच चावे घेतल्याखेरीज तो कधीच सोडणार नाही. ते सगळे सहून जो त्याच्या नरड्यात औषध ओतील तोच त्याचा खराखरा मित्र – हितकर्ता. असो.

हा 'जातिधर्म', हा 'स्वधर्म'च सर्व देशांतील सर्व समाजांच्या कल्याणाचा उपाय, मुक्तीचा सोपान. ह्या 'जातिधर्मा'च्या, ह्या 'स्वधर्मा'च्या नाशाबरोबरच देशाचे अध:पतन झाले आहे. तथापि उच्चवर्णीयांतले आबाजी-बाबाजी ज्याला जातिधर्म वा स्वधर्म मानतात ती मात्र एक उलटीच आफत आहे हं. आबाजींना जातिधर्म कळला आहे कपाळ! – स्वत:च्या खेड्यातल्या रूढी म्हणजेच सनातन धर्म अशी समजूत कवटाळून बसले आहेत, आपल्याच पोळीवर तूप ओढीत आहेत, अन् स्वत:चा घात करून घेत आहेत. मी गुणगत जातींसंबंधी बोलत नाही, वंशपरंपरागत (आनुवंशिक) जातींसंबंधी बोलत आहे, जन्मगत जातींसंबंधी बोलत आहे. आदी जातिभेद गुणगतच होय हे मला कबूल आहे. परंतु गंमत अशी की गुण दोनचार पिढ्यांतच आनुवंशिक होऊन बसतात. याप्रमाणे आपल्या देशाच्या त्या अगदी मर्मावरच घाव बसला. एरवी आपला असा सत्यानाश का झाला? "संकरस्य च कर्ता स्याम् उपहन्याम् इमा: प्रजा:" – गीतेत आहे. हा घोर वर्णसंकर कसा ओढवला? – जातीजातींची ही अशी विलक्षण भेसळ आणि समस्त गुणगत भेदांचा लोप कसा झाला? आपल्या पूर्वजांचा गोरा रंग जाऊन आपला रंग असा काळा का झाला? सत्त्वगुण जाऊन रज: प्रधान तमोगुण कसा आला? हे सारं सांगायचं म्हणजे पुष्कळच सांगावं लागेल, म्हणून आता नको, पुढे अन्य एखाद्या प्रसंगी सांगेन. सध्या फक्त एवढंच नीट समजून घ्या की, जातिधर्म जर नीटपणे पाळला जाईल तर त्या देशाचं अध:पतन होणारच नाही. हे जर खरे असेल तर मग आमचे अध:पतन का झाले? उघडच आहे की जातिधर्म नष्ट झाला. अतएव, ज्याला तुम्ही जातिधर्म म्हणता तो अगदी उलटा आहे. आधी आपली पुराणं, पोथ्यापाथ्या अमळ नीट वाचा बघू. दिसून येईल की शास्त्र ज्याला जातिधर्म म्हणतं, त्याचा देशात प्राय: सर्वत्रच लोप झाला आहे. एवढं समजून घेतल्यानंतर मग जेणेकरून तो देशात फिरून प्रतिष्ठित होईल असे करा. तसे झाल्यास परम कल्याण निश्चित. मी जे काही शिकलो आहे, जे काही समजलो आहे तेच तुम्हाला सांगतो आहे. मी तर

काही विदेशातून तुमचा उद्धार करण्यासाठी आलेलो नाही की जेणेकरून मला तुमच्या महामूर्खपणाच्या चालीरीतींचीही तरफदारी करून त्यांची वैज्ञानिक दृष्टीने फोड करून दाखवावी लागेल. विदेशी बांधवांचं काय? 'वाहव्वा' मिळाली की झालं. पण तुमच्या तोंडाला काळं लागल्यानं माझ्याही तोंडाला लागणार – त्याची काय वाट?

जातीच्या जीवनाच्या मूळ पायावर आघात होताच जातीची दुर्दशा वा मृत्यू अटळ

मी मागेच सांगितले आहे की प्रत्येक जातीचे एक जातीय उद्देश्य असते. नैसर्गिक नियमांनी म्हणा की महापुरुषांच्या प्रतिभाबलाने म्हणा, प्रत्येक जातीच्या सामाजिक रूढी वा रीतिरिवाज हे तिचे ते उद्देश्य सफल होईल अशा स्वरूपाचे घडविले जात असतात. कोणत्याही जातीच्या जीवनाचे ते उद्देश्य आणि तदुपयोगी उपायभूत असे आचार वगळून त्या जातीत प्रचलित असलेल्या बाकीच्या साऱ्या रूढी नि रीतिरिवाज निव्वळ उबारीचे असतात. ह्या उबारीच्या रूढींच्या वा रीतिरिवाजांच्या ऱ्हासाने किंवा वृद्धीने काही विशेष येत-जात नाही. पण जर त्या अस्सल उद्देश्यावर घाव बसला तर तात्काळ ती जात नाश पावेल.

लहानपणी एक गोष्ट ऐकली होती. कुणी एक राक्षसीण होती. तिचा प्राण एका पक्ष्यात होता. त्या पक्ष्याचा नाश झाल्याखेरीज राक्षसिणीचा कशानेही नाश होणे अशक्य. जातींचेही असेच. त्यांचाही प्राण त्यांच्या त्यांच्या उद्देशरूपी पक्ष्यात असतो. त्याचप्रमाणे असेही तुम्हाला आढळून येईल की, जे हक्क जातीच्या जीवनासाठी अगदी आवश्यकच नाहीत ते सगळे हिरावून घेतले गेले तरी ती जात विशेषशी गडबड करणार नाही. पण तेच तिच्या मूळ जातीय जीवनावर वार होताच मात्र सारी शक्ती एकवटून ती उलट वार केल्याखेरीज राहणार नाही.

फ्रेंच, इंग्रज आणि हिंदू यांच्या उदाहरणांनी वरील तत्त्वाचे समर्थन

ज्यांचा इतिहास तुम्हाला थोडाफार माहीत आहे अशा फ्रेंच, इंग्रज आणि

हिंदू या तीन विद्यमान जातींची तुलना करून बघा. राजनैतिक स्वाधीनता हा फ्रेंचांच्या जातीय चारित्र्याचा कणा आहे. फ्रेंच प्रजा सगळे अत्याचार निमूटपणे सहील. हवे तितके कर तिच्यावर लादा, हूं की चूं करणार नाही. सगळ्या देशाला जबरदस्तीने नेऊन सैन्यात भरती करा, आडकाठी करणार नाहीत. परंतु त्यांच्या राजनैतिक स्वाधीनतेला हात लावा की बस्, मग तो कुणीही असो, सगळी जात नुसती खवळून जाऊन परत टोला हाणील. कुणी कुणावर स्वार होऊन हुकूम चालवू शकणार नाही, हाच फ्रेंच चारित्र्याचा मूलमंत्र. "ज्ञानी-मूर्ख, धनी–दरिद्री, उच्चवंशीय-नीचवंशीय कुणीही असू आम्ही, राज्यकारभारात, सामाज़िक स्वातंत्र्याच्या बाबतीत आम्हाला सर्वांना समान अधिकार आहेत" – हे त्यांचे ब्रीद. त्याला जो हात लावू जाईल त्याची कंबक्ती आलीच म्हणून समजा.

इंग्रजांच्या चारित्र्यात वाणिज्यवृत्ती, देवघेवीची भावना प्रधान असते. सारखी वाटणी – हा इंग्रजांचा मुख्य मुद्दा. राजा, कुलीनांचे विशेषाधिकार, सारेकाही इंग्रज निमूटपणे मानतो. फक्त, गाठीचा एक पैसा काढून द्यायची पाळी येताच तो त्याचा हिशेब मागेल. राजा आहे – छान, मानू आम्ही त्याला. पण तो जर पैसा मागत असेल तर तो कशासाठी, त्याने काय भले होणार आहे हे आधी मला कळले पाहिजे, तो कसा खर्च व्हावा हे सांगण्या-समजण्याचा मला अधिकार असला पाहिजे, तर देईन. त्यांच्या एका राजाने एकदा जबरदस्तीने पैसा वसूल करू जाऊन एक मोठी तोहमत ओढवून घेतली होती. लोकांनी मारून टाकलं त्या राजाला.

हिंदू म्हणतात – राजनैतिक स्वाधीनता, सामाजिक स्वाधीनता चांगल्या गोष्टी आहेत, छान आहेत. परंतु असल चीज आहे पारमार्थिक स्वाधीनता – 'मुक्ती'. हेच आमचे जातीय जीवनोद्देश्य. वैदिक म्हणा, जैन म्हणा, बौद्ध म्हणा, अद्वैती म्हणा, विशिष्टाद्वैती म्हणा, की द्वैती म्हणा, कुणीही म्हणा, साऱ्यांचे याविषयी एकमत आहे. त्याला हात लावू नका. लावाल तर तुमची धडगत नाही. ते सोडून मग काय वाटेल ते करा, आम्ही चूप राहू. लाथा

मारा, 'काला आदमी' म्हणा, सर्वस्व लुबाडून घ्या – विशेष काही हरकत नाही. फक्त तो तेवढा एक मार्ग रोधू नका, तो मोकळा असू द्या म्हणजे झाले. बघाना, अर्वाचीन काळात पठाण घराणी येत होती नि जात होती, एकही इथे टिकून राहून राज्य करू शकले नाही, का की ते हिंदूंच्या ह्या धर्मावर सारखे आघात करीत होते. तेच मोगलांचे राज्य बघा, कसे सुदृढ, सुप्रतिष्ठित, नि किती विलक्षण बलशाली झाले. का? कारण हेच की मोगलांनी ह्या ठिकाणी घाव घातला नाही. मोगलसिंहासनाचे आधारस्तंभ हिंदूच तर होते – जहांगीर, शहाजहान, दारा सुको या साऱ्यांच्या आया तर हिंदूच होत्या की! अन् बघा, त्या बदनशीबी औरंगजेबानं फिरून त्या ठिकाणी आघात केला, नि एवढं मोठं मोगल साम्राज्य, पण कसं स्वप्नासारखं विरलं. हे जे इंग्रजांचे सिंहासन इतके दृढ आहे – कशाच्या आधारावर? चुकून तें या धर्माला हात लावीत नाहीत म्हणून. पाद्री नरपुंगवांनी तसा अमळ उपद्व्याप करून बघितल्यामुळेच तर १८५७ साली एवढा धुमाकूळ माजला होता. इंग्रज जोपर्यंत हे पक्के जाणून राहतील आणि तदनुसार वागतील तोपर्यंत इथल्या त्यांच्या सिंहासनाला धोका नाही, ते अढळ राहील. त्यांच्यातल्या दूरदेशी, शहाण्या व्यक्तींना ह्याची पुरेपूर जाणीव आहे. लॉर्ड रॉबर्ट्सचे 'भारतवर्षातील ४१ वर्षे' हे पुस्तक वाचून बघा.*

कळलं ना आता, ह्या राक्षसिणीचा प्राण कोणत्या पक्ष्यामधे आहे? तो आहे – धर्मात. त्याचा कुणी नाश करू शकला नाही म्हणूनच हिंदू जात इतकं सहून सुद्धा अजूनही तगून आहे. ठीक. पण यावर एक देशी विद्वान म्हणतात की तिथे (धर्मरूपी पक्ष्यात) प्राण ठेवण्याची इतकी आवश्यकताच काय? सामाजिक किंवा राजनैतिक स्वाधीनतेत ठेवत का नाही? – जसा इतर देशात आहे तसा. बोलणं तर खूप सोपं आहे. उचलली जीभ नि लावली टाळूला. वादविवादासाठी म्हणूनही जरी धरून चाललो की धर्मबिर्म सारं झूट आहे, तरीसुद्धा काय होतं बघा. अग्नी एकच. पण तो जसा नाना रूपांनी

* 'Forty-one years in India', ३० व ३१ वी प्रकरणे.

प्रकट होत असतो तशी ती एकच महाशक्ती फ्रांसमधे राजनैतिक स्वाधीनतेच्या रूपाने, इंग्रजांमधे वाणिज्यप्रतिभेच्या व समभावाच्या विकासाच्या रूपाने आणि हिंदूंच्या हृदयात मुक्तिलाभेच्छेच्या रूपाने प्रकट झाली आहे. परंतु त्या महाशक्तीच्या प्रेरणेने कित्येक शतकांच्या सुखदु:खांमधून फ्रेंच वा इंग्रज लोकांचे चारित्र्य बनून गेले आहे, आणि तिच्याच प्रेरणेने कैक कैक हजार शतकांच्या स्थित्यंतरांमधून हिंदूंच्या जातीय चारित्र्याचा विकास झालेला आहे. मी म्हणतो, आमचा लाख लाख वर्षांचा स्वभाव सोडणं सोपं, ना तुम्ही दत्तक घेतलेला शेदीडशे वर्षांचा तुमचा विदेशी स्वभाव टाकणं सोपं? इंग्रजांनी का बरं धर्मप्राण होऊ नये? – युद्धायुद्धी, रक्तारक्ती सोडून देऊन का शांत, चुपचाप बसू नये?

धर्माखेरीज इतर कशावरही भारताच्या जीवनाची प्रतिष्ठा अशक्य

खरी गोष्ट अशी आहे की नदी पहाडातल्या आपल्या उगमापासून उतरून १००० कोस खाली आली आहे. ती काय फिरून उगमाकडे परत जात असते वा कधी जाऊ शकत असते? जायचा ती कधी अगदी प्रयत्न करीलच तर होईल एवढेच की तिचे पाणी इकडेतिकडे विखरून ती सुकून जाईल. ती नदी कसेही करून समुद्राला जाऊन मिळणार ही आहेच – दोन दिवस आधी की नंतर, चारदोन सुंदर सपाट जागांवरून वाहत जाऊन किंवा दोनचार घाणेरड्या प्रदेशांना वळसे घालून, इतकेच. दहा हजार वर्षांचं आपलं हे जातीय जीवन चुकीचं असलं तरी आता काही उपाय नाही. आता जर आपण आपले चारित्र्य नव्याने घडवायला गेलो तर आपण नाहीसे होऊन जाऊ, नामशेष होऊ.

परंतु आपलं जातीय जीवन चुकलं आहे, आपला जातीय आदर्श चुकीचा आहे असं मानणंच अगदी चूक आहे. माफ करा हं, अमळ स्पष्ट बोलतो म्हणून. ते अगदी सपशेल अडाणीपणाचं आहे. आधी दुसरे अनेक देश हिंडा, त्यांची अवस्था नीट बघा. स्वत:च्या डोळ्यांनी बघा, दुसऱ्यांच्या नाही. आणि मग डोकं असेल तर ते अमळ शिणवून देशदेशांतरी जे दिसलं-

बघितलं असेल त्याच्यावर विचार करा. त्यानंतर आपली शास्त्रबिस्त्रं, जुनं साहित्य वाचून काढा. भारतवर्षाच्या प्रांताप्रांतांत भ्रमण करून निरीक्षण करा – डोळे उघडे ठेवून निरीक्षण करा, बुद्धिमंतांच्या दृष्टीतून निरीक्षण करा, मूर्खशिरोमण्यांच्या दृष्टीतून नव्हे. तुमच्या प्रत्ययास येईल की आपली जात जिवंत आहे, प्राणाचे स्पंदन नीट चालले आहे. प्रत्ययास येईल की जातीच्या जीवनाचा अग्नी आत छान धगधगत आहे, वर जमलेल्या राखेने फक्त झाकला, दबला गेला आहे, इतकेच काय ते. आणि हेही प्रत्ययास येईल की देशाचे जीवन, देशाचा प्राण आहे – धर्म; देशाची भाषा आहे – धर्म; देशाचा भाव आहे – धर्म. आणि तुमची राजनीती, समाजनीती, रस्तेसफाई, प्लेगनिवारण, दुष्काळपीडितांना अन्नदान वगैरे सारं ज्या तऱ्हेनं या देशात नेहमी होत आलं आहे, त्याच तऱ्हेनं होणार – धर्मामधून झालं तरच होणार, एरवी होणार – कद्दू. होऊन होईल फक्त तुमची आरडाओरड, पंत! आलं ना ध्यानात?

शक्तिमान पुरुषच सर्व समाजांना चालवीत असतात

शिवाय, उपाय तर अखेर सर्व देशांमधे एकच असतो – मूठभर शक्तिशाली माणसे करतील ते धोरण नि बांधतील ते तोरण अशीच स्थिती असते. बाकीचे म्हणजे मेंढ्यांचा कळप, चालले त्यांच्यामागे. आणखी काय? ते तुमचं 'पार्लमेंट' बघितलं, 'सेनेट' बघितलं. व्होटबॅलट-मेजॉरिटी सारं काही बघितलं, पंत! सगळ्या देशांत ही एकच कथा. शक्तिमान पुरुष इच्छा होईल तिकडे समाजाला नेत असतात, आणि बाकीचे म्हणजे मेंढ्यांचा कळप. आता, भारतवर्षात हे शक्तिमान पुरुष कोण? तर, धर्मवीर. ते आमच्या समाजाला चालवितात. तेच समाजाची रीति-नीती बदलण्याची गरज पडल्यास बदलून देतात. आम्ही चुपचाप ऐकतो आणि त्याप्रमाणे करतो. फक्त यात तो तुमचा उबारीचा भाग – ती मेजॉरिटी, व्होट वगैरेंचा हैदोसदुल्ला नाही, इतकेच काय ते.

पाश्चात्त्य देशांत राजनीतीच्या नावाने दिवसा डाकेखोरी

आता हे मात्र खरे की व्होट, बॅलट वगैरेंमधून बहुजनसमाजाला पाश्चात्त्य देशांमध्ये जे एकप्रकारचे शिक्षण-वळण लाभते ते आम्हाला लाभत नाही. पण त्याचबरोबर हे ही खरे की, राजनीतीच्या नावाखाली जे चोरांचे गट युरोपीय देशांमधील बहुजन समाजाचे रक्त शोषून पुष्ट होत असतात ते पण आमच्या देशात नाहीत. राजनीतीच्या गोंडस नावाखाली पाश्चात्त्य देशांमधे चालणारा तो लाचलुचपतीचा धुमाकूळ, ती दिवसाढवळ्या डाकेखोरी! त्या राजनीतीची अंदरकी बात बघितली असती तर माणसाविषयी अगदी निराश, हताश होऊन गेला असता, पंत! "गली गली गोरस फिरे मदिरा बैठि बिकाय। सतीको धोती ना मिले कसबिन् पहिने खासा." – "दूध विकण्यासाठी गल्लोगल्ली फिरावे लागते, पण दारू एके जागी बसूनच विकली जाते. सती स्त्रीला नेसायला वस्त्र मिळण्याची मारामार, पण बाजारबसवीला मात्र लयलूट. धन्य कलियुगाचा महिमा!" ज्यांच्याजवळ पैसा आहे त्यांनी राज्यकारभाराची सूत्रे आपल्या मुठीत ठेवली आहेत – प्रजेला, बहुजनसमाजाला ते लुटतात, लुबाडतात, शोषतात, सैन्यात भरती करून मरण्यासाठी देशदेशांतरी पाठवितात. जय झाला तर ह्यांचेच उखळ पांढरे होणार – सैनिकांच्या रक्ताच्या मोबदल्यात. अन् प्रजा? ती तर तिथेच गारद झाली, मेली – तिचं फक्त रक्त सांडायचं काम! ह्याचं नाव राजनीती, पंत! समजलं? तिने दिपून जाऊ नका, तिच्या भुलावणीला भुलू नका.

एक गोष्ट समजून घेण्याचा यत्न करा. सांगा, माणूस कायदे तयार करीत असतो की कायद्यांनी माणूस तयार होत असतो? माणूस पैसा निर्माण करीत असतो की पैशाने माणूस निर्माण होऊ शकतो? माणूस नावलौकिक करीत असतो की नावलौकिकाने माणूस होत असतो?

'माणूस' व्हा

माणूस व्हा, पंत, आधी माणूस व्हा! मग दिसेल की बाकीचे ते सारे कसे आपोआप तुम्हाला येऊन मिळत आहे. ते कुत्र्यासारखे आपसांत

एकमेकांवर गुरगुरणे-भुंकणे सोडून देऊन सदुद्देश्यासाठी सदुपाय, सत्साहस नि सद्वीर्य यांचे अवलंबन करा. जन्मला आहात तसे एक डाग ठेवून जा मागे. "तुलसी आयो जगतमें, जगत् हँसे तुम रोय। ऐसी करनी कर चलो, आप हँसे जग रोय". "जेव्हा तू जन्मला होतास तेव्हा सगळे हसत होते, तू रडत होतास. तुलसीदासा, आता अशी करणी करीत चल की तू हसत हसत मरशील आणि सगळे तुझ्यासाठी रडतील." हे करू शकला तर तुम्ही माणूस, नरसोपंत, एरवी कसचे मनुष्य तुम्ही!

पाश्चात्त्य जातीचे गुण आमच्या स्वतःच्या साच्यात घालून घेतले पाहिजेत

आणखी एक गोष्ट नीट समजून घ्या दादा की, आपल्याला दुसऱ्या जातींपासून केव्हाही पुष्कळ पुष्कळ शिकायचे आहे. जो माणूस म्हणतो की मला शिकण्यासारखे आणखी काही नाही तो मरण्याच्या वाटेला लागला आहे असे समजावे. जी जात म्हणते की आम्ही सारं काही जाणून घेतलं आहे त्या जातीची अवनती अगदी उमरठ्याशी येऊन ठेपली आहे म्हणून समजावे. "जोवर वाचेन तोवर शिकेन!" पण हे बघा, लोकांपासून जे काय शिकायचं-घ्यायचं ते सारं आपल्या स्वतःच्या साच्यात घालून आपल्या घाटाचं करून घेऊन मगच, एवढं मात्र लक्षात ठेवायला हवं. आणि आपलं अस्सल जे काही आहे ते नेहमी कायम राखून मग लोकांपासून काय ते शिकायला हवं. उदाहरणादाखल हेच घ्या ना – जेवतात तर सर्वच देशांतले लोक. पण आपण मांडी घालून बसून खातो, विलायती लोक खुर्चीवर पाय खाली सोडून बसून जेवतात. आता समजा की मला त्यांच्या पद्धतीचा सैपाक चाखायचा आहे. म्हणून काय मला त्यांच्यासारख्या तंगड्या का लोंबकळत ठेवायला हव्यात? तासभराच्या वर तसं बसल्यानं तर माझ्या तंगड्यांचे तुकडे पडायला येतील – पाय दुखायला लागून जीव जाण्याची पाळी येईल त्याची काय वाट? म्हणून पालखट मारून बसून त्यांचं खाणं खाईन मी! याप्रमाणे विदेशी जे काही घ्यायचं ते आपल्या साच्यात घालून आपल्या घाटाचं करून घेऊन – पालखट मारून, – आपल्या जातीचे असल चारित्र्य, वैशिष्ट्य कायम ठेवून

घ्यायला हवं. थोडक्यात म्हणजे स्वत्व बिलकूल न गमाविता. मी म्हणतो, कपड्यांनी काय माणूस बनत असतो, की माणूस कपडे घालत असतो? शक्तिमान पुरुष कोणताही पोशाख करेना का, लोक त्याला मानतात. अन् माझ्यासारखा ठोंब्या जरी धोब्याची मोट पाठीवर घेऊन फिरला तरी लोक ढुंकून बघणार नाहीत.

असो, मूळ विषयाची ही भूमिका फारच लांबली. पण ह्या लांबलचक भूमिकेनंतर मूळ विषय, अर्थात पूर्व आणि पश्चिम यांची तुलना करणे सोपे जाईल.

पूर्व आणि पश्चिम

तेही चांगले आहेत, आम्हीही चांगले आहोत. "काको निंदौ, काको बंदौ, दोनों पल्ला भारी" – कुणाला निंदायचं नि कुणाला वंदायचं, कारण दोन्ही पारडी समान आहेत. फक्त, चांगल्याचे नाना प्रकार आहेत, इतकेच!

माणूस म्हटला म्हणजे, आमच्या मते, त्याच्या ठायी तीन गोष्टी असतात. पहिली म्हणजे शरीर, दुसरी म्हणजे मन, आणि तिसरी म्हणजे आत्मा. या तिहींपैकी शरीर सगळ्यांत बाहेरची गोष्ट. म्हणून आधी आपण शरीरच विचारात घेऊ या.

प्रथम बघा, शरीराशरीरातच किती निरनिराळेपणा असतो, किती भेद असतात. नाक, मुख, घडण, उंची, रुंदी, रंग, केस वगैरेंच्या किती परी, किती तऱ्हा, किती प्रकार असतात!

वर्णभेदाचे कारण

आधुनिक पंडितांच्या मते रंगाचे भेद वर्णसंकरामुळे निर्माण होत असतात. गरम देश, थंड देश वगैरेंचा थोडाबहुत परिणाम होतो खरा, परंतु काळे-गोरेपणाचं खरं कारण आहे पैतृक गुण, – आनुवंशिकता. अति शीत देशांतही मळक्या रंगाच्या जाती आढळून येतात व अति उष्ण देशांतही गोऱ्यागोऱ्यापान जाती असलेल्या दिसतात. कॅनडात राहणारे अमेरिकेचे आदिवासी आणि उत्तरध्रुवाजवळील प्रदेशातच राहणारे एस्किमो वगैरेंचा रंग

खूप मळका आहे, तर विषुववृत्तावरील द्वीपांमधेही गोऱ्या रंगाच्या आदिवासी जमाती राहताना आढळतात. बोर्निओ, सेलिबिस वगैरे द्वीपसमूह उदाहरणादाखल सांगता येतील.

आर्य जाती

आता, आमच्या शास्त्रकारांच्या मते हिंदूंमधील ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या तीन जाती आणि चीन, हूण, दरद, पल्हव, यवन व खश या साऱ्या भारताबाहेरील जाती ह्याआर्य होत. शास्त्रातली ही चीन जात म्हणजे आजचे चिनी लोक नव्हत. आजचे चिनी लोक त्या काळात स्वत:ला 'चिनी' म्हणतच नव्हते. 'चीन' नावाची एक मोठी जात काश्मीरच्या उत्तर-पूर्व भागास (ईशान्येस) होती. आज भारत आणि अफगाणिस्थान यांच्यामध्ये ज्या साऱ्या पहाडी जाती राहतात, तिथे दरद राहत असत. प्राचीन चीन जातीचे काही मूठभर वंशज अद्यापही अस्तित्वात आहेत. दरदिस्थान अजूनही विद्यमान आहे. 'राजतरंगिणी' नामक काश्मीरच्या इतिहासात वारंवार दरद राजाच्या प्रभुत्वाचा उल्लेख आढळतो. हूण नावाची प्राचीन जात बराच काळ भारतवर्षाच्या उत्तर-पश्चिम भागात (वायव्येस) राज्य करीत होती. आज तिबेटी स्वत:ला हूण म्हणवितात, पण ते बहुधा 'ह्यूण' (Hune) असावे. सारांश, मनूने म्हटलेले हूण हे आधुनिक तिबेटी नव्हत. तथापि हे शक्य आहे की ते आर्य जातीचे हूण आणि मध्यआशियातून आलेली एखादी मोगल जात यांच्या संमिश्रणाने सांप्रतच्या तिबेटी लोकांची उत्पत्ती झाली असावी. प्रजाव्हलस्की (Prjevalski) नामक रशियन आणि ड्यू डी ऑर्लिआँ (Due d' Orleans) नामक फ्रेंच प्रवाशांच्या मते तिबेटमधे कुठेकुठे अजूनही आर्यांसारखे चेहरे नि डोळे असलेल्या जाती आढळून येतात. 'यवन' आहे ग्रीकांचे नाव. ह्या नावावरून तुंबळ वादंग माजलेलं आहे. अनेकांच्या मते यवन हे नाव प्रथम 'योनिया' (Ionia) नामक स्थानी राहणाऱ्या ग्रीकांना देण्यात आले होते; म्हणूनच सम्राट अशोकाच्या शिलालेखांमधे ग्रीकांना 'योन' म्हटले आहे, आणि पुढे ह्या 'योन'पासून संस्कृतातील 'यवन' शब्द बनला.

आमच्या देशातील कुणाकुणा प्राचीन वस्तु संशोधकांच्या (antiquarians च्या) मताने 'यवन' शब्द हा ग्रीकांना लागू नाही. पण ही सारीच मतं चुकीची आहेत. 'यवन' हाच मुळी मूळचा शब्द आहे. कारण फक्त हिंदूच काय ते ग्रीकांना यवन म्हणत असत असे नाही. प्राचीन इजिप्त व बाबिलोनियाचे लोकही ग्रीकांना यवन ह्याच नावाने ओळखीत असत. पल्हव म्हणजे पल्हवी भाषा बोलणारी प्राचीन पारसी जात. 'खश' शब्दाने अजूनही पहाडी मुलखातील व हिमालयातील अर्धसभ्य आर्य जाती उल्लेखिल्या जातात. ह्या अर्थाने हा शब्द अद्यापही वापरला जातो. आजचे युरोपियनही ह्या अर्थाने खशांचे वंशज होत. म्हणजे ज्या सर्व आर्य जाती प्राचीनकाळी असभ्य अवस्थेत होत्या त्या साऱ्या खश होत.

आर्यजातीची घडण आणि वर्ण

आधुनिक विद्वानांच्या मते आर्यांचा रंग लालसर गोरा, केस काळे किंवा लाल, आणि नाकडोळे सरळ असत, केसांच्या रंगानुसार डोक्याची घडण किंचित वेगवेगळी असे. जिथे त्यांचा रंग काळा, तिथे तो इतर काळ्या जातीशी झालेल्या संमिश्रणाने तसा बनला आहे. या विद्वानांच्या मताने हिमालयाच्या पश्चिम सीमेस राहणाऱ्या दोनचार जाती अजूनही पुऱ्या आर्य आहेत. बाकी सर्वत्र खिचडी झाली आहे, एरवी त्या काळ्या का झाल्यात? परंतु युरोपी विद्वानांच्या एव्हाना ध्यानात येणे उचित की, दक्षिण भारतातही पुष्कळ मुले लाल केसांची जन्मतात, पण चारदोन वर्षांतच त्यांचे केस परत काळे होऊन जातात आणि हिमालयात पुष्कळांचे केस लाल नि डोळे निळे किंवा घारे असतात.

हिंदू व आर्य

विद्वान आपसात लढोत नि मरोत! 'आर्य' नाव नेहमी हिंदूच स्वतःला लावीत आहेत. शुद्ध रक्ताचे असोत की संमिश्र रक्ताचे असोत, हिंदूच आर्य होत, बस्. आम्ही आर्य लोक काळे म्हणून युरोपियनांना आमची किळस वाटत असेल तर ते स्वतःसाठी निराळे नाव निवडोत. आम्हाला त्याचं काय?

प्राच्य आणि पाश्चात्त्य यांच्यातील ठोकळ भेद

परंतु काळे असोत की गोरे असोत, दुनियेतील साऱ्या जातींपेक्षा या हिंदूंची जातच दिसायला सगळ्यात सुंदर नि नाकीडोळी नीटस आहे. हे मी आपल्या स्वत:च्या जातीची बढाई करायची म्हणून म्हणत नाही, ही गोष्ट जगप्रसिद्ध आहे. शेकडा सुरूप नरनारींची संख्या या देशातल्याइतकी आणखी कुठे आहे? शिवाय, विचार करून बघा की इतर देशांत सुरूप दिसायला जे लागतं, त्यापेक्षा आमच्या देशात कितीतरी जास्त लागतं, का की आमच्या शरीराचा पुष्कळसा भाग उघडा असतो. इतर देशांत कपड्यालत्त्यांनी झाकून कुरूपाला सुरूप करण्याचा सारखा प्रयत्न चालला असतो.

हिंदू सुरेख, युरोपियन धडधाकट

परंतु शरीरस्वास्थ्याच्या बाबतीत मात्र पाश्चात्त्य आमच्यापेक्षा पुष्कळ सुखी आहेत. त्या साऱ्या देशांमधे ४० वर्षांच्या माणसाला जवान म्हणतात, पोरगा म्हणतात; ५० वर्षांची स्त्री तिकडे तरणी. अर्थातच ते चांगलं खातात, कपडेबिपडे चांगले नेसतात, हवामान तिकडचं चांगलं, आणि या सगळ्यापरीस महत्त्वाची गोष्ट म्हणजे लहान वयात लग्न करीत नाहीत. आमच्या देशातही ज्या चारदोन बलवान जाती आहेत त्यांना पुसून बघा, कितव्या वर्षी लग्न करतात ते. गुरखे, पंजाबी, जाट, आफ्रिडी वगैरे पहाडी लोकांना विचारा. त्यानंतर शास्त्र वाचून बघा – ३०, २५, २०, अशी अनुक्रमे ब्राह्मण, क्षत्रिय नि वैश्यांची लग्नाची वये त्यात आढळतील. आयू, बल वीर्य वगैरे बाबतीत पाश्चात्त्यांत आणि आमच्यात फार फरक. आमचे बल, बुद्धी आशा तिशी उलटली की खलास. ते त्या वयात आयुष्याला कुठे सुरुवात करीत असतात.

आमचा मृत्यू अधिकांश उदररोगांनी, त्यांचा हृदयरोगांनी

आम्ही शाकाहारी, आमचे अधिकांश रोग पोटाचे. आमच्याकडील म्हातारे-म्हाताऱ्या साधारणत: पोटाच्या त्रासाने मरतात. ते लोक मांसाहारी,

त्यांचे बरेचसे रोग छातीचे. हृदयाच्या, फुफ्फुसांच्या रोगाने तिकडील बुड्ढे-बुढ्या गचकतात. तिकडच्या माझ्या एका विद्वान डॉक्टर मित्राने मला विचारले की, "पोटाच्या रोगाने ग्रासलेले लोक काय प्राय: निरुत्साही नि वैराग्यवान होतात? शरीराच्या हृदयादी वरच्या भागाच्या रोग्यांत आशा, विश्वास पुरेपूर असतो. पटकीचा (कॉलऱ्याचा) रोगी आधीपासूनच मरणाच्या भयानं थरकापत असतो. उलट क्षयरोग्याचा मरणाच्या वेळेपर्यंत विश्वास असतो की मी बरा होईन. म्हणूनच का भारतातले लोक सदासर्वदा मरण-मरण नि वैराग्य-वैराग्य करतात?" मी तर अजूनही त्या माझ्या डॉक्टर मित्राला उत्तर देऊ शकलो नाही, परंतु त्याचं म्हणणं विचार करण्यासारखं आहे खरं.

आमच्या देशात दातांचे रोग, केसांचे रोग खूप कमी. त्या साऱ्या देशांत फार थोड्या लोकांचेच नैसर्गिक दात असतात. अन् टकलांची खैरात. आम्ही नाक टोचतो, कान टोचतो – दागिने घालण्यासाठी. त्यांच्यांतल्या वरच्या वर्गांतल्या स्त्रिया आजकाल फारशा नाक-कान टोचीत नाहीत. परंतु डौलदार दिसण्याच्या वेडाने पछाडल्या गेल्याने कंबर बांधबांधून नि पाठीचा कणा वाकवाकवून प्लीहा, यकृत, चाळवून त्या शरीरं कशी उलट बेढब करून टाकीत असतात. 'डौल' 'डौल' करीत सारख्या तडफडत असतात.

पोशाख

त्यांत परत कपड्यांच्या बस्त्याची भर – देह शक्य तितका डौलदार दिसावा म्हणून. पाश्चात्त्य पोशाख कामकाजासाठी मोठा सोयीचा. श्रीमंत लोकांच्या बायकांचा समाजात वावरण्यासाठीचा पोशाख सोडून दिल्यास तिकडच्या सर्वसाधारण स्त्रियांचा पोशाख ढच्चडच. आमच्या स्त्रियांची साडी आणि पुरुषांचा अंगरखा-फेटा ह्यांच्या सुरेखपणाला जगात तोड नाही. स्वाभाविकपणे चुण्या पडणारे सैल कपडे जितके सुरेख दिसतात तितके घट्ट कपडे दिसत नाहीत. आमचा पोशाख सगळाच सैल सैल असतो, त्यामुळे तो कामकाजाच्या दृष्टीने सोयीचा नाही. त्याने काम करू गेल्यास कपडे खराब होऊन बेकाम होऊन जातात. त्यांची फॅशन कपड्यात, आमची दागिन्यांत.

आजकाल थोडी थोडी कपड्यातही शिरत आहे. फॅशन म्हणजे काय? तर – तऱ्हा, पद्धत. स्त्रियांच्या कपड्यांची तऱ्हा पॅरीस शहरातून निघते, पुरुषांच्या कपड्यांची लंडनहून. पूर्वी पॅरीसच्या नट्या ह्या तऱ्हांचा कित्ता घालून देत. एखाद्या प्रसिद्ध नटीने एका तऱ्हेचा पोशाख केला की धावल्याच सगळ्या साळकायामाळकाया तिचा कित्ता गिरवायला. आजकाल कपडे तयार करणारे मोठमोठे दुकानदार या तऱ्हा घडवितात. पाश्चात्त्य देशांतून दरवर्षी या पोशाखांवर म्हणजे किती कोटी रुपये खर्च होतात ह्याची आपल्याला कल्पनाही करता यावयाची नाही. पोशाख बनविणे ही तिकडे एक मोठी विद्याच होऊन बसली आहे. कोणत्या मुलीच्या अंगाच्या नि केसांच्या रंगाला कोणते कापड शोभून दिसेल, कुणाच्या शरीराचं कोणतं वैशिष्ट्य झाकावं लागेल, कोणतं प्रामुख्यानं उघडं ठेवावं लागेल इत्यादी अनेक मुद्यांवर गंभीर विचार करून मगच पोशाख तयार केला जात असतो. त्यानंतर, चार-दोन बड्या घरच्या स्त्रिया जशी करतील तशीच वेशभूषा इतर सगळ्यांनी करणे भाग! एरवी जात बाटेल ना!! ह्याचं नाव फॅशन!

अन् ही फॅशन घडोघडी बदलते. वर्षातल्या चार ऋतूंबरोबर चारदा तर ती बदलतेच, त्याशिवाय आणखीही पुष्कळदा. बडे लोक चांगल्या चांगल्या नाणावलेल्या शिंप्यांकडून ताज्या फॅशनचे पोशाख करवून घेतात. मध्यम वर्गातले सभ्य लोक थोडंसं हातानं, लहानमोठं थोडं बाई शिंप्यांकडनं घरी, असं करून नवनव्या धर्तीचे पोशाख बनवितात. नवी फॅशन जर जुनीशी बरीच जुळती असेल तर त्याच कपड्यात बदलबिदल करतात, आणि ते जमण्यासारखे नसेल तेव्हा नवेच कपडे करतात. बडे लोक प्रत्येक ऋतूत फॅशनबाह्य झालेले कपडे नोकराचाकरांना देऊन टाकतात. मध्यमवर्गीय विकतात. हे असले कपडे मग आफ्रिका, आशिया, ऑस्ट्रेलिया वगैरेंमधे युरोपियनांच्या ज्या वसाहती आहेत तिथे जाऊन पोहोचतात नि तिथले लोक मग ते वापरतात. जे खूपच पैसेवाले असतात त्यांचे पोशाख पॅरीसहून तयार होऊन येतात. बाकीचे स्वत:च्याच देशात त्यांची नक्कल करून वापरतात!

परंतु स्त्रियांची हॅट मात्र अस्सल फ्रेंच असलीच पाहिजे. जिची नाही ती लेडीच नव्हे. खरं म्हटल्यास इंग्रज आणि जर्मन स्त्रियांचा पोशाख अगदी रद्दी. त्या पॅरिसच्या धर्तीचा पोशाख वापरीत नाहीत – अर्थातच मूठभर बड्या घरच्या स्त्रिया सोडून. म्हणून इतर देशांतल्या स्त्रिया त्यांची थट्टा करतात. इंग्रज पुरुषांचा पोशाख मात्र खूप छान असतो – बहुतेकांचाच. अमेरिकेतील स्त्री-पुरुष दोघेही मोठे फॅशनेबल पोशाख वापरतात. विदेशी माल आपल्या देशात न येवो म्हणून अमेरिकन सरकार पॅरीस किंवा लंडनहून आयात होणाऱ्या पोशाखांवर खूप कर बसविते. तरीसुद्धा तो कर सोसूनही स्त्रिया पॅरीसला नि पुरुष लंडनला बनलेले पोशाखच वापरतात. नाना प्रकारचे नाना रंगाचे लोकरी, रेशमी कापड दररोज निघत असते, लाखो लोक ते काढण्याच्या पाठीमागे असतात, नि लाखो लोक ते कापून-बेतून पोशाख बनविण्यात गढले असतात. पोशाख ठीक धर्तीचा न झाल्यास जंटलमनला किंवा लेडीला घराबाहेर पडणेही मुश्कील. आमच्या देशात फॅशनचा धुमाकूळ कपड्यात नसला तरी पुष्कळसा दागिन्यांत शिरला आहे. त्या देशांतील लोकर, रेशीम वगैरे काढणाऱ्यांची नजर रात्रंदिवस असते – काय बदलतं काय नाही, लोकांना कोणत्या प्रकारचं पसंत पडतं, याकडे. किंवा नवीन काहीतरी एखादं काढून ते लोकांची मनं तिकडे आकर्षून घेण्याचा प्रयत्न करीत असतात. एकदा का अंदाज लागला की तो व्यापारी खूप गबर होऊन जातो. ज्या वेळी तिसरा नेपोलियन फ्रान्स देशाचा राजा होता, त्या वेळी राणी युजेनी (Eugenie) पाश्चात्त्य जगताच्या वेषभूषेची अधिष्ठात्री देवता होती. तिला काश्मीरी शाल फार आवडत असे. त्यामुळे लाखों रुपयांच्या शाली युरोपात दरवर्षी खपत. नेपोलियनच्या पतनानंतर ती फॅशन बदलली. झालं, शालींची विक्रीही थांबली. अन् आमच्या देशातले लोक म्हणजे पक्के गतानुगतिक. संधी साधून वेळेनुसार नवीन काहीतरी करून ते युरोपचा बाजार कब्ज्यात ठेवू शकले नाहीत. काश्मीरला जबरदस्त धक्का बसला. मोठमोठे सौदागर गरीब होऊन गेले.

मौलिकतेच्या (Originalityच्या) अभावानेच आमची अवनती

हे जग – धरशील तर तुझे, न धरशील तर माझे. कुणी काय कुणासाठी थांबणार आहे? ते लोक जणू दहा डोळ्यांनी परिस्थिती बघतात नि दोनशे हातांनी काम करतात. अन् आम्ही? ''पोथीत जे लिहिलेलं नाही ते कधी करणार नाही''. – हा आमचा बाणा. स्वत:चं, नवीन असं कधी काही करणार नाही – अन् ह्या गतानुगतिकतेमुळे तसं काही करण्याची आमची शक्तीही पूर्णपणे लोपून गेली आहे. देशभर अन्नासाठी हाहाकार! दोष कुणाचा? परिस्थितीला तोंड देण्याच्या प्रयत्नांच्या नावाने बोंब. फक्त वायफळ ओरडाओरड नुसती! बस्. सांदीतून बाहेर पडणार नाही, दुनिया काय हे डोळे उघडून बघणार नाही. तसं करा, बघाल, आपोआप सारं काही सुचायला लागेल. देवासुरांची गोष्ट तर जाणताच. देव आस्तिक – आत्म्यावर विश्वास ठेवणारे, ईश्वरावर, परलोकावर विश्वास ठेवणारे. असुर म्हणतात – इहलोकाचा, ह्याच पृथ्वीचा उपभोग घ्या, ह्या शरीराचंच सुख बघा. देव चांगले की असुर चांगले हा इथे प्रश्न नाही. उलट पुराणातले असुरच तर कसे 'मनुष्य वाटतात बुवा – मर्द दिसतात! देव तर त्या मानाने कितीतरी कमी दर्ज्याचे वाटतात – पुचाट, शेळपट!' आता, तुम्ही म्हणजे देवांचे बच्चे आणि पाश्चिमात्य म्हणजे असुरांचे वंशज असे मानले तर हे दोन देश चांगले कळू शकतील!

शरीरशुद्धीच्या बाबतीत प्राच्य आणि पाश्चात्त्य यांची तुलना

बघा ना, शरीरापासूनच आरंभ करा. शरीराच्या स्वच्छतेसंबंधी दोघांच्या काय कल्पना आहेत त्याच आधी बघू या. पवित्रता म्हणजे आंतली नि बाहेरची शुद्धी. ती बाहेरची, म्हणजे शरीराची शुद्धी होते माती, पाणी वगैरेंच्या मदतीने. ठीकच आहे. दुनियेत अशी जात आणखी कुठे नाही की ज्यांची शरीरे हिंदूंच्याइतकी स्वच्छ आहेत. शौचाला पाणी हिंदूंखेरीज आणखी कोणतीही जात वापरत नाही. तरी बरं, पाश्चात्त्यांना चिनी लोकांनी कागद वापरायला शिकवलं आहे – थोडी तरी समाधानाची गोष्ट! आंघोळही नाही म्हटली तरी

चालेल. आजकाल इंग्रजांनी भारतात येऊन स्वतःच्या देशात आंघोळीचा पायंडा पाडला आहे. तरीसुद्धा जी सारी भारतीय पोरं विलायतेतून शिकून आली आहेत त्यांना विचारा – तिकडे स्नानाचा किती त्रास असतो ते. तिकडचे लोक जे स्नान करतात – म्हणजे आठवड्यांतून एक दिवस – ते त्या दिवशी अंडरवेयर वगैरे आतील कपडे बदलतात. आता, आजकाल पैसेवाल्यांपैकी बरेचजण रोज आंघोळ करतात हे वेगळे. अमेरिकेमधे अशांची संख्या जरा जास्त. जर्मनीत स्नान अधूनमधून! फ्रान्स वगैरेंत तेही नाही!! स्पेन, इटली वगैरे देश फार गरम, पण त्यांची तर फ्रान्सवरही कडी! लसणाचे कंदामागून कंद फस्त करायचे, रात्रंदिवस घामायचं, आणि स्नानाचं नाव नाही! सात जन्मांत अंगापाण्याची गाठ नाही. त्या अंगाच्या वासाने भूतच काय पण भुताचे बापजादे, आजे-पणजे-खापरपणजेही धूम ठोकतील – भूत तर बापडे कच्चे पोर त्या मानाने! 'स्नान' म्हणजे काय? तर डोके, तोंड धुणे, हातबीत धुणे - जेवढे भाग लोकांना दिसतात तेवढ्यांना पाणी लावणे. बस्, आटोपले स्नान! पॅरीस – आधुनिक सभ्यतेची राजधानी पॅरीस, ऐषआराम-फॅशन-भोगविलासांचा पृथ्वीवरील स्वर्ग पॅरीस, विद्या-शिल्पाचे केंद्र पॅरीस – अशा त्या पॅरीसला एका वर्षी एका खूप धनाढ्य मित्राने मला आवर्जून बोलाविले होते. गेलो. एका राजवाड्यासारख्या टोलेजंग झकास हॉटेलमधे अस्मादिकांची उतरण्याची सोय करण्यात आली होती. खाण्याबिण्याचा थाट अगदी राजशाही. आंघोळीचे मात्र नावही नाही. दोन दिवस तर कसंतरी सहन केलं. मग मात्र अगदी अशक्य झालं. अखेर मित्राला म्हणावं लागलं की "गड्यारे, तुझा हा राजशाही थाट तुलाच लखलाभ असो, मी अगदी आदमुसा झालो आहे, तेव्हा माफ कर बुवा! कसले भलतेच गरम दिवस हे, अन् स्नान करण्याची सोय नाही, कुत्र्यासारखं पिसाळण्याची वेळ येऊन ठेपली आहे." ऐकून मित्राला वाईट वाटलं. त्या हॉटेलवर रागावून तो मला म्हणाला, "ह्या असल्या हॉटेलात आणखी राहण्याची काही गरज नाही, चला आपण दुसरी एखादी जागा धुंडाळून काढू." एकामागून एक बारा मुख्य मुख्य हॉटेल

धुंडाळली, स्नानाच्या नावाने सर्वत्रच शंख. वेगळी स्नानगृहं असतात, तिथे जाऊन ४-५ रुपये मोजून एकदा स्नान करता येण्यासारखं असतं. घ्या! आहे की नाही मजा? त्याच दिवशी तिसऱ्या प्रहरी वर्तमानपत्रात माझ्या वाचण्यात आलं की एक म्हातारी स्नान करायला म्हणून टबात बसली ती मुळी उठलीच नाही, तिथेच आटोपली! डॉक्टर लोक काहीही म्हणोत, माझे मात्र तिच्याविषयी ठाम मत आहे की उभ्या जन्मात त्या म्हातारीच्या चामडीला इतक्या पाण्याचा तो पहिलाच स्पर्श होता. तो न सोसल्यामुळेच गलंडली म्हातारी!! या बातमीतलं एक अक्षर देखील खोटं किंवा आपलं काहीतरी फुगवून सांगितलेलं नाही हं. रशियनबिशियन तर या बाबतीत शंभर नंबरी म्लेंच्छ. कमालीचे ओंगळ. तिबेटापासून पुढे सर्वत्र हाच खाक्या. अमेरिकेत मात्र प्रत्येक राहत्या घरात एकेक अंग धुण्याची खोली नि पाण्याचा नळ यांची व्यवस्था असते.

तरीपण फरक बघा – आपण लोक स्नान करतो. का बरं? तर, अधर्माच्या भयानं. न केल्यास पाप लागेल म्हणून. पाश्चिमात्य लोक हात-तोंड धुतात – स्वच्छ होण्यासाठी म्हणून. आमचं स्नान म्हणजे पाणी ओतलं की झालं, मग अंगाला तेल तसंच बचबच चोपडलेलं राहो की मळ तसाच चिकटलेला राहो. डोक्यावरून भडाभड तांबे उपडे करण्याशी काम. त्यांतच परत आमचे दक्षिणी बांधव लंबंचवडं असलं काही गंध लावत असतात की ते घासून काढण्याची वज्राची देखील बिशाद नाही! पुन्हा, आमचं स्नान म्हणजे अगदी सोपी गोष्ट. कुठेही एकदा बुचकळून निघालों की आटोपलं स्नान. त्या लोकांचं तसं नाही. त्यांचं स्नान म्हणजे आधी अंगावरच्या बस्ताभर कपड्यांचा खोगीर उतरवा. त्यांत गुंड्या अन् पट्टे तरी किती! उघडं शरीर दाखवायची आम्हाला मुळीच लज्जा वाटत नाही. त्या लोकांना फार वाटते. आता, पुरुषांपुरुषांत त्यांनाही चालतं म्हणा. बाप पोरासमोर उघडा झाला तरी हरकत नसते. बायामाणसांसमोर मात्र पायापासून डोक्यापर्यंत झाकायला हवं.

'बाह्य आचार' अथवा बाहेरची स्वच्छता इतर आचारांप्रमाणे कधीकधी

अत्याचार किंवा अनाचार होऊन बसत असते. युरोपियन म्हणतात की शरीरासंबंधीची सगळी कार्ये अगदी एकीकडे एकान्तात करणं उचित – अगदी खाजगी रीतीने. ठीकच आहे. अगदी उत्तम गोष्ट. हे शौच वगैरेचं तर राहूच द्या, लोकांसमोर थुंकणेही त्यांच्या लेखी अत्यंत असभ्यपणाचं. जेवून सगळ्यांसमोर आचवणं अगदी वाईट. आचवताना चुळा भराव्या लागतात ना? म्हणून. त्याचीही लाज. लोकांच्या लाजेनं जेवून-खाऊन तोंड फक्त बाहेरून पुसून स्वस्थ बसतात. इकडे हळूहळू दातांचा सत्यानाश. हा झाला सभ्यतेच्या भयाने अनाचार. आमचं अगदी उलट – बिलकूल दुसरं टोक. सगळ्या दुनियेतल्या लोकांसमोर, ऐन रस्त्यावर जेठा मारून दोन बोटांनी जीभ साफ करीत ओकाऱ्या काढीत काढीत ते आमचं तोंड धुणं, ते चारचौघात तोंड वेडीवाकडी करीत दात घासणं, ते सगळ्यांसमोर खळाळून-खळाळून आचवण! आहाहा! हा झाला अत्याचार. ह्या साऱ्या गोष्टी खाजगी रीतीने एकान्तात एकीकडे आटोपणं केव्हाही उचित, प्रश्नच नाही. परंतु लोकलाजेखातर त्या नच करणं मात्र अगदी अनुचित.

आता, हवामान वगैरेंच्या भेदानुसार जी चालचलणूक-वागणूक अगदी टाळताच येण्यासारखी नसते ती चांगली मानून समाज तिच्याशी जुळतं घेत असतो. आपला उष्ण देश, जेवायला बसलो की अर्धी कळशी पाणी आपण फस्त करतो. मग ढेकर न देऊन कसं चालणार? परंतु असं ढेकर देणं पाश्चात्त्य समाजात अत्यंत असभ्यपणाचं मानलं जातं. पण त्यांच्याकडे, जेवता जेवता खिशातून रुमाल काढून छान फर्र फर्र करीत नाक शिंकरलं तरी चालतं – ते तितकसं वाईट गणलं जात नाही. आपल्याला ते पराकाष्ठेचं किळसवाणं वाटेल. त्यांचा देश थंड, तिथे मधून मधून नाक शिंकरल्याखेरीज राहवत नाही.

आपण घाणीची अत्यंत घृणा करतो, पण प्रत्यक्षात मात्र पुष्कळदा साक्षात घाणच झालेले असते! घाणीची आपण इतकी घृणा करतो की शिवल्यास आंघोळ करावी लागते. न जाणो तिचा स्पर्श होईल या भयानं

आपण साऱ्या घरादारातील घाण काढून फेकतो – कुठे? दाराशी! दाराजवळ कुजत असतात घाणीचे ढीग आपल्या! विटाळाचं फार भय असतं ना आपल्याला, म्हणून! दाराशी पडली राहो – न शिवलं म्हणजे झालं! पण इकडे म्हणजे साक्षात नरकात नांदणं होत आहे त्याची काय वाट? एका अनाचाराच्या भयानं दुसरा एक महाघोर अनाचार करणं. एक पाप टाळण्यासाठी आपण आणखी एक जास्त मोठं पाप करीत असतो. ज्याच्या दाराशी असा उकिरडा तो पापी, यात काय संशय? आणि त्या पापाबद्दल शिक्षा त्याला मेल्यानंतर मिळायची नाही. पुढच्या जन्माची वाट पाहावी लागणार नाही – याच जन्मी झक्क अद्दल घडेल.

आहारासंबंधी प्राच्य आणि पाश्चात्य आचारांची तुलना

आमच्या स्वैंपाकासारखा स्वच्छ स्वैंपाक आणखी कुठेही नाही. पण त्याचबरोबर जेवण्याच्या विलायती पद्धतीतला नीटनेटकेपणा, स्वच्छता, पद्धतशीरपणा वगैरे आमच्याकडे नाही. स्वैंपाकघरात शिरण्यापूर्वी आमचा स्वैंपाकी स्नान करतो, कपडे बदलतो, स्वैंपाकाची सारी भांडीकुडी घासून पुसून धुऊन घेतो, चूलवैल सारं सारवून साफ करून घेतो. नाक-तोंड-अंगाला हात लागला तर लागलीच तो धुऊन मगच खाण्याच्या पदार्थांना लावतो. विलायतेतील स्वैंपाक्याच्या चौदा पिढ्यांत कुणी आंघोळ केली नसते. स्वैंपाक करता करता चाखून पाहतो नि तोच चमचा तसाच परत अन्नाच्या भांड्यात घालतो! खिशातनं रुमाल काढून छान झडझडून नाक शिंकरून झालं की रुमाल खिशात नि हात तसेच फसकन् कणकेच्या गोळ्यात! राजेश्री शौचाहून आले – कागद वापरला तिथे. परत आल्यावर तो हात धुवायची गरज नाही – तसेच सरळ लागले स्वैंपाकाला. पण इकडे कपडे बघाल तर अगदी बगळ्यासारखे पांढरे पांढरे शुभ्र. डोईवर तसलाच चक्क एक टोप. कदाचित एका मोठ्या लाकडी टपात दोन माणसं उघडीबंब उभी आहेत – भिजल्या कणकेच्या ढिगावर नाचताहेत. काय तर म्हणे कणीक तिंबणं चाललंय्! उन्हाळ्याचे दिवस – कपाळाचा घाम पायांवरून ओघळत ओघळत त्या पेंडात

तुडवला जाऊन सुरेख एकजीव होतो आहे! त्यानंतर त्या कणकेची पावरोटी जेव्हा तयार होते तेव्हा मात्र मग ती चिनीमातीच्या एका चकचकीत बशीत घालून तिच्यावर एक पांढरा पांढरा शुभ्र स्वच्छ रुमाल झाकून, स्वच्छ जामानिमा केलेल्या, कोपरापर्यंत पांढरे स्वच्छ हातमोजे घातलेल्या खानसाम्याकरवी स्वच्छ चादर हांतरलेल्या टेबलावर स्वच्छपणे आणून हजर केली जाते! कोपरापर्यंत स्वच्छ हातमोजे – हो, न जाणो त्या खानसाम्याची उघडी बोटे तिला लागतील या भयाने!!

आमचा स्वैपाकी जातीने ब्राह्मण, स्नान आटोपून शुचिर्भूत होऊन घासूनपुसून स्वच्छ केलेल्या भांड्यांमधे स्वैंपाक करतो. आणि मग एका ताटामधे सारे वाढून ते ताट तुमच्यापुढे शेणाने सारवलेल्या जमिनीवर आणून पटकतो. स्वैपाक्याचे कपडे बघावेत – मळकट, कळकट, घामट. पण रोज धुतलेले! मात्र कधी एकदा तरी धुतले असतील की नाही याची शंका यावी असे! कधीकधी ताट नसतं. केळीचं पान वापरलं असत. ते पान जर फाटलेलं असेल तर मग पाहायलाच नको. पानावरच्या भाजीचा रस नि पानाखालची भिजट माती, घाण, सारवणाचे शेण यांचा मिलाफ होऊन जो एक अपूर्व स्वाद निर्माण होतो तो काय वर्णावा!!

आम्ही मारे स्नान करून एक तेलकट, मळकट वस्त्र नेसतो. युरोपात मळक्या अंगाने, स्नानबिन काही न करता झक्क पांढरा सफेद पोशाख़ चढवितात. हे चांगलं नीट समजून घ्या. त्यांच्या आणि आमच्यातील फरकाचे हे अगदी मूळ. हिंदूंची ही जी अंतर्भूत दृष्टी आहे, ती त्यांच्या अगदी प्रत्येक प्रत्येक कामात दिसून येते. तशीच पाश्चात्त्यांची बहिर्मुख दृष्टी त्यांच्या सर्व कामात. हिंदू लोक चिंध्याचांध्यांत हिरा गुंडाळून ठेवतात. पाश्चिमात्य लोक सोन्याच्या डबीत ठेवतात – मातीचं ढेकूळ! हिंदूंचं शरीर स्वच्छ झालं म्हणजे झालं, मग कपडे कसेही असोत. पाश्चात्त्यांचे कपडे साफसुफ असले म्हणजे झालं, अंगाला घाण राहो राहिली तर! हिंदूंचं घरदार झाडून-सारवून साफ, बाहेर ऐन दाराशीच मग नरक असला तरी बिघडत नाही! पाश्चिमात्यांच्या

घरातल्या जमिनीवर संतरंजी आंथरलेली – स्वच्छ, चक्क! घाण, धूळ सारी त्या संतरंजीखाली झाकली गेली असली म्हणजे झालं!! हिंदूंची नाली रस्त्यावर, उघडी – वास सुटला तरी काही हरकत नाही. पाश्चात्त्यांची नाली रस्त्याखाली, भूमिगत – टायफॉईड रोगाचं वसतिस्थान!! हिंदू करीत आहेत आतली सफाई, पाश्चात्त्य करीत आहेत बाहेरची सफाई!

हवंय् काय? – दोन्ही. स्वच्छ शरीर, त्यावर स्वच्छ कपडे. तोंड धुणं, दात घासणं सगळं हवं – फक्त अमळ एकीकडे बसून. घर स्वच्छ हवं. रस्तेही स्वच्छ हवेत. स्वैंपाकी स्वच्छ हवा, स्वच्छ हातचा स्वैंपाक हवा. स्वच्छ, मनोरम जागी स्वच्छ पात्रात जेवण व्हायला हवं. 'आचार: प्रथमो धर्म:' (मनु.१,१०८). धर्मातली पहिली गोष्ट म्हणजे आचार! आणि आचारातली पहिली गोष्ट म्हणजे स्वच्छता – सर्व प्रकारची स्वच्छता, सर्वांगीण स्वच्छता – आतली बाहेरची दोन्ही प्रकारची स्वच्छता. आचारभ्रष्टाकडून कधी धर्म होईल? अनाचाऱ्याला किती दु:खे भोगावी लागतात, पाहत नाही? पाहूनही शिकत नाही? इतकी जबरदस्त किंमत देऊनही धडा घ्यायचा नाही? इतका कॉलरा, मलेरिया, प्लेग इतक्या साथी – कुणाचा दोष? दोष आमचाच. आम्ही महा अनाचारी आहोत.

''आहारशुद्धौ सत्त्वशुद्धिः सत्त्वशुद्धौ ध्रुवा स्मृतिः'' –

"आहार शुद्ध असल्याने मन शुद्ध होते, मन शुद्ध झाल्याने आत्म्यासंबंधी अढळ स्मृती उदय पावते" – हे शास्त्रवाक्य आमच्या देशातील सर्वच संप्रदाय मानतात. तथापि शंकराचार्यांच्या मताने 'आहार' शब्दाचा अर्थ 'इंद्रियजनित ज्ञान', तर रामानुजाचार्यांच्या मते 'खाद्य पदार्थ'. या बाबतीत सर्वांनाच पटण्यासारखा सिद्धान्त असा की हे दोन्ही अर्थ बरोबर आहेत. खाणे विशुद्ध नसल्यास इंद्रिये सारी नीट रीतीने काम करणार तरी कशी? वाईटसाईट खाल्ल्याने सगळ्या इंद्रियांची ग्रहणशक्ती खालावते किंवा भडकते हे अनुभवाने सगळ्यांनाच माहीत आहे. अपचनाने दृष्टी बिघडून एक वस्तू दुसरीच भासून भूल पडते, आणि खाण्याच्या अभावी पाहण्यावगैरेच्या शक्ती

मंदावतात हे आपण सर्वच जाणतो. त्याचप्रमाणे हे देखील पुष्कळदा पाहण्यात येते की, काही एखादी विशिष्ट गोष्ट खाल्ल्याने शरीराच्या आणि मनाच्या अवस्थेत विशिष्ट बदल घडतो. आमच्या समाजात खाद्याखाद्यांसंबंधी जे इतके नियमबियम आहेत, त्या साऱ्यांच्या मुळाशी हेच तत्त्व आहे. आता हे खरे की या बाबतीत आजकाल आपण पुष्कळदा मुख्य गोष्ट विसरून तिच्या बाह्य कवचाचीच ओढाताण करीत असतो, तेच आपण उराशी धरून बसतो.

रामानुजाचार्य आपल्याला खाद्यपदार्थांसंबंधी तीन दोष टाळायला सांगतात. पहिला जातिदोष – म्हणजे जो दोष जात्याच त्या पदार्थाच्या अंगी असतो तो. जसे, कांदे, लसुण वगैरे उत्तेजक पदार्थ खाल्याने मन चंचल होते. अर्थात बुद्धी चळते. दुसरा आश्रयदोष – विशिष्ट व्यक्तीच्या स्पर्शाने खाद्यपदार्थांत हा दोष निर्माण होतो. दुष्ट माणसाचे अन्न खाल्याने दुष्ट बुद्धी होईलच, सज्जनाच्या अन्नाने सद्बुद्धी जागेल, इत्यादी. आणि तिसरा म्हणजे निमित्तदोष. घाण, धूळ, किडे, केस वगैरे पडल्याने अन्नाला जो दोष लागतो त्याला निमित्तदोष म्हणतात. या निमित्तदोषाने दूषित झालेले अन्न खाल्ल्यानेही मन अपवित्र होते. यांपैकी जातिदोष आणि निमित्तदोष या दोन दोषांपासून बचावण्याचा प्रयत्न करणे सर्वांनाच शक्य आहे. आश्रयदोषापासून बचावणे मात्र सगळ्यांच्या पक्षी सोपे नाही. या आश्रयदोषापासून बचावण्यासाठीच आमच्या देशात 'सोवळ्या ओवळ्या'चं नि 'विटाळचंडाळा'चं इतकं प्रस्थ - सारखा 'शिवू नका' 'शिवू नका' हा धोशा. आता, या बाबतीत पुष्कळदा अगदी उलटे समजून भलताच विपर्यास केला जातो आणि प्रयोजन किंवा तात्पर्य लक्षात न घेता वागत गेल्यामुळे अगदी चमत्कारिक खुळचटपणा माजतो, अगदी तऱ्हेवाईक नि हास्यास्पद, वेडगळ रूढींचा सुळसुळाट होतो यांत काहीच संशय नाही. अशा परिस्थितीत लोकाचार वा रूढी सोडून लोकगुरू अशा महापुरुषांचे आचारच ग्रहणीय होत. श्री चैतन्यदेवप्रभृती जगद्गुरूंची जीवने वाचा व बघा की ते या बाबतीत कसे वागले आहेत. असो. अन्नाचा जातिदोष टाळण्यासंबंधी सांगावयाचे झाल्यास म्हणता येईल की या

बाबतीत अजूनही भारतवर्षापासून जितके शिकण्यासारखे आहे तितके पृथ्वीच्या पाठीवरील आणखी कुणापासूनही नाही. समस्त भूमंडलामध्ये आमच्या देशातल्याइतक्या पवित्र द्रव्यांचा आहार होत असेल असा आणखी एकसुद्धा देश नाही. राहिला तिसरा म्हणजे निमित्तदोष. या निमित्तदोषासंबंधी सध्या भारतात फारच भयंकर परिस्थिती निर्माण झाली आहे. हलवायाचं दुकान, बाजारू खाणं, हे सारं या दृष्टीनं किती भयंकर अपवित्र असते हे निराळं सांगायला नकोच. निमित्तदोषानं किती भयंकर दूषित असतं ते सारं खाणं – उघडंवाघडं ठेवलेलं, धूळ-माती-घाण बसलेलं, शिळंपाकं, नासकं, माशा घोंघावत असलेलं, किडे-मुंग्यां पडलेलं – काय नसतं त्यात? फळही त्याचं तसंच भोगावं लागत आहे. हे जे घरोघरी अजीर्ण-अपचन बोकाळलं आहे, ते सारं हलवायाच्या दुकानाचं, बाजारू खाण्याचं फळ. शहरांतून हा जो मधुमेहाच्या रोग्यांचा भलताच सुकाळ झाला आहे, तो सारा त्याच हलवायांच्या दुकानांचा प्रताप. खेड्यांतून तितकासा अजीर्णाचा त्रास नाही, मधुमेहाचा तितकासा फैलाव नाही याचं मुख्य कारण म्हणजे पुरी-कचोरी प्रभृति 'विषा'चा तिथे तेवढासा प्रसार नसतो हेच होय. या बाबतीत सविस्तर पुढे सांगीनच.

शाकाहार आणि मांसाहार

हे तर झाले खाण्यापिण्यासंबंधीचे प्राचीन सर्वसामान्य नियम. या नियमांसबंधी बराच मतभेद जुन्या काळीही होता आणि आजही चालूच आहे. पहिला म्हणजे, जुन्या काळापासून तहत आजपर्यंत एक मोठ्ठा वाद चालू आहे – शाकाहार की मांसाहार? मांस खाणे उपकारक की अपकारक? याखेरीज, जीवहत्त्या न्याय्य की अन्याय्य हा एक मोठा वादग्रस्त मुद्दा आहे नेहमीचाच. एक पक्ष म्हणतो – "कोणत्याही कारणास्तव हत्यारूपी पाप करणे उचित नव्हे". तर दुसरा पक्ष म्हणतो – "राहू द्या हो तुमची बडबड. हत्त्या केल्याखेरीज जिवंत राहणेच शक्य नाही." शास्त्रातही या बाबतीत भिन्न भिन्न मते आढळून येतात नि त्यामुळे गोंधळात आणखीच भर पडते. शास्त्र एकदा

म्हणते की यज्ञप्रसंगी हत्त्या करा, तर दुसऱ्यांदा म्हणते की जीवघात करू नका. हिंदूंनी सिद्धान्त बांधला की यज्ञाखेरीज अन्यत्र हत्त्या करणे पाप, परंतु यज्ञ करून खुशाल मांसभोजन करा. इतकेच काय पण गृहस्थासाठी असे अनेक नियम आहेत की तदनुसार त्या त्या प्रसंगी हत्त्या न केल्यास पाप लागेल. उदाहरणार्थ श्राद्ध वगैरे. या साऱ्या प्रसंगी जेवायला जाऊन मांस न खाल्ल्यास पशूचा जन्म येतो असं मनू म्हणतात. दुसरीकडे जैन, बौद्ध नि वैष्णव म्हणतात की तुमचं असलं शास्त्र आम्ही मानत नाही, हत्त्या कदापि केली जाऊ नये. बौद्ध सम्राट अशोक, जो यज्ञ करील वा जेवायला बोलावून मांस खाऊ घालील त्याला सजा देत असे. आधुनिक वैष्णव बिचारे मोठ्या मुश्किलीत पडले आहेत! त्यांचे देव राम वा कृष्ण मद्यमांस झक्क उडवीत असत – रामायण-महाभारतात पुरावे आहेत! सीतादेवीने गंगेला मांस, भात आणि हजार कळशा दारू यांचा नवस केला होता.* आज कुणी शास्त्रांचही ऐकायला तयार नाही अन् महापुरुष म्हणतात म्हणूनही ऐकायला तयार नाही.

पाश्चात्त्य देशांत वादावादी चालली आहे – मांस खाल्ल्याने रोग होतात काय, शाकाहारी निरोगी असतात काय, यावर. एक बाजू म्हणते, मांसाहाऱ्यांना तऱ्हतऱ्हेचे रोग जडतात. दुसरी बाजू म्हणते – या साऱ्या गप्पा आहेत. थापा नुसत्या. तसं नसतं तर हिंदू निरोगी झाले असते आणि इंग्रज, अमेरिकन प्रभृती मुख्य मुख्य मांसाहारी जाती रोगांनी एव्हाना पार खलास होऊन जात्या. एक बाजू म्हणते की बकरा खाल्ल्यानं बकऱ्यासारखी बुद्धी

* सीताम् आदाय बाहुभ्याम् मधुमैरेयकं शुचि।
पाययामास काकुत्स्थः शचीम् इन्द्रो यताऽमृतम्।।
मांसानि च सुमिष्टानि फलानि विविधानि च।
रामस्याभ्यवहारार्थं किंकरास्तूर्णमाहरन्।। रामायण, उत्तर ५२
सुराघटसहस्रेण मांसभूतौदनेन च।
यक्ष्ये त्वां प्रीयतां देवी पुरीं पुनरुपागता।। रामायण, अयोध्या ५५
उभौ मध्वासवक्षिप्तौ उभौ चंदनचर्चितौ।
उभौ पर्यंकरथिनौ दृष्टौ मे केशवार्जुनौ।। महाभारत, आदिपर्व

होते, डुक्कर खाल्ल्यानं डुकरासारखी बुद्धी होते, मच्छी खाल्ल्यानं मच्छीसारखी बुद्धी होते. यावर दुसरी बाजू म्हणते की तर मग कोबी खाल्ल्यानं कोबीसारखी बुद्धी होते, बटाटे खाल्ल्यानं बटाट्यासारखी बुद्धी होते आणि भात खाल्ल्यानं भाताळ बुद्धी होते. हे जड, अचेतन पदार्थ खाऊन जड, अचेतन बुद्धी होण्यापेक्षा जिवंत, चेतन पदार्थ खाऊन चेतन बुद्धी झालेली बरी. एक बाजू म्हणते, वरण-भातात जे आहे, मांसातही तेच आहे. दुसरी बाजू म्हणते की हवेतही तेच आहे, मग तुम्ही हवाच खाऊन राहा. एक बाजू म्हणते की शाकाहार करूनही लोक खूप श्रम करू शकतात. दुसरी बाजू म्हणते की तसं असतं तर शाकाहारी जातीच सगळ्यात पुढे आल्या असत्या, पण वस्तुस्थिती उलट आहे, मांसाहारी जातीच नेहमी बलवान नि प्रधान ठरत आल्या आहेत. मांसाहाराची तरफदारी करणारे म्हणतात की, हिंदूंकडे नि चिन्यांकडे बघा – खायला मिळत नाही, भात खाऊन अन् हिरवा पाला खाऊन जगतात जन्मभर. बघा एकदा दुर्दशा त्यांची. अन् तेच जपान्यांकडे पाहा तेही एकदा असेच होते. पण त्यांनी मांसाहार सुरू करताच बघा एकदम त्यांचा कसा नूरच बदलून गेला आहे. भारतवर्षात दीड लाख हिंदी शिपाई आहेत. त्यांच्यापैकी कितीजण शाकाहारी आहेत मोजा एकदा. उत्कृष्ट शिपाई म्हणून गणले गेलेले गुरखे किंवा शीख कधी शाकाहारी होते बोला? एक बाजू म्हणते, मांसाहाराने अपचन जडते. दुसरी बाजू म्हणते – अरे धुत्, शाकाहाऱ्यांना असतील नसतील ते सारे पोटाचे रोग होत असतात; शिवाय तुम्हा गवतखाऊ लोकांच्या बद्धकोष्ठाला पालापाचोळा जुलाबासारखा काम देत असेल म्हणून काय साऱ्या जगाला तो जुलाब घ्यायला लावणार की काय!

कुणी काहीही म्हणो, हे मात्र अगदी निश्चित की मांसाहारी जातीच चिरकाळ योद्ध्या, विचारप्रवण ठरत आल्या आहेत – शूर, वीर, सखोल चिंतनशील लोक त्यांच्यातच प्रामुख्याने आढळतात. मांसाहारी जातीचे असे म्हणणे आहे की, ज्या काळी यज्ञाच्या धुरानं देश दाटत असे व लोक यज्ञातील

बलिदानाचे मांस खात असत त्याच काळी हिंदूंमध्ये चांगल्या चांगल्या डोक्याचे लोक निपजत असत. पालेभाज्या खाऊ बाबाजींची निपज होऊ लागल्यापासून एकही 'माणूस' उपजला नाही. हे सारं पाहूनच आमच्या देशातले लोक भिऊन मांसाहार सोडू इच्छीत नाहीत. आमच्या देशातल्या आर्यसमाजी लोकांमधेही हाच वाद निर्माण झाला आहे. त्यांच्यातीलच एक पक्ष म्हणतो की, मांस खाणे आवश्यक, तर विरुद्ध पक्ष म्हणतो की मांस खाणे अत्यंत अन्याय्य.

याप्रमाणे सारखा वाद नि विवाद चालू आहे. सगळ्या बाजू नीट विचारात घेऊन माझं तरी असं अगदी ठाम मत झालं आहे की या बाबतीत हिंदूच बरोबर आहेत. म्हणजे, हिंदूंची ही जी व्यवस्था आहे की जन्म-कर्म भेदानुसार आहारादी सगळे पृथक् पृथक् असायला हवे, तीच ठीक. या बाबतीत हाच योग्य सिद्धान्त. पण आजचे हिंदू, शास्त्र काय म्हणतं तेही ऐकायला रिकामे नाहीत अन् त्यांचे महान महान आचार्य काय सांगतात तेही मानायला तयार नाहीत.

मांस खाणे केव्हाही असभ्यता होय आणि शाकाहारी भोजन केव्हाही अधिक पवित्र होय. कोण नाकबूल करील हे? ज्याचे उद्दिष्ट केवळ धार्मिक जीवनच जगण्याचे आहे त्याच्या पक्षी शाकाहार उचित – प्रश्नच नाही. आणि ज्याला ह्या संसाराच्या धुमाळीतून, आजूबाजूच्या लोकांशी दोन हात करीत अविरत जीवन-मरणाच्या संघर्षांमधून लढत झगडत मार्ग कापीत जावयाचे असते त्याने मांसाहार करावा याबद्दलही काही प्रश्न नाही. जोपर्यंत मनुष्यसमाजामधे बळी तो कानपिळी हा भाव राहील तोवर मांसाहार करावा लागेल किंवा मांसाच्या तोडीचे दुसरे काहीतरी नवीन खाद्य तरी शोधून काढावे लागेल. एरवी बलवंतांच्या पायाखाली दुबळे चिरडले जाणारच! राम किंवा श्याम शाकाहार करूनही चांगले आहेत असं म्हणून चालणार नाही – जातीजातीची तुलना करून बघा. एखाददुसरं तुरळक उदाहरण घेऊन व्यापक सिद्धान्त बांधण्यात काही हशील नाही.

शाकाहाऱ्यांमधेही आपसात परत भांडण आहेच! त्यांच्यातील एक पक्ष म्हणतो की, तांदूळ, बटाटे, गहू, जव मका, ज्वारी, वगैरे शर्कराप्रधान जिन्नस कुचकामाचे होत. ते सारे माणसाने उत्पन्न केले असून ते सारे खाऊनच तर असतील-नसतील तेवढे सगळे रोग जडत असतात. शर्कराउत्पादक (starchy) खाद्य म्हणजे रोगांचे माहेरघरच. घोडे-बैल देखील, त्यांना एका जागी बांधून ठेवून गहू-तांदूळ खाऊ घालत गेल्यास रोगी बनतात, नि मैदानात मोकळे सोडून दिल्यास कोवळं गवत खाऊन परत बरे होऊन जातात. गवत आणि इतर हिरव्या वनस्पतींत व पालेभाज्यांत शर्कराउत्पादक द्रव्ये फारच कमी असतात. ओरांगउटांग भुईमूग नि गवत खातो, गहू, बटाटे वगैरे सहसा खात नाही. खाल्लेच तर ते कच्चे असताना – त्यांच्यात तितकासा स्टार्च (Starch) निर्माण झाला नसेल अशा अवस्थेत. याप्रमाणे नाना प्रकारचा वितंडवाद चालू आहे. एक पक्ष म्हणतो, भाजले मांस, पुरेशी फळं नि दूध एवढेच खाणे दीर्घायुष्याला उपयुक्त होय. विशेषतः फळफळावळे. फलाहारी लोक बराच काळपावेतो तरुण राहतात, कारण फळांतला आम्ल रस हाडांना जंग धरू देत नाही. हाडांवर किटण चढण्यानेच मुख्यतः म्हातारपण ओढवत असते.

या साऱ्या वादावादीला काही अंत नाही, ती अशीच सारखी चालू आहे. या बाबतीत सर्वांना पटण्यासारखा सिद्धान्त असा की पुष्टिकर आणि त्याचबरोबर लवकर पचन होईल असे खाणे खावे. थोड्या प्रमाणात खाऊन पुष्टी पुष्कळ लाभेल आणि त्याचबरोबर लवकर पचेल असे खावयास हवे. ज्या खाण्यात पुष्टी कमी ते साहजिकच पोतेभर खावे लागणार. अर्थातच सगळा दिवस लागणार ते हजम करण्यासाठी. जर हजम करण्यामधेच आहे नाही ती सारी शक्ती खर्च झाली तर आणखी बाकीची कामं करण्यासाठी काय उरेल?

आमच्या देशातील खाद्यांचे समालोचन

तळलेले पदार्थ म्हणजे शुद्ध विष. हलवायाचं दुकान म्हणजे यमाचं

घर – प्रत्यक्ष, साक्षात यमसदन. तेल-तूप उष्ण देशात जितकं कमी खाण्यात येईल तितक चांगलं. तुपापेक्षा लोणी लवकर पचतं. मैद्यात (सपीटात) काहीच सत्व नसतं, दिसायलाच फक्त पांढराफट्ट. गव्हाचा सगळा भाग जीत आला आहे अशी कणीकच खाण्यास योग्य. आमच्या बंगाल प्रांताच्या दृष्टीने, अजूनही दूरदूरच्या बंगाली खेडेगावांतून ज्या साऱ्या गोष्टी जेवणात वापरण्याची वहिवाट आहे त्याच श्रेयस्कर. कोणत्या जुन्या बंगाली कवीने पुरी-कचोरीचे वर्णन केले आहे? ही पुरी-कचोरी बंगालमधे आली आहे उत्तर हिंदूस्थानातून. तिथे देखील लोक ती कधीमधीच खातात. वरचेवर सारखी 'पक्की रसोई' (तुपात तळलेल्या जिनसा) खात असलेला माणूस मला तरी तिथे आढळला नाही. मथुरेचे कुस्तीबाज चौबे पुरी-लड्डूप्रिय असतात खरे, परंतु चारदोन वर्षांमधेच चौबेजींच्या पचनशक्तीचे धिंडवडे निघतात नि मग चौबेजी 'चूरन' खात खात जगतात.

गरीब लोक खायला मिळत नाही म्हणून उपासाने मरतात, श्रीमंत लोक खाऊ नयेत असल्या गोष्टी खाऊन उपासाने मरतात. वाटेल ते खाणे म्हणजे खाणे नव्हे. खाऊन जे नीट पचते नि पुष्टी देते तेच खाणे 'खाणे'. वाटेल ते पोटात कोंबण्यापेक्षा फाका बरा. हलवायाच्या दुकानातील पदार्थांमध्ये काहीसुद्धा सत्व नसते. काही सत्व नसते, इतकचं नव्हे तर ते सत्त्वाच्या अगदी उलट असते – विष विष विष. पूर्वी लोक कधीकाळी हे सारं पाप खात असत. आता शहरच्या लोकांचे आणि विशेषत: खेड्यापाड्यांतून शहरांत येऊन राहणाऱ्या लोकांचे हे म्हणजे रोजचे जेवणच होऊन बसले आहे. याने अपचनाचा रोग जडून अपमृत्यू ओढवला तर त्यात आश्चर्य ते काय? भूक लागल्यास ती कचोरी-जिलब्बी गटारात फेकून देऊन एक पैशाचे चुरमुरे घेऊन खा – स्वस्तही पडेल, काही 'खाणं' ही होईल. वरण, भात, कणकेच्या पोळ्या, मासे, भाज्या नि दूध अगदी पुरेसं खाद्य होत. पण वरण मात्र दक्षिणी लोकांसारखं खाणं उचित. म्हणजे, वरणाचं फक्त वरवरचं पाणी घ्या, बाकीचा भाग गाई-बैलांना खाऊ घाला. मांस खायला पैसे असतील

तर खा. पण तेही उत्तर हिंदुस्थान्यांसारखं तऱ्हतऱ्हेचे गरम मसाले घालून नव्हे. मसाले म्हणजे काही खाद्य नव्हत – केवळ सवय पडली असते म्हणून खायचेत, इतकंच. आंगवळणी पडलेली एक खराब सवय, आणखी काही नाही. वरण अतिशय पुष्टिकर खाद्य, पण फारच दुष्पाच्य – पचायला अति जड. कच्च्या वाटाण्याचं वरण पचायला खूपच हलकं आणि चवेलाही फार स्वादिष्ट. पॅरीस शहरात कच्च्या वाटाण्याचं सूप म्हणजे एक अगदी नामांकित पदार्थ गणला जातो. कच्चे वाटाणे खूप शिजवावेत त्यानंतर ते चांगले आहाटून त्यात पाणी मिसळावे. मग एका चहागाळणीसारख्या तारेच्या गाळणीतून गाळलं की सालींचा चोथा अलग होऊन जाईल. मग त्या द्रवात हळद, धणे, जिरेमिरे, तिखट काय टाकायचं ते टाकून फोडणी द्या – चवेला आणि पचायलाही उत्कृष्ट असे वरण तयार होईल. मांसाहारी लोक त्यात जर बकऱ्याचे किंवा माशाचे डोके घालतील तर ते रुचकर होईल.

हा जो इतका बहुमूत्राच्या रोग्यांचा देशात सुकाळ दिसून येतो, त्याचं मुख्य कारण म्हणजे अजीर्ण. चारदोनजणांना अत्यधिक मानसिक परिश्रम केल्यामुळे मधुमेह जडत असेल कदाचित, नाही असे नाही. पण हे म्हणजे अगदी तुरळक. बहुतांश निव्वळ अपचनाचा परिणाम. पोटात कोंबलं म्हणजे झालं का खाणं? जेवढं पचू शकेल तेवढ्यालाच म्हणायचं 'खाणं'. पोट सुटणं अपचनाचं पहिलं लक्षण. वाळून जाणं किंवा लठ्ठ होणं दोन्ही अपचनामुळेच होतात. पोटऱ्या कशा लोखंडासारख्या टणक असायला हव्यात. लघवीत साखर किंवा ॲल्ब्यूमिन (albumin) आढळून येताच 'आँ'करून कपाळावर हात देऊन बसू नका. ते सारं आपल्या देशात म्हणजे काहीच नाही. उपेक्षणीय. ते मनावर घेण्याची काहीच गरज नाही. खाण्याकडे खूप लक्ष असू द्या, अजीर्ण जेणेकरून न होवो. मोकळ्या हवेत शक्य तितकं असत चला. खूप फिरा नि दणकून खपा चांगले. नोकरीत असाल तर कसंही करून सुट्टी घ्या नि बद्रीकेदाराची यात्रा करा. हरिद्वारहून पायी पायी शंभर कोस तुडवून पहाड चढून बद्रिकाश्रमापर्यंत जाणं-येणं एकदा झालं की

बहुमूत्राच्या रोगाचं भूत पार पळून जाईल. डॉक्टरफाक्टरांना जवळ फिरकू देऊ नका. त्यांचा म्हणजे अधिकांश 'चांगलं करू शकणार नाही, वाईट करीन, काय देतोस ते सांग', असला खाक्या! जमेल तोवर औषध घेऊ नका. रोगानं जर एक आणा लोक मरत असतील तर औषधानं मरतात पंधरा आणे. शक्य झाल्यास दरवर्षी दुर्गापूजेच्या नवरात्राच्या सुट्टीत (नोकरीच्या शहराहून) घरी खेड्याला पायी चालत जा. श्रीमंत होणं नि आळशांचा राजा बनणं आपल्या देशात दोन्ही एकच होऊन बसल आहे. ज्याला धरून चालवावं लागतं, खाऊ घालून द्यावं लागतं तो तर मूर्तिमंत रोगी, पहिल्या नंबरचा बदनशीबी – दळभद्र्या, सबंध पुरी पचेल की नाही म्हणून जो सांभाळून पुरीचा पापुद्रा तेवढा खात असतो तो तर जिवंत असूनही मेलेलाच समजावा. जो एका दमात दहा कोस चालू शकणार नाही तो मनुष्य की शिदोड? आपणहून रोगाला, अकाल मृत्यूला मूळ धाडून बोलावून आणाल तर कोण काय करील?

तशीच ही जी पावरोटी आहेना, त्या बाईसाहेब देखील आहेत विष. कधी चुकून शिवू नका तिला. खमीर (अंबवण) घालून पीठ आंबविल्याने निराळचं होऊन जातं. फार अपायकारक होऊन बसतं ते. आंबलेली कोणतीही जिन्नस खाऊ नका. या बाबतीत आपल्या शास्त्रात कोणतीही आंबविलेली जिन्नस खाण्यास जो निषेध सांगितलेला आहे तो अगदी बरोबर आहे. कोणताही गोड पदार्थ आंबविल्यास शास्त्रात त्याला शुक्त म्हटले आहे. तसा कोणताही पदार्थ खाण्याला शास्त्रात मनाई आहे. याला अपवाद फक्त एका दह्याचा. दही फार चांगले असते – फार उपकारक. जर कधी पावरोटी खाण्याचं काम पडलंच तर आधी ती चांगली शेकून मगच खा.

अशुद्ध पाणी व अशुद्ध अन्न ही रोगाचे मूळ होत. अमेरिकेत आजकाल पाणी शुद्ध करण्याची खूप धामधूम. ते जे फिल्टर, गेले संपले त्याचे दिवस आता. कारण फिल्टरने पाणी गाळले जाते, इतकेच. परंतु रोगांचे बीज असे जे सारे जीवाणू त्यात असतात – पटकी, प्लेग वगैरेंचे जीवाणू – ते जसेच्या

तसेच राहतात. इतकेच नव्हे तर फिल्टर स्वत:च या साऱ्या बीजांची जन्मभूमी होऊन बसते. कलकत्त्यात जेव्हा पहिल्या पहिल्याने फिल्टर केलेले पाणी आले तेव्हा पाच वर्षे म्हणे पटकी उद्भवली नाही. त्यानंतर पुन्हा जैसे थे – आता ते फिल्टरमहाशय स्वत:च पटकीच्या बीजाचे आगर होऊन बसले आहेत! सर्व फिल्टरांमधे, तिमजली घडवंचीवर एकावर एक तीन माठ ठेवून केलेलं आपलं देशी फिल्टरच सगळ्यात चांगलं. फक्त, त्यांत वापरलेली वाळू किंवा कोळसे दर दोन-तीन दिवसांनी बदलायला किंवा तेच फिरून चांगले गरम करून घ्यायला मात्र हवेत आणि ही जी किंचितशी तुरटी पाण्यात टाकण्याची गंगाकाठच्या खेड्यापाड्यांतली पद्धत आहे, ती सगळ्यात उत्तम. तुरटीची भुकटी शक्य तो पाण्यातली माती, घाण नि रोगांची बीजं बरोबर घेऊन हळूहळू तळाशी बसते. गंगेचं पाणी घड्यात भरून थोडी तुरटीची भुकटी टाकून जे आम्ही निवळून पितो ना, ते तुमच्या विलायती फिल्टरविल्टरच्या बापजाद्यांच्या थोबाडीत हाणील, अन् तुमच्या त्या नळाच्या पाण्याच्या दोनशे बापांपेक्षा वरचढ ठरेल! तथापि पाणी उकळून घेता आल्यास अजीबात निर्भय होता येतं हे मात्र खरं. तुरटीनं निवळलेलं पाणी उकळून थंड करून प्या – काय माल आहे तुमचं फिल्टरन् भिल्टर त्याच्यापुढे! आजकाल अमेरिकेत मोठमोठ्या यंत्रांच्या साहाय्याने पाण्याची अजीबात वाफ करून टाकण्यात येते नि मग त्या वाफेचे फिरून पाणी करण्यात येते. त्यानंतर आणखी एका दुसऱ्या यंत्राच्या साहाय्याने शुद्ध हवा त्या पाण्यात मिसळण्यात येते – वाफ होताना निघून गेलेल्या हवेची भरपाई करण्यासाठी. ते पाणी काय पाहायचे? अगदी शुद्धतम. आजकाल तिथे घरोघर ते तसलेच पाणी वापरतात.

आमच्या देशात ज्याच्या गाठी दोन पैसे असतात तो आपल्या पोराबाळांना रोज मिठाई, कचोरी अन् काय काय तळकट तेलकट गोष्टी खाऊ घालील! हो, भातपोळीनं इभ्रत नाही का जायची! लोकं म्हणायचे, पाहा, मुलांना फक्त भात-पोळीच खाऊ घालतोय हं हा!! घराण्याची अब्रू जायची! अशानं ती कारटी ढेबरपोटी, बेढब, आळशी, निर्बुद्ध, काही राम नसलेली

निपजणार नाहीत तर आणखी कशी निपजतील? एवढी कणखर जात इंग्रजांची – किती थंड त्यांचा देश, बर्फ पडतो मधेमधे, रात्रंदिवस किती मेहनत करतात, सारखं काम, पण ते देखील तळल्याचं नि मिठाईचं नाव काढलं की भितात? आणि आम्ही? अग्निकुंडासारखा उष्ण देश, मातीचे पेंड – एका जागेहून उठून दुसरीकडे जाऊन बसायला नाराज इतके मेहनती! अन् आहार काय, तर पुरी कचोरी-मिठाई – सारं तेला-तुपात छान खमंग तळलेलं! त्या काळचा खेडेगावचा जमीनदार, हं म्हणता दहा कोस चालून जाई, डझनानं कोई मासे कांट्याबिट्यांसह पार चावून फस्त करी, शंभर वर्ष वाचे. त्याचीच पोरं, कलकत्त्याला येतात, डोळ्यांवर चष्मा चढवतात, पुरी-कचोरीवर चरतात, ऊठ की पळ गाडीतून, पायी चालणं अगदी वर्ज्य. फळ? मधुमेहाचा विकार जडतो नि ग्रंथ आटोपतो. 'कलकत्तेकर सभ्य' होण्याचं फळ! अन् त्याचा उरलासुरला सत्यानाश करतात हे डॉक्टरन् वैद्य. जळले लेकाचे! यांना सर्वकाही अवगत – सर्वज्ञ, सर्वशक्तिमान. औषधाच्या जोरावर आपण काय हवे ते करू शकू हा त्यांचा दृढ विश्वास. थोडं कुठे पोट गरम झालंय्, बस् पाज एक औषध कसलंतरी. दीडशहाणा वैद्य, रोग्याला कधी चुकून सांगायला रिकामा नाही की 'होईल औषधबिवषध मागाहून, जा आधी दोन कोस झक्क फिरून या बघू, जा.'

नाना देश बघतोय्, नाना तऱ्हेचं खाणंही पाहतोय. पण आमच्या बंगाली खाण्याची सर नाही यायची कुणाला. त्यासाठी पुनर्जन्म घेणंदेखील काही फारशी मोठी गोष्ट ठरणार नाही! पण आम्हाला त्याची कदर नाही, हीच दुःखाची गोष्ट. दात आहेत त्याला दातांची कदर नसते हीच तर मुश्कील. खाण्याची नक्कल काय इंग्रजांची करायची? अन् तितका पैसा कुठे आहे? आज आपल्या या प्रांताला उपयुक्त असं ठीक ठीक बंगाली खाणं, – उपकारक, पुष्टिकर नि स्वस्त असं खाणं म्हणजे पूर्वबंगालचं – नक्कल करायची ती त्याची करा, करवेल तेवढी. जितकं (बंगालमधे) पश्चिमेकडे झुकाल तितकं खराब, तितके असभ्य बनाल! तुम्ही कलकत्तेकर 'सभ्य' लोक

– तुम्हा लोकांनी हे साऱ्या मुलखाची घाण भरलेल्या मिठायांचं जे हलवायाचं दुकानरूपी सर्वसत्यानाशी जाळं पसरून ठेवलं आहे, त्याच्या भुलावणीनं बीरभूम, बाँकुडा वगैरे भागांतल्या रहिवाशांनी आपले टोपल्या टोपल्या मुरमुरे दामोदर नदीत नेऊन फेकले आहेत, उडदाची डाळ मोरीत ओतली आहे, अन् खसखस वाटून भिंतींना लिंपून टाकली आहे; ढाका, विक्रमपूर वगैरेंनीही आपलं चांगलं खाणं लाथाडून दिलं आहे – अन् सगळे 'सभ्य' झाले आहेत – तुम्हा कलकत्तेकरांसारखे! स्वत: तर गेलाच आहात जहान्नममधे, बरोबर उभ्या देशाला घेऊन जाता आहात – तुम्ही, मोठ्ठे सभ्य, 'शयरां'तले लोक! जळली तुमची सभ्यता न् फब्यता! अन् हे बाकीचे लोकही असले बुद्दू की ही कलकत्त्याची घाण खाऊन पोटाच्या रोगांनी बेजार होऊन मरायला टेकतील, पण तरीसुद्धा म्हणणार नाहीत की हे सारं पचत नाहीय्. म्हणतील – कलकत्त्याची हवाच दमट, खारट म्हणून असं होतंय्! काहीही करून 'शहरी' झालंच पाहिजे ना!!!

पाश्चात्त्यांचा आहार

खाण्यापिण्याचे गुणावगुण, वहिवाटी वगैरेसंबंधी थोडक्यात आतावर सांगितलंच. आता पाश्चिमात्य काय खातात नि त्यांच्या आहारात क्रमश: कसकसा बदल पडत गेला तेही थोडंबहुत सांगतो.

सगळ्याच देशातल्या गरीब स्थितीतल्या लोकांचं खाणं म्हणजे काही विशिष्ट धान्ये; भाज्याबिज्या, मांसमच्छी सारं चैनीत गणलं जातं नि चटणीसारखं वापरलं जातं. ज्या भागात ज्या धान्याचं पीक मुख्य आणि मुबलक, त्या भागातल्या गरिबांचं मुख्य खाणं तेच. बाकीचे जिन्नस नुसते त्याच्या बरोबर. जसं, बंगाल, ओरिसा, मद्रास नि मलबारची पट्टी या भागात भात मुख्य खाणं, त्याच्याबरोबर वरण, भाजी, कधीकधी मांस, मासे – चटणीसारखे. भारतवर्षाच्या इतर सर्व प्रांतांतील खाऊनपिऊन सुखी असलेल्या लोकांचे खाणे म्हणजे गव्हाची पोळी व भात आणि सर्वसाधारण लोकांचे मुख्य खाद्य म्हणजे नाना प्रकारच्या बाजरी, महुआ, जवार, झिंगोरा

प्रभृती धान्यांची रोटी.

भाज्या, वरण, मासे, मांस वगैरे सारे काही समस्त भारतवर्षात ह्या पोळीला किंवा भाताला चव आणण्यासाठी म्हणून वापरण्यात येत असते. म्हणूनच संस्कृतमध्ये यांना म्हणतात 'व्यंजन' – 'तोंडी लावणे'. इतकेच काय पण पंजाब, राजपुताना आणि दाक्षिणात्य देशांमधे श्रीमंत मांसाहारी लोक, फार काय, राजे रजवाडेदेखील जरी रोज नाना प्रकारचे मांस भोजनात वापरत असतील तरी पोळी किंवा भातच त्यांचे प्रधान खाद्य होय. जी व्यक्ती आच्छेर मांस रोज खात असेल ती शेरभराच्या पोळ्या त्याच्याबरोबर निश्चित खात असली पाहिजे.

पाश्चिमात्य देशांमधे आज जे सारे देश गरीब आहेत त्यांचे, किंवा तिकडच्या श्रीमंत देशांतील गरीब लोकांचे प्रमुख खाद्य म्हटले म्हणजे असलीच रोटी आणि बटाटे. मांस फक्त चटणीसारखेच आणि तेही कधीमधी. स्पेन, पोर्तुगाल, इटली वगैरे त्यातल्या त्यात उष्ण देशांमधे द्राक्षे खूपच पिकतात. म्हणून तिथे द्राक्षांची दारू अतिशय स्वस्त. ही दारू मादक नसते. (आता कुणी ती पिपाभर ढोसली तर गोष्ट वेगळी! एरवी एवढ्यातेवढ्याने ती अंगात येत नाही.) आणि त्याचबरोबर ती फार पुष्टिकरही असते. त्या त्या देशातले गरीब लोक म्हणूनच मांसमच्छरार्च्या ऐवजी हा द्राक्षारस पिऊन पुष्टी प्राप्त करीत असतात. परंतु युरोपच्या उत्तरेकडील भागात, अर्थात् रशिया, स्वीडन, नार्वे वगैरे देशांतील गरीब लोकांचा आहार म्हणजे प्रधानतः राय (Rye) नामक धान्याची रोटी, एखादसरा वाळला मासा नि बटाटे, हाच.

युरोपातील बड्या लोकांचे आणि अमेरिकेतील आबालवृद्ध सर्वांचे खाणे निराळ्याच तऱ्हेचे. त्यांच्या जेवणात भात, रोटी वगैरे म्हणजे नुसते चटणीसारखे, मुख्य खाणे म्हणजे मासे-मांसच. अमेरिकेत रोटी खाणे नाही म्हटले तरी चालेल. मासे वाढण्यात येतील तेव्हा फक्त मासेच पानात पडतील, मांस वाढण्यात येईल तेव्हा फक्त मांसच पानात पडेल – ते तसंच खावं लागेल, भातरोटीबरोबर नव्हे. म्हणूनच दर खेपेस प्लेट (ताटली) बदलली

जाते. जर खाण्याच्या दहा जिनसा असतील तर दहादा समोरची प्लेट बदलली जाते. आपण आपलं खाणं त्यांच्या पद्धतीनं जेवलो तर असा प्रकार होईल – आधी फक्त शुक्त आलं, त्यानंतर बशी बदलून फक्त वरण आलं. त्यानंतर बशी बदलून फक्त झोलच* आलं, परत बशी बदलून थोडासा भात म्हणा नाहीतर चारदोन पुऱ्याच आल्या, वगैरे वगैरे. या पद्धतीत फायदा एवढाच की निरनिराळ्या जिनसा थोड्याथोड्या खाण्यात येतात, कशाचंही पोटावर ओझं लादल्यासारखं होत नाही. फ्रेंचांचा शिरस्ता म्हणजे सकाळच्या वेळी कॉफी आणि बरोबर एखादा तुकडा रोटीचा – लोणी माखलेला. मध्यान्हीं मासे, मांस वगैरे – मध्यम प्रमाणात. अघळपघळ जेवण रात्री – तेच दिवसातलं मुख्य जेवण. इटली, स्पेन प्रभृती देशांचंही असंच, फ्रेंचांसारखं. जर्मन सारखे खातच असतात – पाचदा, सहादा. प्रत्येक वेळी थोडंबहुत मांस असतेच. इंग्रज तीनदा – सकाळचा फराळ छोटासाच, परंतु मधेमधे चहा-कॉफी हवी. अमेरिकनही तीनदाच, पण प्रत्येक खेपेस खाणं ऐसपैस, मांसाची खैरात. परंतु ह्या सगळ्या देशांमधे 'डिनर'च मुख्य जेवण – ऐपतवाले लोक फ्रेंच आचारी ठेवतील, फ्रेंच पद्धतीने जेवतील. फ्रेंच पद्धत म्हणजे – पहिल्याप्रथम थोडेसे खारे मासे किंवा माशांची अंडी किंवा एखादी चटणी अथवा भाजी. हे म्हणजे नुसते भूक जागविण्यासाठी. त्यानंतर सूप. त्यानंतर, आजकाल फॅशन पडली आहे तिच्या अनुसार एखादं फळ. त्यानंतर मासे. त्यानंतर मांसाची एक भाजी. त्यानंतर थोडे भाजले मांस, बरोबर कच्ची सबजी, त्यानंतर आरण्य मांस – पक्षी, हरण इत्यादींचे. नंतर मिठाई, शेवटी आइसक्रीम – 'मधुरेण समापयेत्'. तसाच श्रीमंत असल्यास दर खेपेस प्लेट बदलतांना तिच्याबरोबरच मद्यही बदलते – शेरी, क्लॅरेट, शँपेन वगैरे आणि अधेमधे मद्यमिश्रीत आईस्क्रीम थोडे थोडे. प्लेट बदलण्याच्या वेळी तिच्याबरोबरच सुरे-काटे-चमचेही सारे बदलतातच. भोजनान्ती कॉफी –

---

* बंगाली पद्धतीच्या भाज्यांची नावे. शुक्त अमल कडसर असते. झोलामधे पाणी वा रस बराच असतो. पुष्कळ तऱ्हेच्या भाज्या एकत्र करून ही दोन्ही बनतात.

बिनदुधाची, चिमुकल्या चिमुकल्या ग्लासांतून मद्य, आणि शेवट धूम्रपानाने. खाण्याच्या निरनिराळ्या प्रकारांबरोबर मद्याचे वेगवेगळे प्रकार पुढे करू शकेल तरच यजमान 'बडा आदमी' 'घरंदाज' ठरणार. डिनरवर हे लोक इतका पैसा उधळतात की त्यांच्या फक्त एका डिनरला लागणारा पैसा एकदाच खर्च केल्यास आपल्याकडल्या एखाद्या मध्यमवर्गीय माणसाचे कायमचे टिनपाट वाजेल!

आर्य लोक एका पाटावर बसत, एक पाट मागे टेकायला ठेवीत आणि चौरंगावर ताट टेवून (ताट वारंवार न बदलता) त्याच ताटात सर्व गोष्टी खात – संपूर्ण जेवण त्या एकाच ताटात जेवीत. ही चाल अजूनही पंजाब, राजपुताना, महाराष्ट्र आणि गुजराथ प्रांतांत विद्यमान आहे. बंगाल, ओरिसा, तेलंगण, मलबार प्रभृती भागांतले लोक ताट ठेवण्यासाठी असले काही वापरत नाहीत. ताट किंवा केळीचे पान वगैरे खाली जमिनीवरच ठेवून हे लोक जेवतात. म्हैसूरचे महाराजही जेवतील ते ह्याच पद्धतीने – जमिनीवर पान पसरून त्यावर वरण-भात खातात. मुसलमान लोक एक मोठी पांढरी चादर हांतरून तिच्यावर बसून जेवतात. ब्रह्मी, जपानी प्रभृती उकड बसतात नि जमिनीवर ताट ठेवून जेवतात. चिनी लोक ताट टेबलावर ठेवतात, खुर्चीवर बसून काड्या व चमच्यांनी खातात. रोमन व ग्रीक कोचावर रेलून टेबलावरच्या ताटांतून नुसत्या हाताने (काटे चमचे न वापरता) जेवत. युरोपियन देखील पूर्वी खुर्चीवर बसून नुसत्या हातानेच टेबलावरून जेवत. आजकाल नाना तऱ्हेचे काटे चमचे वापरतात.

चिन्यांची खाण्याची तऱ्हा म्हणजे मुलखावेगळी – सर्कसच म्हणा ना एकप्रकारची! आपल्याकडले पानपट्टीवाले जसे दोन अगदी वेगळी लोखंडी पाती हाती धरून मोठ्या कुशलतेने त्यांचा कात्रीसारखा उपयोग करून पाने कातरतात, त्याचप्रमाणे चिनी लोक दोन काड्या उजव्या हाताच्या दोन बोटांत धरून बोटांच्या नि तळहाताच्या मदतीने त्यांना ठीक चिमट्यासारखे वापरून भाज्या वगैरे तोंडात घालतात. परत त्याच दोन काड्यांना एकत्र करून आणि

भाताचे वाडगे तोंडाजवळ धरून त्या दोन काड्यांचा उलथण्यासारखा उपयोग करून त्यांनी भात सरकवत सरकवत तोंडात कोंबतात.

सर्व जातींतील आदिमानव प्रथमावस्थेत जे मिळे ते खाई असे म्हणतात. एक मोठंस जनावर मारलं तर महिनाभर तेच पुरवून पुरवून खात असे, सडून गेले तरी टाकून देत नसे. हळूहळू तो सभ्य झाला. शेतीभाती शिकला. पूर्वी त्याची स्थिती म्हणजे जंगली पशूसारखी – शिकार साधेल त्या दिवशी चिक्कार खाणे, मग चार पाच दिवस फाका. ही त्याची स्थिती हळूहळू पालटली. शेतकीमुळे रोज खायला मिळू लागले. परंतु सडकी जिन्नस खाण्याची सवय मात्र राहून गेली – जेवताना इतर चांगल्या पदार्थांबरोबर जुन्याकाळची खूण असे सडके मांस किंवा तसलेच काहीतरी खाणे ही एक प्रथा होऊन बसली. आधी आधी वास सुटलेले सडके मांस किंवा तसलेच काहीतरी वासट हे जेवण्याच्या पदार्थांपैकीच एक लेखले जाऊन भोजनात रोज आवश्यकच असे. आता आजकाल तसले वासाळ काहीतरी ही लोणच्यासारखी कधीकधी आवडीने खाण्याची वस्तू होऊन बसली आहे.

एस्किमो लोक बर्फाळ प्रदेशात राहतात. धान्य त्या भागात अजीबात पिकत नाही. नित्य भोजन म्हणजे – मांस, मासे. अधेमधे जिभेची चव हरवल्यासारखी वाटल्यास सडक्या वाशेऱ्या मांसाचा एखादा तुकडा चघळतात – अरुची दूर होते.

युरोपियन लोक अजूनही वन्य पशु-पक्ष्यांचं मांस सडून वासळल्याखेरीज खात नाहीत. ताजं मिळालं तरी ते टांगून ठेवतात – सडून वास सुटत नाही तोपर्यंत. कलकत्त्यात हरणाचे सडके मांस बाजारात उरू शकत नाही, भेटकी मासा सडकाच चांगला लागतो हे प्रसिद्धच आहे. इंग्रजांचे चीझ जितके सडेल, जितके त्यात किडे वळवळ करतील, तितके खायला चांगले! पळणारे चीझकिडेही पकडून तोंडात टाकतील – तो म्हणे मोठा रुचकर लागत असतो!! शाकाहारी लोकही लसूण-कांद्यासाठी लसलस करतील, दक्षिणी ब्राह्मणांचं तर लसूण-कांदे नसल्यास जेवणच व्हायचं नाही.

पण हिंदू शास्त्रकारांनी लसूण-कांदे मना करून तोही रस्ता बंद करून टाकला. कांदे, लसूण, गावठी डुक्कर, गावठी कोंबडी खाणं एका जातीच्या (ब्राह्मणांच्या) पक्षी पाप होय. कुणी ते पाप केल्यास शिक्षा म्हणजे – त्याची जात बाटेल. शास्त्राचा हा एवढा कडकडीत निषेध ऐकून सनातनी हिंदूंनी घाबरून लसूण-कांदे दिले सोडून. अन् केलं काय? तर खायला सुरवात केली त्या दोहोंपेक्षाही भयंकर वासाचा हिंग! पहाडी सनातनी ब्राह्मणांनी कांद्या-लसणाऐवजी लसणासारखा वास येणारं एकप्रकारचं गवत धुंडून काढलं. हिंगाला अन् त्या गवताला शास्त्रात मना कुठे केलं आहे!!

आहारासंबंधीच्या विधिनिषेधांचे तात्पर्य

सर्वच धर्मांमधे खाण्यापिण्यासंबंधी काही विधिनिषेध आहेत. नाहीत फक्त एका ख्रिस्ती धर्मामधे. जैन आणि बौद्ध काहीही झाल्यास मांसमच्छर खाणार नाहीत. त्यांतही जैन लोक परत जे जमिनीच्या खाली होतं तेही खात नाहीत. उदाहरणार्थ – बटाटे, मुळे वगैरे. ते पदार्थ काढण्यासाठी जमीन खणावी लागते, आणि जमीन खणायची म्हणजे जीवजिवाणू मरणार, म्हणून ते त्या गोष्टी खात नाहीत. ते लोक रात्री जेवीत नाहीत – न जाणों अंधारात एखादा किडाकीटक दातांखाली सापडून हिंसा घडायची, म्हणून.

यहुदी लोक ज्या माशांना खवले नाहीत ते मासे खात नाहीत, डुकराचं मांस खात नाहीत; ज्या जनावरांची खुरं दुभागलेली नाहीत व जी रवंथ करीत नाहीत अशांचे मांसही यहुदी खात नाहीत. यावरही कडी म्हणजे, दूध किंवा दुधापासनं केलेला कोणताही जिन्नस जर सैपाकघरात आला, आणि त्या वेळी तिथे जर मांसमच्छी शिजत असली तर सरळ ते शिजते भांडे बाहेर नेऊन उपडे केले जाते. म्हणूनच तर कट्टा यहुदी दुसऱ्या कोणत्याच जातीच्या माणसाच्या हातचे खायला रिकामा नसतो! तसेच हिंदूंप्रमाणेच यहुदीही-प्रसादाचे असल्याखेरीज मांस खात नाहीत. देवाला बळी म्हणून नव्हे, तर उगाच मारलेल्या पशूंचे आणि नैवेद्य न दाखविलेले मांस ते खाणार नाहीत. आपल्याकडेही बंगाल व पंजाबकडे मांसाचे नावच आहे 'महाप्रसाद'. नैवेद्य

दाखविलेल्या मांसाला म्हणतात महाप्रसाद. असे 'महाप्रसादा'चे असल्याखेरीज, म्हणजे विधीनुसार बली दिला गेला असल्याखेरीज यहुदी लोक ते मांस खायचे नाहीत. म्हणून अर्थातच हिंदूंसारखीच यहुद्यांनाही वाटेल त्या दुकानातून मांस विकत घेण्याची मुभा नाही. मुसलमान लोक यहुद्यांचे बरेचसे नियम मानतात, पण ते त्या बाबतीत यहुद्यांसारखा इतका कट्टरपणा बाळगीत नाहीत, तितका अतिरेक करीत नाहीत. दूध नि मांसमच्छर बरोबर खाणार नाहीत, इतकेच. पण त्या दोहोंचा एकमेकाला स्पर्श होता आकाश कोसळले असे मात्र ते समजत नाहीत. यहुदी आणि हिंदू या दोघांमधे बरेच सादृश्य आहे – खाण्याच्या बाबतीत. पण यहुदी लोक रानडुक्करही खात नाहीत, हिंदू खातात. पंजाबात हिंदू-मुसलमानांमधे म्हणजे भयंकर झगडा. एक जे करील, त्याच्या अगदी उलट दुसरा करणार! मुसलमान डुकराला शिवायचे नाहीत, तर रानडुक्करांचे मांस हिंदूंच्या खाण्याची एक अगदी आवश्यक गोष्ट तिथे होऊन बसली आहे! रजपुतांच्या लेखी रानडुक्करांची शिकार करून त्यांचे मांस खाणे म्हणजे तर एकप्रकारे धर्मच! दक्षिण देशातून ब्राह्मण सोडून इतर जातीत गावठी डुक्कर खाण्याचीही चाल बरीच प्रचलित आहे. हिंदू लोक रानकोंबडी खातात गावठी मात्र नाही.

बंगालपासून नेपाळपर्यंत व हिमालयात काश्मीरपर्यंत खाण्या-पिण्याबाबत विधिनिषेध एकाच प्रकारचे आहेत. मनूंनी घालून दिलेले खाद्याखाद्यासंबंधीचे नियम ह्याच भागामधे पुष्कळशा प्रमाणात चालू आहेत – आजही. परंतु कुमाऊनपासून तो काश्मीरपर्यंतच्या प्रदेशात मनूंचे नियम बंगाल, बिहार, प्रयाग आणि नेपाळपेक्षाही जास्त प्रचारात आहेत. जसे, बंगाली लोक कोंबडी किंवा कोंबडीचे अंडे खाणार नाहीत, पण बदकाचे अंडे खातात. नेपाळीही खातात. पण कुमाऊनपासून पुढे तेही चालत नाही. अलाहाबादानंतर, हिमालय सोडून भारतवर्षातील इतर सर्व प्रांतांत जो बकरी खातो तो कोंबडीही खातो.

खाण्यासंबंधीचे हे सारे विधी आणि निषेध बहुतांशी शारीरिक स्वास्थ्य

नीट राहावे ह्याच उद्देशाने सांगितले गेले आहेत यात शंकाच नाही. परंतु कोणते खाद्य शरीरस्वास्थाच्या दृष्टीने हितावह आणि कोणते अहितकारक हे नेहमीच नक्की सांगता येणे अर्थातच शक्य नाही. डुकरे, कोंबड्या ही काय वाटेल के खातात, मोठे घाणेरडे प्राणी आहेत ते – म्हणून ते निषिद्ध. जंगली जनावरं काय खातात हे कोण बघायला जातं? म्हणून ते चालतील असा विधी आहे. शिवाय गावठी, पाळीव जनावरांच्या तुलनेने जंगली जनावरांना रोग कमी होतात. दूध पचायला एकूण जडच – विशेषत: अम्लपित्त (acidity) झाले असल्यास तर फारच कठीण. फार काय पण एका दमात बंपरभर दूध घाईघाईने गटागटा ढोसल्यामुळे तात्काळ मृत्यू ओढवण्याची उदाहरणे आहेत. दूध प्यायला हवं, जसं मूल आईच्या माऊतून पितं तसं, त्या तऱ्हेनं. घोटाघोटाने प्याले तरच ते लवकर आणि नीट पचते, एरवी नाही. दूध स्वत:च पचायला जड, मांसाबरोबर खाल्ल्यास आणखीच जड होते म्हणूनच दूध आणि मांस एकदम खाणे यहुदी लोकांत इतके निषिद्ध मानले जाते.

अडाणी, मूर्ख आया तान्ह्या पोराला जबरदस्तीने खूप दूध घटाघटा पाजतात नि मग चार-दोन महिन्यांतच छाती बडवून धाय मोकलत बसण्याची त्यांच्यावर पाळी येते. आजकालचे डॉक्टर मोठ्या माणसालाही पावभर दूध पूरे असे अधिकारवाणीने सांगतात. आणि तेही अगदी सावकाश घोटघोट प्यायला हवे असे त्यांचे मत आहे. त्यांच्या मते लहान पोरांसाठी 'फीडिंग बॉटल' सर्वांत उत्तम. पण होतं काय? आई कामांत गुंतलेली. मोलकरीण रडत्या पोराला धसकन आदळते मांडीवर, कधीकधी तर सरळ गुडघ्याने दाबून धरते अन् एक शिंपलं घेऊन ओतते त्या कारट्याच्या नरड्यात ओतवेल तितकं दूध घळाघळा!! परिणाम? परिणाम निराळा सांगायला नकोच म्हणा! आंग धरण्यांच नाव नाही, प्लीहा-पानथरीच्या तक्रारींनी कारटे बेजार होऊन सारखे सुकत जाऊन अखेर राम म्हणते. सगळ्या जन्मभराचं दूध बिचारं त्या तेवढ्या चार-दोन महिन्यांतच पिऊन घेतं! ह्या साऱ्या अगोचरीपणाला दाद न

देण्याइतका जोम ज्यांच्याठायी असतो, केवळ तीच काय त्या दिव्यातून सहीसलामत तगतात नि बाळसे धरून मोठी होतात.

त्या काळची ती बाळंतिणीची खोली, ते दूध पाजणं वगैरेंच्या तडख्यांतूनसुद्धा जी कारटी जिवंत सुटत ती पुढे मरेपर्यंत अगदी टणटणीत राहत. पाचवी-सहावीच्या दिवशी पुजलेल्या जिवती-सटवी वगैरे देवतांचा तसाच काहीतरी अमोघ, प्रचंड वर लाभल्याखेरीजच का त्या काळचं एकतरी कार्ट जिवंत सुटणं शक्य असे!! ते धुण्या देणंन् शेकणे, तो डागणंन् (नाक-कान) टोचणं वगैरेंमधूनही जिवंत निसटणं म्हणजे बाळ अन् बाळंतीण दोघांचीही शर्थच म्हणायची! हे शक्य होई, कारण ती दोघं साक्षात यमराजाचे दूत जे वैद्य-डॉक्टर, त्यांच्या हाती सापडत नसत, म्हणून!

सभ्यता आणि पोशाख

सर्वच देशांत माणसाच्या कपड्यालत्त्यांवरून त्याची सभ्यासभ्यता थोडीफार तरी अजमावली जात असते. पूर्व बंगालमधील खेड्यांतले लोक आपल्या गावंढ्या भाषेत जसे म्हणतात ना की ‘‘पगार किती हे कळल्याखेरीज माणूस सभ्य की असभ्य कसं समजायचं बुवा?’’ तसंच कपड्यांचंही. नुसता पगारच नाही, तर ‘‘कपडे पाहिल्याखेरीज माणूस सभ्य की असभ्य कसं समजायचं बुवा’’ – असं थोड्याबहुत प्रमाणात सर्वच देशात असतं. बंगालमधे फक्त धोतर नेसून उघड्या अंगानं कुणी घराबाहेर पडू शकणार नाही, तर भारताच्या इतर प्रदेशांत डोईला फेट्या-पटक्यासारखं काही घातल्याखेरीज कुणीही बाहेर पडायचा नाही. पाश्चिमात्य देशांत फ्रान्स सर्वच बाबतीत सदा आघाडीवर. त्यांच्या खाण्याची, त्यांच्या पोशाखाची इतर सगळे नक्कल करतात. आजही युरोपातल्या भिन्न भिन्न देशांचा स्वतःचा असा विशिष्ट पोशाख आहेच, नाही असे नाही. परंतु ‘सभ्य’ होताच, दोन पैसे गाठीशी जमताच लगेच तो स्वदेशी पोशाख अंतर्धान पावतो आणि त्या जागी फ्रेंच पोशाख आविर्भूत होतो. काबुल्यांसारखा पायजामा घालणारा डच शेतकरी, पायघोळ अंगरखा घालणारा ग्रीक, तिबेट्यासारखा पोशाख करणारा रशियन हा ‘सभ्य’

झाला रे झाला की लगेच फ्रेंच कोट-पाटलोन चढलेच त्याच्या आंगावर. अन् स्त्रियांविषयी तर बोलायलाच नको. हाताशी पैसा येण्याचाच उशीर, कसंही करून सजल्याच समजा मग त्या पॅरीस राजधानीच्या पोशाखाने. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स आणि जर्मन आज श्रीमंत देश, तिथल्या झाडून साऱ्यांचा पोशाख एकाच प्रकारचा – फ्रेंच धर्तीचा. युरोपमधल्या इतर देशांतही हळूहळू हाच पायंडा पडत आहे. सगळा युरोप म्हणजे फ्रान्सची नक्कल वाटते. तरी पण आजकाल पॅरीसपेक्षा लंडनचा पुरुषांचा पोशाख अधिक उठावदार. म्हणून पुरुषांचा पोशाख 'लंडनमेड' आणि बायकांचा पॅरीसच्या धर्तीचा. ज्यांच्याजवळ मुबलक पैसा, ते या दोन ठिकाणांहून कपडे शिववून आणून बारमहा तेच वापरतात. अमेरिका परदेशांतून येणाऱ्या पोशाखावर भलताच कर लादते. तो भरूनही तिथले लोक लंडनचा नि पॅरीसचाच पोशाख वापरतील. हे फक्त एकमेव अमेरिकनांनाच शक्य आहे – अमेरिका आहे आज कुबेराचं मुख्य ठाणं!

प्राचीन आर्यलोक धोतर-उपरणं वापरीत. क्षत्रिय विजार आणि लांब सदरा घालीत – लढाईच्या वेळी. इतर वेळी सगळ्यांचेच धोतर नि उपरणे. परंतु फेटा मात्र असेच. फार प्राचीन काळी भारतवर्षात बायका-पुरुष दोघेही फेटा बांधीत. आजही बंगालखेरीज करून इतर प्रांतांत बाकीचा पोशाख कसाही चालेल, एक कौपीन असली तरी पुरे, आंग झाकलं गेलं की झालं, पण फेटा मात्र हवाच! प्राचीन काळीही असंच होतं – बायका-पुरुष दोघांचंही. बौद्ध काळातल्या ज्या साऱ्या खोदीव मूर्ती सापडतात, त्यांच्यातील स्त्री-पुरुष दोघेही कौपीन नेसलेले असतात. बुद्धाचा बाप, एवढा राजा, पण कौपीन घालून सिंहासनावर बसला आहे. तशीच आईही. आईच्या बाबतीत जास्तीचे म्हणजे दागिने – गुडघ्यापर्यंत तोडे नि ढोपरापर्यंत वाळे. परंतु फेटा – तो मात्र आहेच हं डोईला! सम्राट अशोक धोतर नेसून, गळ्यात उपरणं अडकवून उघड्या अंगानं एका डमरूच्या आकाराच्या आसनावर बसूनच नाच बघताहेत! नाचणाऱ्या खुशाल नागड्या, कमरेपासून काही लहान लहान पट्ट्या लोंबत

आहेत. पण मुद्याची वस्तू, म्हणजे फेटा मात्र सलामत आहे! वेषभूषेतील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे फेटा! तथापि खासदार-दरकदार वगैरे दरबारी मंडळी विजार नि लांब सदरा घालून आहेत – चुस्त विजार नि चोगा. सारथी नळराजाने असा बेफाम रथ हाकला की राजा ऋतुपर्णाचे उपरणे कुठल्या कुठे उडून बेपत्ता झाले, ऋतुपर्ण राजा तसाच उघडावाघडा लगीन करायला गेला. धोतर-उपरणं आर्यांचा चिरंतनचा पोषाख, म्हणूनच धर्मकर्माच्या वेळी धोतर उपरणं घालावंच लागतं.

प्राचीन ग्रीकांचा आणि रोमनांचा पोषाख होता धोतर आणि उपरणं – कापडाचा एक मोठा तुकडा आणि दुसरा त्यापेक्षा लहान. त्या लहान तुकड्याला, अर्थात उपरण्याला म्हणत 'तोगा'. त्याचा अपभ्रंश हा 'चोगा'. तरीपण कधीकधी सदराही वापरला जाई. युद्धसमयी विजार आणि अंगरखा. बायकांचा पोषाख म्हणजे एक खूप लांबचवडा चारकोनी अंगरखा – दोन चादरी लांबीकडून एकमेकांना शिवल्याने होईल तसा. चवड्या बाजू बिनशिवलेल्या, उघड्या. तो अंगावर घेऊन दोन ठिकाणी बांधीत – स्तनांच्या खाली आणि पोटाच्या खाली, कमरेभोवती. त्यानंतर वरची खुली बाजू दोन्ही खांद्यावर दोन ठिकाणी मोठ्या पिनांनी टाचून देत – उत्तराखंडातील पहाडी लोक कांबळ पांघरतात त्याप्रमाणे. हा वेष अति सुंदर आणि सोपा. वर एक उपरणे.

बेतून केलेले कपडे एक इराणीच प्राचीन काळापासून वापरत. बहुधा ते चिन्यांकडून शिकले असावेत. चिनी म्हणजे सभ्यतेचे अर्थात भोगविलासाचे नि ऐषआरामाचे आद्य गुरू. अनादी काळापासून चिनी खुर्चीवर बसून टेबलावर जेवतात, खाण्यासाठी कितीतरी साधनं वापरतात आणि नाना प्रकारचा बेतून केलेला पोशाख वापरतात – विजार, सदरे, टोप्याबिप्या वापरतात.

शिकंदर बादशहाने इराण जिंकल्यानंतर आपल्या ग्रीक पद्धतीच्या धोतरा-उपरण्याला चाट देऊन विजार घालायला सुरुवात केली. त्यामुळे त्याचे स्वदेशी सैनिक इतके बिथरले की बंडापर्यंत पाळी येऊन ठेपली होती. पण

अलेक्झांडर मुलखाचा जिद्दी – त्याने विजार-सदऱ्याचा पायंडा पाडून दिलाच दिला.

गरम देशात कपड्यांची गरज फारशी नसते. लज्जा निवारण्यासाठी कौपीन पुरेशी असते – बाकीचे कपडे म्हणजे नुसते बरे दिसण्यासाठी – शोभेसाठी, अलंकार म्हणून. थंड देशात थंडीच्या तडाख्याने बेजार होऊन असभ्य अवस्थेत जनावरांची कातडी पांघरीत. हळूहळू कांबळ, मग धीरेधीरे अंगरखा, पायजमा वगैरे नानाप्रकार आले. शिवाय उघड्या अंगावर दागिने घालू जाणं म्हणजे थंडीनं मृत्यूच, म्हणून साहजिकच त्यांची अलंकारप्रियता कपड्यांकडे वळली. आपल्या देशात जशी दागिन्यांची फॅशन बदलते, तशी त्यांची घडोघडी बदलते कपड्यांची फॅशन.

म्हणूनच सर्वच थंड देशांमध्ये कुणासमोर जायचे म्हणजे सर्वदा सर्वांग झाकूनच – हा सामाजिक दंडक आहे. विलायतेत नीट सारा पोशाख चढविल्याखेरीज घराबाहेर पडता येत नाही. पाश्चात्त्य देशात स्त्रियांनी चारचौघात पाय दाखविणं मोठं लाजिरवाणं, परंतु गळा आणि छातीचा थोडा भाग उघडा टाकणं गैर नाही. आमच्या देशात बायकांनी चेहरा उघडा ठेवणं फारच लाजेचं, परंतु म्हणून तो झाकण्याकरता पदर ओढण्याच्या खटपटीत इकडे लुगडं वर सरून पोटऱ्या सपशेल उघड्या पडल्या तरी चालेल, त्याला हरकत नाही, राजपुतान्यात आणि हिमालयाकडे अष्टांग झाकून तळपोट तसंच ठेवतील!

पाश्चात्त्य देशांतील नर्तकी आणि वेश्या ह्या लोकांची मनं आकर्षून घेण्यासाठी बऱ्याच प्रमाणात अनाच्छादित असतात, त्यांचा नाच म्हणजे तालातालाने शरीर अनावृत करून दाखविणे. आमच्या देशात शरीर संपूर्णपणे आच्छादित नसते कुलीन स्त्रियांचे; नर्तकींचे, वेश्यांचे सर्वांग झाकलेले असते. पाश्चात्त्य देशांत स्त्रिया सदाच झाकल्या शरीराच्या, म्हणून त्यांनी अंग उघडे टाकल्यास आकर्षण जास्त. आमच्या देशात स्त्रिया रात्रंदिवस बहुतांश वेळ घरातच असतात, त्यामुळे त्यांचा पोशाख आपला गबाळा नि अस्ताव्यस्तच

असतो. म्हणून त्यांनी ठाकठिकीचा पेहराव करून सगळे अंग छान नीट झाकल्यानेच आकर्षण अधिक. मलबारकडे बायका-पुरुष कौपिनीवर एक कापड गुंडाळतात, बस् एवढाच त्यांचा पोशाख. बंगाल्यांचंही तसंच, फक्त कौपीन नसते, आणि पुरुषांसमोर बायका डोईवरून पदर ओढून सारं अंग मारे झाकून टाकतात.

पाश्चात्त्य देशांत पुरुष पुरुषांसमोर खुशाल उघडे होतात – आपल्याकडे बायकाबायकाच असताना त्या जसं वागतात तसं. बाप मुलगा नागडे होऊन आंघोळ वगैरे करतात, तिकडे हे चालतं. परंतु स्त्रियांसमोर, रस्त्यावर किंवा स्वत:चे घर सोडून इतरत्र सर्वांग झाकलेले असावयास हवे.

एक चिनी लोक सोडल्यास लज्जेच्या बाबतीत सर्वत्र मोठ्या विलक्षण कल्पना आढळून येतात. एखाद्या बाबतीत भलतीच लज्जा, तर खरोखर अत्यंत लाजेच्या बाबतीत थोडीदेखील लज्जा नाही, असला प्रकार! चिनी बायका-पुरुष नेहमी आपादमस्तक कपड्यांनी झाकलेले असतात. चिनी लोक कन्फ्यूशसचे चेले, बुद्धाचे चेले – त्यांची नीतिमत्ता अगदी खणखणीत. अश्लील बोलणं-चालणं त्यांना मुळीच खपायचं नाही. कोणी तसं करू लागल्यास लगेच त्याला ताळ्यावर आणण्यात येईल. ख्रिस्ती पाद्र्यांनी चीनमध्ये जाऊन चिनी भाषेत बायबल छापून टाकलं. आता, बायबलाची म्हणजे हिंदूंच्या पुराणांवरही कडी! त्यात वर्णिलेल्या देवतांच्या नि माणसांच्या भलभलत्या भानगडी वाचून चिनी तर रागाने लाल! म्हणू लागले – 'हे पुस्तक आमच्या देशात कदापि चालू देणार नाही. कसलं साऱ्या मुलखाचं अश्लील पुस्तक हे?' भरीत भर परत पाद्रिणी खुल्या गळ्याचा पोशाख घालीत, पडदा वापरीनात आणि चिनी लोकांना घरी येण्याची आमंत्रणे देत. चिनी बिचारे सरळ, धोपटमार्गी. ते म्हणू लागले की सत्यानाश झाला, हे लोक आमचा सत्यानाश करायला आले आहेत. हे अश्लील पुस्तक (बायबल) वाचायला देऊन आणि ह्या पाद्रिणींचे खुले देह दाखवून आमच्या तरण्याताठ्या पोरांना बिघडविण्यासाठी हा धर्म आमच्या देशात आला आहे. चिनी लोक ख्रिस्त्यांवर

जे एवढे खप्पा आहेत त्याचे कारण हे आहे. एरवी चिनी लोक कुणाच्याही धर्मावर आघात करणारे नाहीत. ऐकतो की पाद्र्यांनी आता अश्लील भाग वगळून बायबल छापलं आहे. पण त्यामुळे तर चिनी लोक आणखीच साशंक झाले आहेत!

परत ह्या पाश्चात्त्य देशांत जागोजाग लाजेशरमेचे वेगवेगळे प्रकार आढळतात. इंग्रज-अमेरिकनांची लज्जा एका प्रकारची, फ्रेंचांची एका प्रकारची. जर्मनांचा वेगळाच प्रकार. रशियन आणि तिबेट्यांत या बाबतीत बरेच साम्य. तुर्कांचा निराळाच थाट, इत्यादी इत्यादी.

वागणुकीचे प्रकार

आमच्या देशापेक्षा युरोपात व अमेरिकेत शौचादिकांच्या बाबतीत फारच लाज. आम्ही लोक शाकाहारी – टोपलीभर भाजीपाला खाणार. त्यातच आमचा देश भलताच उष्ण, एका दमात पाण्याचा लोटा आम्ही रिकामा करणार. उत्तरहिंदुस्थानी शेतकरी शेरभर सातूचं पीठ खाईल नि मग विहीरची विहीर रिकामी करील तहानेच्या सपाट्यात. उन्हाळ्याच्या दिवसांत आम्ही लोक पाणपोया घालतो जागोजाग, लोकांना पाणी प्यायला मिळावं म्हणून. अर्थातच मग ते इतकं पाणी जाणार कुठं? सारा देश विष्ठामूत्रमय होणार नाही तर काय होईल? गायींचा गोठा, घोड्यांचा तबेला आणि वाघसिंहांचा पिंजरा यांची तुलना करून बघा पाहू.

कुत्रा आणि बकरी यांची तुलना करा बघू. पाश्चात्त्य देशांचा आहार मांसप्रधान. साहजिकच थोडा. शिवाय देश थंड, म्हणून पाणी पिणे जवळजवळ नाहीच म्हटले तरी चालेल. सभ्य लोक इवल्याइवल्या प्याल्यांतून थोडेथोडे मद्य पितात. फ्रेंच लोक पाण्याला म्हणतात बेडकाचा रस! ते कसं प्यायचं? त्यातल्यात्यात अमेरिकन लोक थोडं जास्त पाणी पितात, कारण तिथे उन्हाळ्यात फार गरम असतं. न्यूयॉर्क कलकत्त्यापेक्षाही गरम. जर्मन लोक तडाखून 'बियर' पितात – परंतु जेवताना नव्हे तितकीशी.

थंड देशात पडसे होण्याची शक्यता सदाचीच. उष्ण देशात जेवताना

घटाघटा पाणी पिण्यात येणार. साहजिकच साहेब लोक शिंकल्याखेरीज राहू शकत नाहीत आणि आम्ही ढेकरा दिल्याखेरीज! तदनुसार त्यांचे-आमचे वागणुकीचे नियम बघा कसे वेगळाले झाले आहेत – त्यांच्याकडे जेवताना जर कुणी ढेकर दिला तर ती परमावधीची बेअदबी मानण्यात येते, परंतु तेच कुणी भर पंक्तीत खिशातून रुमाल काढून फर्रफर्र करून झक्क नाक शिंकरलं तरी कुणाला किळस यायची नाही. आमच्याकडे उलट. जेवताना पाहुण्यानं ढेकर दिल्याखेरीज यजमानाचं समाधान व्हायचं नाही! पण पाचजणांच्या पंक्तीत जेवताजेवता कुणी सटासटा शिंकू लागला तर? – कसं काय वाटेल ते आम्हाला?

इंग्लंड-अमेरिकेत बायकांपुढे शौचादिकांचं नाव देखील काढायची सोय नाही. परसाकडे जायचं ते अगदी गुपचुप – चोरून. बायकांसमोर 'माझं पोट अमळ गरम झालंय्' असं म्हणायला किंवा पोटाच्या कोणत्याही रोगाविषयी बोलायला मना. अर्थातच ओळखीच्या बायकांची किंवा म्हाताऱ्याकोताऱ्यांची गोष्ट वेगळी. त्यांच्यासमोर हे सारं बोललेलं चालतं. बायका शौचादिकांच्या वेगानं एक वेळ मरण पत्करतील. पण पुरुषांसमोर त्यांचं नाव देखील काढणार नाहीत.

फ्रेंच लोक या बाबतीत इतके कडक नाहीत. फ्रान्समध्ये स्त्रियांच्या शौचादिकांच्या स्थानांजवळ पुरुषांची स्थानं ही आढळतील; त्या एका दारानं जातात, हे दुसऱ्या दारानं. पुष्कळ ठिकाणी तर दार एकच, फक्त खोल्या वेगवेगळ्या. रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना मधेमधे मुत्र्या आढळतील. त्यांत फक्त पाठीपर्यंतच झाकले जाईल. बायका बघतात, त्याची लाज नाही – आमच्याकडल्यासारखं. अर्थातच बायका असल्या खुल्या जागी जात नाहीत. जर्मनीत या बाबतीत आणखीच मोकळीक.

इंग्रज-अमेरिकन हे बायकांसमोर बोलण्याचालण्यातही फार सावध. 'मांडी' 'तंगडी' 'पाय' वगैरे शब्द उच्चारण्याची देखील सोय नाही. या बाबतीत फ्रेंच लोक आमच्यासारखेच खुल्या तोंडाचे. जर्मन, रशियन वगैरे

लोक सर्वांसमोर या बाबतीत आचकटविचकट थट्टा करतील.

परंतु तिकडे प्रेम-प्रणयाच्या गोष्टी मात्र मायलेकांत, भावाबहिणींत, बापापोरांत खुशाल चालतात – त्यांना हरकत नाही. बाप आपल्या मुलीची तिच्या प्रियकरावरून (भावी वरावरून) नानाप्रकारे थट्टा करील व तिला त्याच्यासंबंधी विचारील. फ्रेंच मुलगी अशा प्रसंगी मान खाली घालील, इंग्रज मुलगी लाजेल आणि अमेरिकन मुलगी चटपट जबाब देईल. चुंबन, फार काय पण आलिंगन देखील दोषावह मानले जात नाही, अश्लील समजले जात नाही. यासंबंधी उघडउघड बोललेलं चालतं. अमेरिकेमध्ये, कुटुंबाशी विशेष घसट असल्यास पुरुषदेखील त्या कुटुंबातील तरण्याताठ्या मुलीशी शेकहँड करण्याऐवजी त्यांचे चुंबन घेईल. आमच्या देशात प्रेमाबिमाचे नाव सुद्धा वडिलधाऱ्यांसमोर काढण्याची सोय नसते.

त्या लोकांजवळ पैसा रग्गड. अगदी चक्क, तंतोतंत शिष्टाचाराबरहुकूम पोशाख न केल्यास तिकडे माणूस 'हलका' ठरतो, त्याला समाजात मिसळता यायचे नाही. 'सभ्य' ठरण्यासाठी दिवसातून दोनतीनदा तरी परीटघडीचे सदरे नि कॉलरी बदलावयास हव्यात! गरीब लोकांना अर्थातच ह्या इतक्या भानगडी जमण्यासारख्या नसतात. वरच्या कपड्यावर लहानसा डाग किंवा एखादी वळी-सुरकुती असली तरी महा मुश्कील! उष्म्याने उकडून निघत असलात तरी हरकत नाही, पण बाहेर पडायचे म्हणजे हातमोजे घालूनच. एरवी रस्त्यात हात मळणार, आणि त्या तसल्या हाताने का स्त्रियांशी हस्तांदोलन करणार? केवढी असभ्यता! सभ्य लोकांच्या मेळाव्यात थुंकी फेकणे, आचवणे, दांत कोरणे वगैरे हातून घडल्यास तात्काळ चंडालत्वप्राप्ती!!

पाश्चात्त्यांचा धर्म-शक्तिपूजा

या लोकांचा धर्म म्हणजे शक्तिपूजेचा, अर्धवट वामाचारासारखा – पंच मकारांतील शेवटची अंगे वगळून. "वामे वामा ... दक्षिणे पानपात्रम् ... अग्रे न्यस्तं मरीचसहितं शूकरस्योष्णमांसं ... कौलो धर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः।" उघड उघड, सर्वसाधारणतः हीच वामाचारी शक्तिपूजा.

मातृभाव, म्हणजे परम शक्तीशी आई-मुलाचे नातेही बऱ्याच अंशी आढळते. प्रॉटेस्टंट पंथाचा प्रभाव तर युरोपात यथातथाच, तिथला धर्म तर वस्तुतः कॅथॉलिकच. त्या कॅथॉलिक धर्मात जिहोवा, येशू, त्रिमूर्ती सारं सुप्त. त्या धर्माचं जाग्रत दैवत आहे – 'मदर' (आई)! बाल येशूला कडेवर घेतलेली 'आई'! लाखो ठिकाणी, लाखो तऱ्हांनी, लाखो रूपांनी राजवाड्यांत, मोठमोठ्या देवळा-रावळांत, रस्त्यांत, झोपडीत 'मदर' 'मदर' 'मदर'! जगन्मातेचा, जगदंबेचा सर्वत्र उदोउदो! सम्राट गर्जत आहे 'मदर' म्हणून, रणधुरंधर सेनानी गर्जत आहे 'मदर' म्हणून, ध्वज हाती घेतलेला सैनिक गर्जत आहे 'मदर' म्हणून, बोटीवरचा नावाडी गर्जत आहे 'मदर' म्हणून, भोई गर्जत आहे 'मदर' म्हणून, रस्त्यावरला भिकारी गर्जत आहे 'मदर' म्हणून. 'धन्य मेरी' 'धन्य मेरी' 'Ave Maria' 'Ave Maria' – रात्रंदिवस हाच ध्वनी उठतो आहे.

अन् नारीची पूजा. ही शक्तिपूजा केवळ कामुकता नव्हे. ही शक्तिपूजा म्हणजे कुमारीपूजा, सधवापूजा – जी आमच्या देशात काशी, कालीघाट प्रभृती तीर्थस्थानी होते, तीच शक्तिपूजा. केवळ कल्पनेने शक्तीची पूजा नव्हे ही. ही प्रत्यक्ष, साक्षात् शक्तीची पूजा. फरक हाच की आमची असली शक्तिपूजा फक्त ह्या तीर्थस्थानीच, फक्त त्या तेवढ्या वेळेपुरतीच असते. ह्यांची मात्र अहोरात्र, सदा सर्वत्र, बाराही महिने. आधी नारीचं आसन; आधी शक्तीचं वसन, भूषण, भोजन, उच्च स्थान; आधी तिचा आदर, सन्मान. कुलीन स्त्रीविषयी तर बोलावयासच नको, रूपवतीविषयी तर बोलावयासच नको; ही त्यांची नारीपूजा म्हणजे प्रत्येक नारीचीच पूजा, वाटेल त्या स्त्रीची पूजा – ती ओळखीची असो की अनोळखी असो. ही असली शक्तिपूजा युरोपात सुरू केली मूर लोकांनी – मुसलमानी धर्माच्या, अरबमिश्र मूर लोकांनी, – ज्या समयी त्यांनी स्पेन जिंकून त्यावर आठ शतके राज्य केले त्या समयी. युरोपात पाश्चात्त्य सभ्यतेचे बीजारोपण त्यांनीच केले – आणि ह्या शक्तिपूजेचेही. त्यांच्यापासूनच युरोपात सभ्यतेचा उन्मेष, शक्तिपूजेचा उदय.

काळाच्या ओघात मूर तिला विसरले, विसंबले आणि – शक्तिहीन श्रीविहीन होऊन गेले, स्वस्थानच्युत होऊन आफ्रिकेच्या एका कोपऱ्यात विस्कटलेले, उपेक्षित, रानटी जीवन जगू लागले. अन् त्या शक्तीचा संचार झाला युरोपात – आई जगदंबा मुसलमानांना सोडून ख्रिश्चनांच्या घरात गेली – आपल्या आशीर्हास्यानं मग तिनं त्यांची घरंदारं उजळली.

हा युरोप काय आहे? काळे, अर्धवट काळे, पिवळे, लाल – आशिया, आफ्रिका, अमेरिकेचे सारे रहिवासी का बरे ह्यांच्या पायाशी लोळण घेताहेत? कां बरे हे या कलियुगाचे एकाधिपती?

फ्रान्स-पॅरीस

हा युरोप समजून घ्यावयाचा असल्यास, पश्चिमेत जे काही मोठे आहे, जे काही थोर आहे त्या साऱ्यांचे आगर जो फ्रान्स, त्या फ्रान्समधून तो समजून घ्यावा लागेल. पृथ्वीचं आधिपत्य युरोपकडे. अन् ह्या युरोपचं महाकेंद्र? – पॅरीस. पाश्चात्त्य सभ्यतेचं, रीतीनीतीचं, अंधारउजेडाचं, भल्याबुऱ्याचं, साऱ्याचं अंतिम परिपुष्ट रूप आढळतं – इथेच, ह्या पॅरीस नगरीतच.

हे पॅरीस म्हणजे एक महासमुद्र – रत्ने, मोती, प्रवाळ त्यात यथेच्छ, परत सुसरी-मगरही खूप. हा फ्रान्स युरोपचं कर्मक्षेत्र. सुंदर देश – चीनचा काही भाग वगळल्यास असा प्रदेश आणखी कुठे बघितला नाही. फार थंड ही नाही फार गरम ही नाही. अत्यंत सुपीक, अतिवृष्टीही नाही, अनावृष्टीही नाही. ते निर्मळ आकाश, गोड ऊन, डोळे निववणारी हिरवळ, छोटेछोटे पहाड, ओकप्रभृती झाडांची मुबलकता, लहानलहान नद्या, झुळझुळते निर्झर. जलात रूप, सृष्टीत मोह, वायूत उन्मत्तता, आकाशात आनंद! निसर्ग सुंदर, माणूस सौंदर्यप्रिय. आबालवृद्धवनिता, धनी-दरिद्री साऱ्यांनीच आपापली घरंदारं, शेतं-आंगणं, सगळं स्वच्छ, लक्ख, चक्क साजून-सजवून ठेवलं आहे – जणुकाही एकेक चित्रच. एक जपान सोडल्यास निसर्गाचं नि कलेचं असलं वेडं प्रेम आणखी कुठेच गवसायचं नाही. इंद्रभुवनासारख्या त्या राजशाही हवेल्या, नंदनवनासारखी उद्याने, उपवने, फार काय पण

शेतकऱ्यांची शेते – सगळ्यांतच थोडंसं सौंदर्य, थोडीशी कला दाखविण्याचा हव्यास – आणि तो सफल पण झाला आहे.

हा फ्रान्स प्राचीन काळापासून गॉल (Gaulois) रोमन, फ्राङ्क (Franks) प्रभृती जातींची संघर्षभूमी. ह्याच फ्राङ्क जातीने रोमन साम्राज्याच्या विनाशानंतर युरोपात एकाधिपत्य प्राप्त केले. त्यांचा राजा शार्लिमान (Charlemagne) याने युरोपात ख्रिस्तीधर्म तलवारीच्या जोरावर पसरून दिला. ह्या फ्राङ्क जातीद्वाराच आशियाला युरोपची ओळख झाली. म्हणून आजही युरोपियनांना आम्ही संबोधत असतो – फ्राङ्की, फिरंगी, प्लांकी, फिलिंग वगैरे नावांनी.

पाश्चिमात्य. सभ्यतेचे आदिपीठ जो ग्रीस, त्याचा गौरवरवी अस्तास गेला, सामंतचक्रवर्ती रोमचे राजसिंहासन रानटी टोळ्यांनी घाले घालून तोडून-फोडून छिन्नभिन्न करून टाकले – रोमचे प्रचंड साम्राज्य खिळखिळे झाले, मोडकळीस आले, मोडले, नाहीसे झाले. युरोपचा दिवा विझला. त्याच सुमारास इकडे आशियाखंडात आणखी एका अत्यंत रानटी जातीचा उदय झाला – अरब जातीचा. प्रचंड धडका देत ती अरबांची लाट साऱ्या पृथ्वीभर सपाट्याने पसरू लागली! महाबलशाली पर्शियाला अरबांच्या पायतळी लोळण घ्यावी लागली, मुसलमान धर्माचा स्वीकार करावा लागला. परिणाम त्याचा असा की मुसलमान धर्माला एक निराळेच स्वरूप प्राप्त झाले – अरबी धर्माचा नि पारसी सभ्यतेचा मिलाफ झाला.

अरबांच्या तलवारींबरोबर पारसी सभ्यता पसरू लागली, फैलू लागली. ती पारसी सभ्यता प्राचीन ग्रीसमधून नि भारतवर्षातून घेतलेली होती. पूर्व-पश्चिम दोन्हीकडून प्रचंड बलाने मुसलमानी लाटा युरोपवर धडकू लागल्या. त्याबरोबरच रानटी युरोपचा अज्ञानान्धकार सभ्यतेच्या नि ज्ञानाच्या उजेडाने उजळू लागला. प्राचीन ग्रीसची विद्या, ज्ञान नि कला यांनी रानटी जमातींनी आक्रमिलेल्या इटलीत प्रवेश केला; विश्वराजधानी रोमच्या मृत शरीरात प्राणसंचार होऊ लागला. त्या स्पंदनाने फ्लॉरेन्स नगरीत प्रबल स्वरूप धारण

केले – प्राचीन इटली नवजीवन संचरून जिवंत होऊ लागली. ह्यालाच म्हणतात 'Renaissance' वा 'नव-जन्म'. परंतु हा नव-जन्म फक्त इटलीच्या दृष्टीनेच पुनर्जन्म होता, युरोपातील इतर देशांचा हा प्रथम जन्म – पहिलाच जन्म होता. युरोपचा जन्म झाला इसवी सनाच्या सोळाव्या शतकात – अकबर, जहांगीर, शहाजहान प्रभृती मोगल सम्राटांनी भारतात महाबलशाली साम्राज्य उभारले त्या दिवसात.

इटली म्हातारा देश. रेनेसान्सच्या स्पर्शानं तिची झोप चाळवून तिनं जाग आल्याचं चिन्ह दाखविलं खरं, पण तात्पुरतं. कड बदलून ती फिरून झोपी गेली. त्याच समयी नाना कारणांनी भारत वर्ष ही अमळ जागा झाला होता – अकबरानंतर तीन पिढ्यांच्या राज्यकाळात ज्ञान, विद्या, कला वगैरेंना खूपच चांगले दिवस आले होते. परंतु भारतही खूप म्हातारा देश. नाना कारणांनी तोही इटलीसारखाच कूस फिरवून परत झोपी गेला.

युरोपात इटलीच्या पुनर्जन्माचा, या पुनरुत्थानाचा पडसाद उठला बलवान, तरुण, नूतन, फ्राङ्क जातीत. चोहीकडून सभ्यतेच्या साऱ्या धारा येऊन फ्लॉरेन्स नगरीत संमीलित होऊन त्यांनी अभिनव रूप धारण केले. परंतु इटलीच्या ठायी ते तेज धारण करण्याची कुवत नव्हती. भारताप्रमाणेच तो उन्मेष तिथेच समाप्त झाला असता, परंतु युरोपच्या सुदैवाने ह्या नूतन फ्राङ्क जातीने कदर करून ते तेज ग्रहण केले. नवीन रक्त, नवीन जात – त्या लोंढ्यात मोठ्या साहसाने त्यांनी आपली राष्ट्रनौका सोडून दिली. त्या स्रोताचा वेग क्रमशः सारखा वाढू लागला, ती एक धारा उधाण येऊन शतधारांनी धो धो वाहू लागली. युरोपातल्या इतर देशांना लोभ सुटला, कालवे खणून ते पाणी ते आपापल्या देशात घेऊन गेले, आणि त्यांत त्यांनी स्वतःच्या जीवनशक्तीची भर घातल्यामुळे त्यांचा वेग नि विस्तार वाढू लागला. यथाकाळी भारताच्या किनाऱ्यावर तो लोंढा येऊन धडकला. जपान त्याच्या धडाक्याने खडबडून उठला, ते पाणी पिऊन धुंद बनला. जपान आशियातील नूतन देश.

हे पॅरीस नगर युरोपीय सभ्यतागंगेचे गोमुख. ही विराट राजधानी म्हणजे मर्त्यलोकातील अमरावती, सदानंदनगरी. ते भोग, ते विलास, तो आनंद ना लंडनमध्ये, ना बर्लिनमध्ये ना आणखी कुठेच. लंडन-न्यूयॉर्कमधे धन आहे. बर्लिनमध्ये विद्याबुद्धी भरपूर, पण नाही कुठेही ती फ्रेंच माती, आणि साऱ्यांपेक्षा म्हणजे नाही कुठेही तो 'फ्रेंच' माणूस. धन असेल, विद्याबुद्धी असेल, नैसर्गिक सौंदर्यही असेल, पण – माणूस कुठाय्? फ्रेंच स्वभाव अगदी अद्भुत – प्राचीन ग्रीस मरून फ्रान्सच्या रूपानं जन्मला आहे जणू – सदा आनंद, सदा उत्साह, अतिपोरकट आणि परत अति गंभीर; प्रत्येक कामात उद्दीपना, परत थोडीसुद्धा आडकाठी आली की निरुत्साह. परंतु ते नैराश्य फ्रेंच चेहऱ्यावर फार वेळ टिकत नाही, फिरून लगेच त्यावर आशा-भरवसा फाकतात.

ह्या पॅरीसचं विश्वविद्यालय अवघ्या युरोपच्या विद्यापीठांचा आदर्श. दुनियेतल्या साऱ्या विज्ञानसमित्या ह्यांच्याच ॲकॅडेमीची नक्कल. वसाहतीची राज्ये स्थापण्यात पॅरीसच गुरू होय. सर्व भाषांतील लष्करी शब्द अजूनही बहुतांश फ्रेंचच आहेत. ह्यांच्या शैलीची नक्कल सर्व युरोपीय भाषांतून होत असते. दर्शन, विज्ञान, कला यांची हे पॅरीस नगर खाण आहे, सर्व ठिकाणी यांची नक्कल. फ्रेंच जणू शहरी, बाकी सारे जणू खेडवळ. हे जे करतात त्याची पन्नास वर्षांनी, पंचवीस वर्षांनी, जर्मन, इंग्रज प्रभृती नक्कल करतात – मग बाब विद्येची असो, कलेची असो की समाजकारणाची असो. ही फ्रेंच सभ्यता स्कॉटलंडमध्ये जाऊन ठेपली आणि स्कॉच राजा इंग्लंडचा राजा झाला तेव्हा या फ्रेंच सभ्यतेने इंग्लंडला जागे केले – स्कॉटलंडच्या स्टुअर्ट घराण्याच्या शासनकालातच इंग्लंडमध्ये रॉयल सोसायटी प्रभृती संस्थांची स्थापना झाली.

आणि हा फ्रान्स म्हणजे स्वाधीनतेचे माहेर. प्रजाशक्ती महावेगानं ह्या पॅरीस नगरीहून निघून तिनं साऱ्या युरोपला घुसळून काढलं – अगदी पायासहित गदगदा हालविलं. तेव्हापासून युरोपचा पार कायापालट झाला,

नवयुरोप जन्माला आला. तो 'लिबर्ते, एगालिते, फ्रातर्निते' ('Liberte', 'Egalite', 'Fraternite' – Liberty, Equality, Fraternity – स्वाधीनता, समता आणि बंधुत्व) यांचा ध्वनी फ्रान्समधून नाहीसा झाला आहे, फ्रान्स अन्य आदर्शांचे, अन्य उद्दिष्टांचे अनुसरण करीत आहे, परंतु युरोपातील इतर देश अजूनही त्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या वातावरणात आहेत, अजूनही त्यांच्यावर तिचा पगडा आहे.

एकजण स्कॉटलंडचा प्रसिद्ध वैज्ञानिक परवा मला म्हणाला की पॅरीस आहे पृथ्वीचे केंद्र; जो देश जितक्या प्रमाणात ह्या पॅरीस नगरीशी आपला संबंध स्थापू शकेल, तो तितक्या प्रमाणात उन्नत होईल. म्हणणं अमळ अतिशयोक्तीचं आहे खरं, तरीपण एवढं मात्र अगदी खरं की, जर कुणाला एखादा नूतन भाव वा आदर्श जगाला द्यावयाचा असेल तर हे पॅरीसच होय त्याच्या प्रचाराचे स्थान. ह्या पॅरीसने जर साद दिली तर साऱ्या युरोपभर तिचा पडसाद उठेल. शिल्पी, चित्रकार, गायक वा नर्तक ह्या महानगरीत प्रथम प्रतिष्ठा प्राप्त करून घेऊ शकल्यास इतर सर्व देशांत मग त्याला अगदी सहजच प्रतिष्ठा लाभते.

आमच्या देशात ह्या पॅरीस शहराचं बदनामच ऐकू येतं – पॅरीस म्हणजे खराब महा घाणेरडं, वेश्यांनी भरलेलं नरककुंड वगैरे वगैरे वगैरे. अर्थात हे असं इंग्रजच म्हणत असतात; आणि इतर देशांतील ज्या साऱ्या लोकांजवळ पैसा आहे व जिव्हा-उपस्थ सोडून आणखी कोणताही भोग ज्यांच्या जीवनात अशक्य, त्यांना अर्थातच पॅरीसमध्ये त्या तसल्या भोगांच्या साधनांखेरीज आणखी काहीही दिसत नाही! त्यांना पॅरीस हे लंपट, विलासी, अनीतिमानच वाटणार!

वस्तुत: लंडन, बर्लिन, व्हिएन्ना, न्यूयॉर्क वगैरे मोठमोठ्या शहरांतही हा सारा प्रकार एवढ्याच प्रमाणावर चालला असतो, या बाबतीत झाडून सगळे एकाच माळेचे मणी, कुणी कुणाला नाक मुरडायला नको. तरीपण त्यांतदेखील फरक हाच की इतर देशांतील भोगविलास नि त्यांची साधने

अगदी खालच्या दर्ज्याची, पशुवत् असतात, तर पॅरीसची – सभ्य पॅरीसची घाणही सोन्याचा वर्ख लावलेली असते. जंगली डुकराचं चिखलात लोळणं अन् मोराचं पिसारा पसरून नाचणं यांत जितका फरक, तितकाच इतर शहरांतले रानटी, पाशवी भोग नि ह्या पॅरीसचे नितळ विलास यांमध्ये फरक आहे.

भोगविलासाची इच्छा कोणत्या जातीत, कोणत्या देशात नाही, सांगा बघू? एरवी, जगात कुठेही ज्याच्या गाठी दोन पैसे जमतात तो तडक पॅरीसला पळतो ते काय म्हणून? राजेरजवाडे नि मोठमोठे बादशहा नाव बदलून नि वेष पालटून ह्या पॅरीसची वारी करून तिथल्या विलासांच्या भोवऱ्यांत गुपचुप गिरक्या घेण्यात धन्य होण्यासाठी इथे येतात ते का? इच्छा सर्वत्र सर्वच देशांत आहे, ती पुरी करण्यासाठी खटाटोप करण्यातही कुणी मागे नाही. फक्त, हे (फ्रेंच) त्यात पूर्ण सिद्ध झाले आहेत, भोग कसा घ्यावा हे ते जाणतात, विलासाचा सप्तम सूर त्यांनी गाठला आहे.

त्यातही परत पॅरीसमधले अधिकांश वाईटसाईट नाच तमाशे विदेशियांकरताच असतात. फ्रेंच लोक मोठे धोरणी, मोठे सावध; कधी फालतू खर्च करणार नाहीत. हे सारे घोर विलास, ही सारी हॉटेलं, कॅफे – ज्यांत एकवार खाल्ल्यानं माणसाचं दिवाळंच निघावं – हे सारं विदेशी महामूर्ख श्रीमंतांसाठी. फ्रेंच लोक मोठे सभ्य, शिष्टाचार खूप पाळतात; खूप वरवर करतील, तुमच्याकडून पैसा काढतील, अन् गालातल्या गालात हसतील.

आणखीही एक गंमत सांगण्यासारखी आहे बघा. अमेरिकन, जर्मन, इंग्रज प्रभृती समाज मुक्तद्वार – परक्यांना उघडे. विदेशी माणूस झपकन् त्यांच्या आतलं सारंकाही पाहू शकतो. दोनचार दिवसांच्या ओळखीतच अमेरिकन तुम्हाला आपल्या घरी चार आठ दिवस राहण्यासाठी बोलावील. जर्मनांचेही तसेच. इंग्रज जरा वेळ घेईल, पण फ्रेंचाचं या बाबतीत वेगळंच तंत्र. अगदी खूप दाट जानपछान झाल्याखेरीज तो तुम्हाला कधी आपल्या कुटुंबात मिसळू देणार नाही. परंतु एकदा का विदेशी माणसाला अशी संधी मिळाली, एकदा

का फ्रेंच कौटुंबिक जीवन जवळून न्याहाळण्याची संधी मिळाली की मग त्या परक्या माणसाची फ्रेंचांसंबंधीची धारणा अगदी वेगळी होऊन जाते. ऐकण्यातला आणि प्रत्यक्ष पाहण्यातला फरक त्याला कळून येऊन अपसमज पार विरून जातात. मेछुआ बाजार (कलकत्त्यातील एक वाईट वस्ती) बघून पुष्कळसे दीडशहाणे विदेशी लोक आमच्या सरसकट एकूण जातीच्या चारित्र्याबद्दल जी अकटोविकट मतं प्रदर्शित करीत असतात ती कितपत शहाणपणाची असतात बरे? तसंच ह्या पॅरीसचं. अविवाहित मुली इथे आमच्या देशातल्याइतक्याच सुरक्षित असतात, त्यांना समाजात वाटेल तसे मिसळता येत नसते. फारच थोडे मिसळू शकतात त्या मुली समाजामधे. लग्नानंतर मगच आपल्या नवऱ्याबरोबर त्या समाजात मिसळतात. लग्नबिग्न आईबापच ठरवतात – अगदी आमच्याकडल्यासारखं. अन् हे मोठे आनंदी लोक, मोठे आमोदप्रिय – त्यांचा कोणताही सामाजिक प्रसंग नर्तकीच्या नाचाखेरीज पार पडत नाही. आपल्याकडेही लग्न, मोठमोठ्या पूजा वगैरे म्हटल्या की जसा नाच आलाच, तसंच त्यांचं. इंग्रज सदाचेच सुरकुतल्या चेहऱ्याचे; राहतातही धुकाळ, अंधाऱ्या देशात; सदा आंबलेले, निरानंद. घरी असले नाच करणं मोठं अश्लील त्यांच्या मते. पण तेच थेटरात केले तर मात्र त्यांची हरकत नाही – सारं घरदार जाईल बघायला! आता हे मात्र म्हटलंच पाहिजे की त्यांचे हे नाच आमच्या डोळ्यांना अश्लील वाटतील खरे, पण त्यांच्या ते सगळं आपलं अंगवळणी पडून गेलं आहे. खुल्या गळ्या-खांद्यानं ती नाचेल, यांना त्याचं काही वाटत नाही. इंग्रज-अमेरिकन जाऊन असले नाच बघायचंही सोडणार नाहीत अन् नाक मुरडत घरी येऊन टवाळी करायचंही सोडणार नाहीत!

स्त्रीविषयक वागणूक

स्त्रीच्या बाबतीत वागणूक पृथ्वीच्या पाठीवरील सर्व देशांत सारखीच, म्हणजे पुरुषाचा अन्य स्त्रीशी संबंध आल्यास ते तितकंसं दोषावह नाही, परंतु स्त्रीच्या वेळी मात्र मुश्कील! तरीपण फ्रेंच पुरुष या बाबतीत अमळ मोकळाच

– इतर देशांतले बडे लोक यासंबंधी जसे बेपर्वा असतात, तसा. अन् युरोपियन पुरुष साधारणत: या गोष्टी तितक्या दोषास्पद लेखीत नाहीत. पाश्चिमात्य देशांत अविवाहितांच्या पक्षी या गोष्टी फारशा वावग्या मानल्या जात नाहीत. उलट तरणाताठा विद्यार्थी ह्या बाबतीत अगदीच 'हा' असल्यास पुष्कळदा त्याचे आईबाप तो आपल्या मुलातला अयब मानतात, कारण की न जाणो पोरगा पुढे बायकी न निपजो. पाश्चात्त्य देशांत पुरुषात एक गुण असायला हवा, तो म्हणजे – साहस. त्यांचा व्हर्चू (virtue) आणि आमचे 'वीरत्व' एकच शब्द; या शब्दाच्या उत्पत्तीवरूनच कळून येईल की ते कशाला पुरुषांतला चांगुलपणा मानतात. स्त्रियांच्या पक्षी मात्र सतीत्वाची अट त्यांच्याकडेही आहेच. तिकडेही स्त्रीचा तो सर्वांत मोठा गुण मानला आहे. स्त्रीच्या पक्षी सतीत्व अत्यावश्यक – आपल्याकडे काय किंवा त्यांच्याकडे काय पुरुषाने एका वेळी अनेक बायका केल्यास जातीला ते तितकेसे हानिकारक ठरत नाही. उलट त्याने वंशवृद्धी खूप होते. परंतु स्त्रीने एकाच वेळी एकापेक्षा अधिक नवरे करणे जातीला घातुक ठरते. अशा स्त्रीला वंध्यत्व येते. स्त्रीच्या सतीत्वाचा नाश झाल्यास तिला मुलेबाळे होत नाहीत. त्यामुळे समस्त जातीचा ऱ्हास होतो, ध्वंस होतो. म्हणूनच सर्वच देशांत स्त्रीच्या सतीत्वावर विशेष भर दिला जात असतो आणि पुरुषाला मोकळीक असते. स्त्रीच्या सतीत्वाचे रक्षण करण्याच्या ह्या प्रत्येक समाजाच्या धडपडीमागे निसर्गाचा हात दिसतो. लोकसंख्येची वृद्धी करणे ही निसर्गाची प्रवृत्ती आहे. स्त्रीचे सतीत्व निसर्गाच्या ह्या प्रवृत्तीला पोषक ठरते – स्त्रीच्या सतीत्वानं ह्या निसर्गाच्या कार्याला हातभार लागतो.

ह्या साऱ्या गोष्टी सांगण्याचे कारण म्हणजे मला तुमच्या मनावर बिंबवून द्यायचं आहे की प्रत्येक जातीच्या जीवनाचा एकेक नैतिक उद्देश असतो. त्या त्या जातीच्या चालीरातींचा विचार तिचा तो जीवनोद्देश लक्षात घेऊनच करावयास हवा. त्यांच्या डोळ्यांतूनच त्यांच्याकडे बघावयास हवे. आमच्या दृष्टिकोनातून त्यांच्याकडे बघणे आणि त्यांच्या दृष्टिकोनातून आमच्याकडे

बघणे – दोन्ही गैर, दोन्ही चूक.

आमच्या जीवनाचा उद्देश त्यांच्या अगदी उलट. आम्ही विद्यार्थ्याला म्हणतो ब्रह्मचारी. आणि ब्रह्मचारी या शब्दाचा अर्थच आहे कामजित – काम जिंकणारा. विद्यार्थी आणि कामजित एकच. आमच्या जीवनाचा उद्देश आहे मोक्ष. ब्रह्मचर्याविना तो कसा सिद्ध होणार बरे? म्हणून आमच्या मुलांना आणि तरुणांना विद्यार्थीदशेत ते अगदी अपरिहार्य म्हणून सांगितले गेले आहे. पाश्चिमात्यांच्या जीवनाचे उद्दिष्टच भोग. साहजिकच कडकडीत ब्रह्मचर्य पाळण्याचे महत्त्व आपल्याइतके त्यांना न वाटणे स्वाभाविकच आहे. त्यांना ते तितकेसे आवश्यक किंवा अपरिहार्य वाटत नाही.

असो तर, मुख्य मुद्दा काय की ह्या पॅरीससारखे शहर पृथ्वीच्या पाठीवर आणखी दुसरे नाही! पूर्वीच्या काळी ते होते अगदी निराळेच – अगदी आपल्या काशीतल्या बंगाली मोहल्यासारखे. वाकड्यातिकड्या गल्ल्याबोळी न् रस्ते, मधेमधे दोन घरांना जोडणाऱ्या कमानी, भिंतींना लागूनच विहिरी – असला प्रकार. गेल्या प्रदर्शनामध्ये त्या जुन्या पॅरीसचा एक नमुना करून ठेवण्यात आला होता. ते पॅरीस हळूहळू बदलत कुठल्या कुठे नाहीसं झालं आहे. लढाया अन् बंडाळ्यांच्या धुमाकुळीत प्रत्येक वेळी कधी हा तर कधी तो भाग तुटूनफुटून जमीनदोस्त होत गेला आहे आणि त्या जागी उभारले गेले आहे नवीन, रेखीव, सुबक, प्रशस्त पॅरीस.

आजचे पॅरीस बहुतांशी तिसऱ्या नेपोलियनने उभारले आहे. जुन्या एकछत्री राजसत्तेच्या पडत्या काळातच सुरू झालेले ह्या शहराचे भौतिक परिवर्तन तिसऱ्या नेपोलियनने पूर्ण केले. फ्रेंच राज्यक्रांतीच्या पूर्वी फ्रेंच जनता तिथल्या एकछत्री सम्राटांकडून कशी गांजली जात होती हे फ्रान्सचा इतिहास जाणणाऱ्यांना निराळे सांगावयास नकोच. तिसऱ्या नेपोलियनने तरवारीच्या जोरावर, प्रेतांचा खच तुडवीतच सिंहासन गाठले. फ्रान्समधील पहिल्या राज्यक्रांतीपासून फ्रेंच जनता नेहमीच डळमळती असे, केव्हा बिथरून ती सिंहासन गदगदा हालवील याचा नेम नसे. म्हणून फ्रेंच प्रजेला संतुष्ट

ठेवण्यासाठी आणि पॅरीसमधील सदा अस्थिर अशा गरीब वर्गाला काम देऊन खूष करण्यासाठी बादशहा सारखे एकामागून एक सुंदर, प्रशस्त रस्ते, तट, कमानी, नाटकगृहे वगैरे बांधू लागले. अर्थातच जुन्या पॅरीसची सारी जुनी मंदिरे, कमानी, स्तंभ वगैरे सारे तसेच कायम राखण्यात आले. रस्ते, चौक सारे नवीन करण्यात आले. जुनं शहर मोडून, तटाच्या भिंती पाडून दुतर्फा झाडे नि भव्य सुंदर इमारती असलेले मोठमोठे लांबरुंद रस्ते तयार करण्यात आले. या घडामोडीतच साऱ्या जगातील अद्वितीय असा Champs Elysees नामक रस्ता निर्माण झाला. हा रस्ता इतका रुंद आहे की त्याच्या मधोमध आणि दोन्ही कडांना उभ्या रस्ताभर बगीचा लावलेला आहे. एका ठिकाणी त्याला एका मोठ्या वर्तुळाचा आकार आलेला आहे. त्याला नाव देण्यात आले आहे प्लास द ला कॉन्कार्द (Place de la concarde) ह्या प्लास द ला कॉन्कार्दच्या भोवती प्राय: समान अंतरावर फ्रान्सच्या प्रत्येक जिल्ह्याची एक एक स्त्रीमूर्ती करून उभारण्यात आली आहे. त्यांपैकी एक मूर्ती आहे स्ट्रासबर्ग जिल्ह्याची. हा जिल्हा जर्मन लोकांनी १८७२ सालच्या लढाईनंतर फ्रान्सच्या हातून हिसकावून घेतला. ते दु:ख फ्रान्सच्या मनातून अजूनही गेलेले नाही. तिच्यातील मृतात्म्याला उद्देशून अजूनही त्या मूर्तीला फुलेमाळा वाहिल्या जातात. ज्या प्रकारच्या माळा लोक आपल्या नातेवाइकांच्या समाधिस्थानाला वाहत असतात तसल्या मोठमोठ्या माळा दिवसभरातून केव्हा ना केव्हा तरी त्या मूर्तीला कुणी ना कुणी घालून जात असतो.

दिल्लीचा चांदणी चौक काही अंशी ह्या प्लास द कॉन्कार्द सारखा एके काळी होता असे मला वाटते. जागोजाग जयस्तंभ, विजयनिदर्शक कमानी अन् स्त्री, पुरुष, सिंह वगैरेंच्या प्रचंड शिल्पाकृती. शूरवीर पहिल्या नेपोलियनचे स्मारक म्हणून एक प्रचंड धातूनिर्मित जयस्तंभ उभा आहे. त्यावर नेपोलियनच्या वेळच्या युद्धांतील विजय कोरलेले आहेत. वर शेंड्यावर नेपोलियन बोनापार्टचा पुतळा. दुसरीकडे एके ठिकाणी बास्तिल (Bastille) नामक जुन्या किल्ल्याच्या ध्वंसाचे स्मारक आहे. त्या वेळी राजांचे एकाधिपत्य

होते, वाटेल त्याला वाटेल तेव्हा ते कैदेत डांबून टाकीत. चौकशी नाही, काही नाही, राजा एक हुकूम लिहून देई – त्याचं नाव लेटर द क्यासे (Letter de Cachet) म्हणजे, राजमुद्रांकित फर्मान. त्यानंतर मग त्या माणसाने काय केले काय नाही, तो दोषी की निर्दोष वगैरेची विचारपूस होण्याची गरज नसे – मग धर त्याला नि डांब नेऊन त्या बास्तिल किल्ल्यात, असला खाक्या. अन् एकदा डांबला गेल्यानंतर तिथून मग कुणी बहुधा बाहेर पडत नसे. राजाच्या आवडतींपैकी कुणी कुणावर रागावली की बस्, घेतलीच तिने राजाकडून ती मोहोर करवून अन् दिलेच त्या बापड्या व्यक्तीला बास्तिलमधे ढकलून. पुढे ज्या वेळी फ्रान्सभरातले लोक ह्या साऱ्या अत्याचारांनी खवळून उठले आणि, "वैयक्तिक स्वाधीनता", "सगळे समान, लहान-मोठा कुणीही नाही" वगैरे गर्जना निनादू लागल्या, त्या वेळी पॅरीसच्या जनतेने त्या धुंदीत राजा-राणीवर हल्ला केला. त्या वेळी त्यांनी पहिल्याने काही केले असेल तर ते म्हणजे, माणसावरील घोर अत्याचाराचे प्रतीक असे हे बास्तिल पार जमीनदोस्त करून टाकले; आणि त्या जागेवर रात्रभर मग ते नाचले, गायले, खूप आनंद केला.राजा पळून जात होता, त्याला त्यांनी पकडले; आणि त्याचा सासरा, म्हणजे ऑस्ट्रियाचा बादशहा आपल्या जावयाच्या मदतीसाठी फौज पाठवीत आहे हे ऐकून लोकांनी रागाने अंध होऊन राजा-राणी दोघांनाही मारून टाकले. फ्रान्सभरातले लोक 'स्वाधीनते'च्या, 'साम्या'च्या नावाने वेडे झाले, फ्रान्स प्रजातंत्र राष्ट्र झाले. मोठमोठ्या घरंदाज, कुलीन व्यक्तींपैकी जी हाती सापडेल तिची वाट लावण्याचा लोकांनी सपाटा चालविला. बड्याबड्या धेंडांपैकी कित्येकजण आपल्या पदव्याबिदव्या पार फेकून देऊन लोकांत जाऊन मिसळले. एवढेच नव्हे तर फ्रेंच जनता लोकांना उद्देशून ओरडू लागली – "लोकहो उठा, अत्याचारी राजाफाज्यांना मारून टाका; सर्व जनता स्वाधीन होवो. सर्वांना समान अधिकार मिळोत". या साऱ्या प्रकारामुळे युरोपातल्या इतर सर्व राजांना कापरे भरले – न जाणो ह्या वणव्याची झळ स्वत:च्या देशांना लागेल, न जाणो स्वत:ची सिंहासने गडगडतील, या भीतीने. म्हणून

हा वणवा विझविण्याच्या निर्धाराने कमर बांधून त्या साऱ्यांनी फ्रान्सवर चहूकडून आक्रमण केले. इकडे प्रजासत्ताक नेत्यांनी "La patrie a danger" – "जन्मभूमीवर गंडांतर – सर्वजण या, एकत्र व्हा" अशी जनतेला साद घातली. साऱ्या फ्रान्सभर तिचा पडसाद दुमदुमला. तरणे – म्हातारे, बायका पुरुष La Marseillaise गात गात – फ्रान्सचे ओजस्वी राष्ट्रगीत गात गात झुंडीच्या झुंडी बाहेर पडले. फाटक्या कपड्यांनिशी त्या भयंकर थंडीत अनवाणी पायांनी, अर्धपोटी अशी फ्रान्सची जनसेना समग्र युरोपच्या एकवटलेल्या प्रचंड सैन्याला बेधडक तोंड देऊन उभी ठाकली. लहान-मोठे, गरीब-श्रीमंत सगळे बंदूक खांद्यावर टाकून सरसावले – 'परित्राणाय ....विनाशाय च दुश्कृताम्' – दुष्टांचा नायनाट करण्यासाठी आणि आपल्या मायभूमीच्या, आपल्या घरादारांच्या संरक्षणासाठी. सगळ्या युरोपला तो वेग सहन करता आला नाही आणि फ्रेंच सैन्याच्या समोर, त्याच्या बिनीवर उभा होता एक वीर – ज्याच्या तर्जनीच्या धमकीने अलम दुनिया कापू लागे असा एक वीर – नेपोलियन बोनापार्ट!

स्वाधीनता, समता आणि विश्वबंधुत्व बंदुकीच्या नळीने नि तरवारीच्या टोकाने त्याने युरोपच्या अस्थिमज्जेत रिघवून दिले. तिरंगी कॉकार्ड (Cocarde) चा जय झाला. त्यानंतर फ्रान्सचे राज्य दृढप्रतिष्ठित करण्यासाठी राज्याची सूत्रे आपल्या हाती घेऊन नेपोलियन फ्रान्सचा राजा झाला.

हाती घेतलेले कार्य नेपोलियनने यशस्वी रीतीने पार पाडले. पुढे, गादीला वारसदार झाला नाही म्हणून जीवनभरच्या सुखदु:खांची साथीदारीण राणी जोसेफिनचा त्याने त्याग केला आणि ऑस्ट्रियाच्या राजाच्या मुलीशी लग्न केले. परंतु जोसेफिनबरोबरच नेपोलियनचे भाग्यही त्याला सोडून गेले. रशिया जिंकायला जाऊन बर्फात त्याची फौज गारद झाली. संधी साधून युरोपने त्याला जबरदस्तीने सिंहासन सोडावयास लावून एका द्विपात हद्दपार केले आणि जुन्या राजवंशातील एका जणाला तख्तावर बसविले.

घायाळ सिंह त्या बेटातून पळून फिरून फ्रान्समधे येऊन हजर झाला.

उभ्या फ्रान्सने त्याला डोक्यावर घेतले. होता तो राजा पळाला. परंतु नेपोलियनच्या भाग्याने एकदा जी कच खाल्ली ती कायमचीच. एकदा त्याला सोडून गेलेले त्याचे भाग्य फिरून कधीच त्याच्याकडे परतले नाही. साऱ्याच्या साऱ्या युरोपने फिरून त्याच्याविरुद्ध कमर कसली आणि अखेर वॉटर्लूच्या लढाईत त्याचा पराभव केला. नेपोलियनने इंग्रजांच्या एका जहाजावर जाऊन शरणागती स्वीकारली. इंग्रजांनी हद्दपार करून त्याला सेंट हेलेना नामक एका दूरच्या बेटावर कैदी करून ठेवले – मरेपर्यंत. फिरून जुना राजवंश गादीवर आला, पूर्वीच्या राजाचा पुतण्या राजा झाला. फिरून फ्रान्सचे लोक खवळले, राजाबिजाला त्यांनी हाकलून लावले, फ्रान्स देश फिरून प्रजासत्ताक झाला. ह्या सुमारास शूरवीर नेपोलियनचा एक पुतण्या हळूहळू जनतेचा मोठा आवडता झाला. कट करून एक दिवस त्याने आपण बादशहा म्हणून ग्वाही फिरवली. हाच तो तिसरा नेपोलियन. काही काळ त्याचे राज्य खूप बलवान होते. परंतु जर्मनयुद्धात हरून त्याचे सिंहासन गेले. फ्रान्स देश फिरून प्रजातंत्र झाला; तो अजून तसाच आहे.

भारतातील सर्व संप्रदायांचा पाया असलेला विकासवाद – Evolution Theory

जो विकासवाद (Theory of Evolution) भारतातील प्राय: समस्त तत्त्वज्ञानांचा पाया आहे त्याने सांप्रत युरोपच्या भौतिक विज्ञानात प्रवेश केला आहे. भारताखेरीज इतर सर्व देशांतील धर्मांचे असे मत होते की एकमेकांपासून अगदी वेगळ्या अशा अलग अलग भागांचे मिळून आपले हे विश्व बनले आहे. ईश्वर अलग, प्रकृती अलग, माणूस अलग, त्याचप्रमाणे पशू-पक्षी, कीट-पतंग, झाडे-झुडपे, माती-दगड-धातू सारे अलग अलग. ईश्वराने हे सारे असे अलग अलगच निर्माण केले आहे.

ज्ञान म्हणजे काय, तर बहुत्वामधे एकत्व बघणे – ज्या वस्तू वरवर पाहता अलग अलग, एकमेकांपासून वेगळ्या वाटतात त्यांच्यामधे एकत्व बघणे. भिन्नभिन्न वस्तूंमधील ज्या संबंधाद्वारा त्यांच्यातील एकत्व आपल्या

प्रत्ययास येते त्या संबंधाला 'नियम' म्हणतात. त्यांचेच नाव प्राकृतिक किंवा नैसर्गिक नियम – Natural Law.

मी मागेच म्हटलं आहे की आपली (भारतीयांची) विद्या, बुद्धी, विचार सर्वकाही आध्यात्मिक आहे. ... आविष्कार होतो धर्माच्या रूपाने. पाश्चिमात्यांत या साऱ्यांचा आविष्कार होतो बाह्य क्षेत्रात – भौतिक नि सामाजिक रूपांनी. भारतवर्षातील विचारशील व्यक्तींना हळूहळू कळून आले की विश्वातील ह्या सर्व वस्तू अलग अलग आहेत असे वाटणे ही चूक आहे, भ्रांती आहे. त्या आपल्याला तशा भासतात खऱ्या, परंतु त्या समस्त अलग अलग वस्तूंमधे एक संबंध विद्यमान आहे – माती, दगड, झाडे, झुडुपे, जंतू, जनावरे, माणूस, देवता, इतकेच काय पण खुद्द ईश्वर, या साऱ्यांमधे एक ऐक्य आहे. अद्वैतवाद्यांनी हा विषय अगदी शेवटास नेऊन घोषणा केली की हे सर्व त्या एकाचेच केवळ भिन्न भिन्न आविष्कार होत; वस्तूत: हे अंतर्जगत आणि बहिर्जगत, पिंड आणि ब्रह्मांड एकच होय, आणि त्या 'एका'चे नाव 'ब्रह्म'. आणि ह्या साऱ्या वस्तू अलग अलग वाटतात, तो आपला भ्रम होय. त्या भ्रमाला त्यांनी नाव दिले 'माया', 'अविद्या', – म्हणजेच अज्ञान. ही झाली ज्ञानाची पराकाष्ठा, ज्ञानाची सर्वोच्च मर्यादा, अंतिम परिणती.

भारतवर्षाची गोष्ट सोडूनच द्या, पण विदेशातही जर प्रस्तुत तथ्य वर्तमान काळी एखाद्याला आकळता आले नाही तर त्याला कुणी विद्वान म्हणणार नाही. सारांश काय की, तिकडच्या अधिकांश विद्वानांना हे एव्हाना पटलं आहे, अर्थातच त्यांच्या पद्धतीने – भौतिक विज्ञानामधून. हं, आता ते 'एक' कसे काय 'बहु' झाले, हे आपल्यालाही कळलेले नाही, त्यांनाही कळलेले नाही. त्या मुद्याविषयी आपणही सिद्धान्त करून ठेवला आहे की तो मुद्दा बुद्धीच्या अतीत आहे, या समर्याद मानवबुद्धीला ती गोष्ट समजणे शक्य नाही. तरीपण ते 'एक' कोणकोणत्या प्रकारे व्यक्त होत आहे, कोणकोणत्या प्रकारचे व्यक्तित्व आणि जातित्व धारण करीत आहे हे मात्र समजू शकतं आणि ह्याविषयीच्या शोधांचंच नाव विज्ञान वा Science.

पाश्चात्त्यांच्या मते समाजाचा क्रमविकास

साहजिकच, तिकडचे सर्वचजण आजकाल विकासवादी (Evolutionist) झाले आहेत. क्रमविकासाच्या नियमानुसार जसे छोटे जनावर बदलता बदलता मोठ्या जनावरात परिणत होते, किंवा मोठे जनावर कधीकधी लहान होते अथवा लोप पावते, तसेच माणसाचेही झाले असले पाहिजे. त्याचाही क्रमविकास झाला असला पाहिजे. माणूस म्हणजे एकदम फट्दिशी सुसभ्य अवस्थेत जन्माला आला यावर आता तिकडे कुणी विश्वास ठेवीत नाही. आणि ठेवतील तरी कसा? कारण, त्यांचे (पाश्चिमात्यांचे) बापजादे काल की परवापर्यंत रानटी होते आणि ह्या एवढ्याशा अवधीतच त्यांच्यात हा एवढा बदल झाला आहे, हा भरभक्कम पुरावा त्यांच्या डोळ्यांसमोर आहे. म्हणून साहजिकच त्यांचे असे ठाम मत झाले आहे की, सगळीच माणसे हळूहळू क्रमाक्रमाने असभ्य अवस्थेतून वर आली आहेत आणि येत आहेत.

आदिम माणूस दगडी किंवा लाकडी अवजारांनी आपली कामे करी, कातडे किंवा झाडाची पाने पांघरून दिवस काढी आणि पहाडांच्या गुहांत किंवा पक्ष्यांच्या घरट्यांसारखी खोपटी करून त्यांत कसेतरी आयुष्य कंठी. ह्याचे प्रत्यंतर सर्वच देशांमधे उत्खनन करताना आढळते आणि काहीकाही ठिकाणी तर त्या अवस्थेतील माणसेच अजूनही वावरताना आढळून येतात. हळूहळू माणूस धातूचा उपयोग करायला शिकला – जस्त आणि तांब्यासारख्या नरम धातूंचा. त्यांना एकमेकात मिसळून हत्यारे, अवजारे करायला शिकला. प्राचीन ग्रीक लोकांना आणि बाबिलोनियाच्या व इजिप्तच्या रहिवाशांना पुष्कळ दिवस लोखंडाचा उपयोग करणे ठाऊक नव्हते – बरेच सभ्य होऊन पुस्तकेबिस्तके लिहिण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती, सोन्याचांदीचा उपयोग ते करू लागले होते, पण तरीसुद्धा लोखंडाचा उपयोग करणे त्यांना अवगत नव्हते, अमेरिका महाद्वीपाच्या आदिम रहिवाशांपैकी मेक्सिको व पेरूचे निवासी आणि माया प्रभृती जाती त्या मानाने बऱ्याच पुढारल्या होत्या, बऱ्याच सभ्य झाल्या होत्या. हे लोक मोठमोठाली देवळे

उभारीत, सोन्याचांदीचा उपयोगही खूप करीत, इतका की, त्यांच्याजवळच्या ह्या सोन्याचांदीच्या लोभानेच स्पॅनिश लोकांनी त्यांचा ध्वंस केला. परंतु ह्या साऱ्या गोष्टी ते गारगोटीची अवजारे वापरून खूप मेहनत घेऊन करीत असत. लोखंडाचे नावदेखील त्यांनी ऐकलेले नव्हते.

प्रथमावस्थेत माणूस मृगयाजीवी होता

प्रथमावस्थेत माणूस धनुष्यबाणाचा वा जाळ्याचा उपयोग करून पशू, पक्षी वा मासे मारून त्यावर गुजराण करीत असे. हळूहळू तो शेतीभाती शिकला, पशुपालन करायला शिकला. जंगली जनावरांना कह्यात आणून, त्यांच्याकडून आपली कामे करवून घेऊ लागला किंवा आवश्यक तेव्हा खाण्यास उपयोगी पडावीत म्हणून त्यांना पाळू लागला. गाय, घोडा, डुक्कर, हत्ती, उंट, मेंढा, बकरी, कोंबडी वगैरेंसारखे पशुपक्षी माणसाळले जाऊ लागले. पैकी कुत्रा हा माणसाचा अगदी आदी मित्र.

याप्रमाणे हळूहळू शेती करण्याला सुरुवात झाली, जी फळेमुळे, भाजीपाला, गहू तांदूळ वगैरे माणूस खातो, त्यांचे वन्य स्वरूप अगदी निराळेच होते. माणसाच्या प्रयत्नांनी जंगली फळांचा आकार नि रुची बदलली आणि जंगली धान्य भातादिकाच्या सुंदर पिकांत परिणत झाले. निसर्गात आपोआप रात्रंदिवस बदल तर होत असतोच. नाना जातींचे वृक्ष, लता, पशू, पक्षी वगैरेंच्या शरीरसंबंधाने आणि देश, काल, परिस्थिती, हवामान वगैरेंच्या बदलांनी नवीन नवीन जातींची निर्मिती होत असते. परंतु माणसाची उत्पत्ती होण्यापूर्वी निसर्ग धीरेधीरे तरु-लता, जीव-जंतू बदलवीत होता, पण माणसाचा जन्म झाल्यापासून तो (माणूस) अगदी सपाट्याने बदल घडवून आणू लागला. माणूस भराभर एका ठिकाणची झाडेझुडपे, जीवजंतू दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाऊ लागला आणि त्यांचा एकमेकांशी संयोग करून तऱ्हतऱ्हेच्या अभिनव जीवजंतूंच्या, झाडाझुडपांच्या जाती माणसाच्या उपद्व्यापातून अस्तित्वात येऊ लागल्या.

विवाहाचे आद्य स्वरूप

प्राथमिक अवस्थेत विवाह असत नाही. पुढे हळूहळू वैवाहिक नाती निर्माण झाली. सर्वच समाजात वैवाहिक संबंध प्रथम 'आई'वर आधारलेला होता. बापाचा फारसा ठिकाणा नसे. आईवरूनच मुलांची नावे पडत. स्त्रियांच्या हातीच सारे धन राही, कारण मुलांचे संगोपन त्यांनाच करावे लागे. हळूहळू धन-संपत्ती पुरुषांच्या हाती गेली, स्त्रियाही पुरुषांच्या हाती गेल्या. पुरुष म्हणू लागला, "हे धनधान्य माझ्या मालकीचे आहे. मी शेतीभाती करून किंवा लूटमार करून ते कमावले आहे. यांत जर कोणी वाटा सांगू लागेल तर माझ्याशी गाठ आहे. हे जसे, तसेच ह्या स्त्रियाही माझ्या एकट्याच्या आहेत. जर कोणी त्यांना हात लावील तर खबरदार. मी त्याच्याशी दोन हात केल्याखेरीज राहणार नाहीं." इथेच आजकालच्या विवाहाचा प्रारंभ झाला. भांडीकुंडी, नोकरचाकर यांप्रमाणेच स्त्रीही पुरुषाची मालमत्ता बनली. विवाहाची प्राचीन रीत अशी होती की एका गटातला पुरुष दुसऱ्या गटातल्या स्त्रीशी लग्न करी. ते लग्नही जबरदस्तीने होई – मुलगी हिरावून आणून. पुढे हळूहळू हा नवरी हिसकून आणण्याचा प्रकार बंद पडला; आपखुषीने, दोन्ही गटांच्या संमतीने विवाह होऊ लागला. परंतु जुन्या चालीरीतींचा थोडा ना थोडा आभास राहून जातोच. अजूनही प्राय: सर्वच देशांत अशा प्रसंगी वरावर एक खोटाखोटा, लुटुपुटीचा हल्ला करण्यात येत असतो! बंगालमध्ये आणि युरोपमध्ये मुठी भरून तांदूळ वराला मारण्यात येतात, उत्तरहिंदुस्थानात नवऱ्या मुलीच्या नातेवाईक बायका वराकडच्यांना शिवीगाळ करतात, वगैरे वगैरे.

कृषिजीवी देव व मृगयाजीवी असुर यांचा संबंध

समाजाची उत्पत्ती होऊ लागली. स्थलानुसार समाजाचे स्वरूप वेगवेगळे होत गेले. जे समुद्राच्या काठाने राहत ते मुख्यत: मासे पकडूनच उपजीविका करीत. जे सपाट भ्रप्रदेशात वसत ते शेतीभाती करीत. जे पहाडी मुलुखात वावरत ते मेंढ्यांचे मोठमोठे कळप बाळगून मेंढ्या पाळीत. आणि जे

वाळवंटात नांदत ते बकऱ्या, उंट वगैरे राखीत. दुसरे कित्येक जंगलात राहत, शिकारीवर पोट भरीत. ज्यांना सपाट भूभाग लाभला ते शेती करायला शिकले. त्यांच्यामागची पोटाची भुणभुण बरीच कमी झाली. निश्चितपणामुळे विचार करण्याला त्यांना बराच अवसर मिळाला. त्यामुळे ते अधिकाधिक सभ्य आणि सुसंस्कृत होऊ लागले. परंतु सभ्यतेबरोबरच शारीरिक दुबळेपणाही त्यांच्या ठायी अधिकाधिक येऊ लागला. जे रात्रंदिवस खुल्या हवेत राहत, मांस हा ज्यांचा मुख्य आहार, त्यांच्यात आणि जे घरात राहत, धान्यादिकावर जगत, त्यांच्यात बराच फरक पडू लागला. शिकारी किंवा पशुपाल किंवा मत्स्यजीवी लोक अन्नाची ददात भासू लागताच डाकू किंवा चाचे बनून सपाट प्रदेशात राहणाऱ्यांना लुटू लागले. त्यामुळे सपाट प्रदेशात राहणारे लोक स्वत:च्या संरक्षणाच्या हेतूने एक होऊन, अनेकजण मिळून दाट वस्ती करून एकत्र राहू लागले. आणि याप्रमाणे लहान लहान राज्ये निर्माण होऊ लागली.

देव* गहू-तांदूळादी धान्ये खात, त्यांची अवस्था सुसभ्य होती, ते खेड्यात, शहरात किंवा बगिच्यात राहत, विणलेले कपडे वापरीत. अन् असुरांचा* वास असे पहाड, पर्वत, वाळवंट किंवा समुद्राचा किनारा वगैरे जागी; खाणे – जंगली पशूंचे मांस, जंगली फळेमुळे, पांघरायला जनांवरांची कातडी, अन् स्वत:जवळच्या जंगली चिजा किंवा गाई, बकऱ्या, मेंढ्या देवांना देऊन त्यांच्या मोबदल्यात जेवढे मिळेल तेवढेच धान्य. देवांची शरीरं दुबळी, श्रम न सहू शकणारी. असुरांची शरीरं उपासातापासांनी टणक झालेली, वाटेल ते कष्ट सहज झेलू शकतील अशी.

राजा, वैश्य, प्रभृती विभिन्न वर्गांच्या उत्पत्तीचे रहस्य

असुरांना खाण्यापिण्याची अडचण भासताच टोळी करून ते पहाड

* या समस्त विवरणात 'देव' आणि 'असुर' से शब्द गीतेत ज्या अर्थाने उपयोगात आणले गेले आहेत, त्याच अर्थाने वापरलेले आहेत. देव म्हणजे ज्या जातींच्या ठिकाणी दैवी गुणांचे प्राधान्य आहे त्या जाती, आणि असुर म्हणजे आसुरी गुणांचे प्राबल्य असलेल्या जाती असा अर्थ येथे अभिप्रेत आहे. पाहा – गीता, अध्याय १६ वा.

किंवा समुद्रकिनारा सोडून येऊन शहरे-खेडी लुटीत. कधीकधी ते धनधान्याच्या लोभाने देवांवर स्वाऱ्या करीत. देव पुष्कळजण एक न होऊ शकल्यास असुर त्यांचा धुव्वा उडवीत. परंतु देवांची बुद्धी जबर. ती चालवून ते नाना प्रकारची शस्त्रास्त्रे तयार करू लागले – लढाईत शत्रूची दाणादाण उडवून देता यावी म्हणून ब्रह्मास्त्र, गरुडास्त्र, वैष्णवास्त्र, शैवास्त्र – ही सारी देवांची अस्त्रे. असुरांची शस्त्रे अगदी मामुली, परंतु अंगात त्यांच्या खूप बळ. वारंवार असुर देवांना हरवीत, परंतु सभ्य होणं मात्र त्यांना ठाऊक नव्हतं. ते शेतीभाती करू शकत नसत. बुद्धी कशी चालवावी हे त्यांना माहीत नव्हते. विजयी असुर जर विजित देवांच्या 'स्वर्गावर' राज्य करू गेले तर थोड्याच अवधीत देवांच्या बुद्धिकौशल्याने ते देवांचे दास होऊन बसत. एरवी असुर लूट करून आपल्या स्थानी परत फिरत. देव जेव्हाजेव्हा एक होऊन असुरांना इंगा दाखवीत तेव्हातेव्हा असुर पिटाळले जात – एकतर समुद्राकडे किंवा पहाडात, नाही तर जंगलात. हळूहळू दोन्ही पक्षांची संख्या वाढू लागली, हजारो लाखो देव एकत्रित होऊ लागले, लक्षावधी असुर एकत्र राहू लागले. महासंघर्ष, हार-जीत चालू लागली आणि त्याबरोबरच होऊ लागली या दोघांची सरमिसळ. ह्या सर्वप्रकारच्या माणसांच्या सरमिसळीतून निर्माण होत गेले आजचे समाज, आजच्या प्रथा – आजच्याचाली-रीती-रूढी. नाना नवनवीन कल्पना उदयास येऊ लागल्या, नाना विद्या, नाना शास्त्रे अस्तित्वात येऊ लागली. एक वर्ग व्यवहारोपयोगी नि भोगोपयोगी वस्तू तयार करू लागला – शारीरिक किंवा बौद्धिक परिश्रम करून. एका वर्गाने त्या साऱ्या भोग्य वस्तूंच्या संरक्षणाचा भार स्वत:वर घेतला. सर्वजण मोबदला देऊन त्या साऱ्या जिनसा विकत घेऊ लागले. एक मोठा धूर्त, वस्ताद वर्ग उपजला – ह्या ठिकाणच्या जिनसा त्या ठिकाणी घेऊन जाण्याचे काम त्याने पत्करले आणि या कामाचा मोबदला म्हणून त्या वस्तूंपासून होणाऱ्या मुनाफ्याचा अधिकांश भाग त्या वर्गाने अगदी हक्कानेच गिळंकृत करण्याचा खाक्या ठेवला. एकाने शेती केली, दुसऱ्याने पहारा दिला, तिसरा पीक इथून तिथे

नेत गेला, चौथ्याने ते विकत घेतले. ज्यानं शेती केली त्याला मिळाला कद्दू! ज्यानं पहारा दिला त्यानं दंडेली करून घेता येईल तितकं आधीच काढून घेतलं! आणि अधिकांश मलिदा लाटला, ते बाजारात आणणाऱ्या व्यापाऱ्यानं! ज्यानं ते विकत घेतलं तो या साऱ्याची किंमत देता देता साफ बुडाला! पहारा देणाऱ्याचं नाव पडलं राजा, जिनसा एके ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणाऱ्याचं नाव पडलं सौदागर – व्यापारी. या दोन वर्गांनी उत्पन्न केलं नाही काहीच, ते मलिदा मात्र लाटू लागले. ज्यांनी त्या जिनसा उत्पन्न केल्या ते पोट बडवीत परमेश्वराला हाका मारत बसले!

डाकू व वेश्या यांची उत्पत्ती

यात्रमाणे घटनांमागून घटना घडत जाऊन ही परिस्थिती अधिकाधिक गुंतागुंतीची होत गेली, काळाच्या ओघात त्या गुंत्यात वरचेवर भर पडत गेली आणि त्या तसल्या गुंतवळीतून आपला आजचा कमालीच्या गुंतणुकीचा समाज उदयास आला. परंतु म्हणतात ना की सुंभ जळला तरी पीळ राहतोच. त्यातलाच प्रकार. रानटी अवस्थेत जे मेंढ्या चारीत, मासेमारी करून उपजीविका करीत, ते ह्या सभ्य अवस्थेत चाचेगिरी, डाकेखोरी करू लागले. त्यांनी तरी काय करायचं! जंगल राहिलं नाही की ज्यात ते शिकार करतील, जवळपास पर्वतपहाडही नाहीत की जिथे ते मेंढ्या चारतील – अन् जन्म झालाय् सभ्य समाजात – शिकारीला, मेंढ्या चारायला, मासे धरायला, कशाला कशाला म्हणून वाव राहिला नाही. मग त्यांनी बिचाऱ्यांनी डाकेखोरी, चोऱ्या करायच्या नाहीत तर दुसरं काय करायचं? स्वभाव जाईल कुठे? तोच त्यांना तसं करायला लावतो! आणि त्या प्रातःस्मरणीय अहिल्या, तारा वगैरेंच्या वेळच्या अंगना, त्या या सभ्य समाजात जन्मून, इच्छा असूनही एकाच वेळी अनेक पती करू शकेनात – त्या बनल्या वारांगना! या आणि असल्या रीतींनी निरनिराळ्या तऱ्हेच्या, निरनिराळ्या स्वभावाच्या, सभ्यअसभ्य दैवी स्वभावाच्या आणि आसुरी स्वभावाच्या नाना प्रकारच्या नाना लोकांची सरमिसळ होऊन तयार झाला आहे – आजचा आपला समाज.

साहजिकच सर्वच समाजांत ह्या नाना रूपांनी भगवान खेळताना दिसतात – साधुनारायण, डाकूनारायण इत्यादी इत्यादी. आणि ज्या समाजात ज्या प्रमाणात देवांची किंवा असुरांची संख्या अधिक, त्या प्रमाणात तो तो समाज दैवी किंवा आसुरी होऊ लागला.

प्राच्य आणि पाश्चात्त्य सभ्यतेचे भिन्न पाये

जंबुद्वीपाची (आशियाची) तमाम सभ्यता सपाट भूप्रदेशात, मोठमोठ्या नद्यांच्या काठी, अत्यंत सुपीक भागात निपजली आहेत – याङ्त्सिक्याङ, गंगा,सिंधू, युफ्रेटीस नद्यांच्या तीरी. ह्या सर्वच सभ्यतांचा मूळ पाया आहे शेती. ह्या सर्व सभ्यता दैवीभावप्रधान आहेत. युरोपातील प्राय: सर्वच सभ्यता एकतर पहाडी मुलखात, नाहीतर समुद्राकाठी जन्मल्या आहेत. डाकूगिरी, चाचेगिरी हा त्या सभ्यतांचा पाया. त्यांच्यात असुर भाव जास्त.

उपलब्ध माहितीवरून असे दिसते की अर्वाचीन काळात जंबुद्वीपाचा मध्यभाग (अर्थात मध्यआशिया) आणि अरबस्थानचे वाळवंट ही असुरांची मुख्य ठिकाणं असावीत. या ठिकाणांहून एकत्र होऊन ह्या पशुपाळ, मृगयाजीवी असुरांनी सभ्य देवांचा पाठलाग करीत त्यांना साऱ्या जगभर विखरून दिले.

अर्थातच युरोपखंडातही एक आदिवासी जमात नांदत होतीच. ते पर्वतांच्या गुहांतून राहत. त्यांच्यातील जे अमळ बुद्धिवान होते ते त्यांतल्या त्यात उथळ पाण्याच्या जागी तुळवटे रोवून त्यावर माळा बांधीत व त्या माळ्यावर घर वगैरे बांधून राहत; गारगोटीच्या दगडाचे तीर, भाल्याचे फाळ, सुऱ्या, परशू वगैरे बनवीत नि त्यांनी आपले सारे काम चालवीत.

हळूहळू जंबुद्वीपातील (आशियातील) जमातींचा स्रोत युरोपावर जाऊन आदळू लागला. परिणामी कुठेकुठे त्या मानाने सभ्य जातींचा उदय झाला. रशियामधील कुण्या एका जातीच्या भाषेचे दक्षिण भारताच्या भाषांशी सादृश्य आढळते.

ग्रीक

परंतु ह्या सर्व जाती बहुतांश रानटीच राहिल्या. आशियामायनरमधे एका सुसभ्य जातीचा उदय झाला. तिने युरोपचा लगतचा भाग जिंकून, स्वतःच्या बुद्धीच्या आणि प्राचीन इजिप्तच्या साहाय्याने एक अपूर्व सभ्यता निर्माण केली. या लोकांना आपण म्हणतो यवन, युरोपियन त्यांना म्हणतात ग्रीक.

युरोपियन जातीची उत्पत्ती

पुढे इटलीत रोमन नावाच्या एका जातीचा उदय झाला – ही रानटी जात इट्रस्कन (Etruscans) नामक एका सभ्य जातीचा पराभव करून, त्यांची संस्कृती आणि ज्ञान आत्मसात करून स्वतः सभ्य बनली. हळूहळू रोमनांनी चहूकडे आपले वर्चस्व बसविले. युरोपखंडाच्या दक्षिणपश्चिम भागातील समस्त असभ्य लोक रोमनांच्या आधिपत्याखाली आले. केवळ उत्तरेकडील जंगलातील रानटी जातीच काय त्या स्वतंत्र राहिल्या. काळाच्या ओघात रोमन लोक ऐश्वर्याचे नि विलासितेचे गुलाम बनून निर्वीर्य होऊ लागले. त्याच वेळी फिरून जंबुद्वीपातील असुरांच्या सेनेचे लोंढे जाऊन युरोपवर धडकू लागले. ह्या असुरांच्या हल्ल्यांनी स्वस्थानच्युत झालेले उत्तर युरोपातील रानटी लोक रोमन साम्राज्यावर जाऊन कोसळले! रोमचा उच्छेद झाला. या जंबुद्वीपस्थांच्या तडाख्यांना तोंड देण्याच्या प्रयत्नात युरोपातील रानटी जाती आणि उरलेसुरले रोमन नि ग्रीक यांच्या मीलनातून एक नवी जात निर्माण झाली. ह्या समयी यहुदी जात रोमनांद्वारा जिंकली जाऊन स्वतःच्या मायभूमीतून हुसकून लावली गेली. स्वदेशातून याप्रमाणे परांगदा झालेले यहुदी लोक देशोधडीस लागून साऱ्या युरोपभर विखुरले. बरोबरच त्यांचा नवा ख्रिस्ती धर्महो युरोपात सर्वत्र पसरत गेला. ह्या साऱ्या विभिन्न जाती, त्यांची भिन्नभिन्न मते नि पंथ, असुरांचे हे नाना समुदाय ही, अहर्निश चालूच असणाऱ्या लढाया, युद्धे नि मारामाऱ्या यांच्या धगीने महामायेच्या कढईत, वितळून एकरूप होऊ लागली. या द्रावणातूनच आजच्या ह्या युरोपियन जातींची उत्पत्ती झाली.

याप्रमाणे हिंदूंच्या काळ्या रंगापासून तो उत्तरेकडील दुधासारख्या शुभ्र

रंगापर्यंत सर्व तऱ्हेच्या छटा असलेली; काळ्या, भुऱ्या, लालवट किंवा सफेद केसांची; काळ्या, घाऱ्या वा निळ्या डोळ्यांची; हिंदूंसारख्या नाक-डोळे-चेहरेपट्टीची किंवा चिन्यांसारख्या थापट चेहऱ्याची – या असल्या नाना आकाराप्रकाराची एक रानटी, अति रानटी युरोपियन जात निर्माण झाली. काही काळ त्यांनी आपसातच मारामारी, काटाकाटी केली; उत्तरेकडचे चाचे संधी सापडताच त्या मानाने सभ्य जमातींचा फडशा पाडू लागले. मध्यंतरी ख्रिस्तीधर्माचे दोन गुरू – इटलीचा पोप (फ्रेंच, इटालियन भाषांत याला म्हणतात 'पाप'!) आणि कॉन्स्टँटिनोपलचा पॅट्रिआर्क – हे दोघे ह्या पशुप्राय रानटी जमातींवर, त्यांच्या राजे-राण्यांवर, त्यांच्या सर्व प्रजेवर सत्ता गाजवू लागले.

मुसलमान धर्म

इकडे अरबस्थानच्या वाळवंटात मुसलमान धर्म उदयास आला. जंगली अरब एका महापुरुषाच्या वाणीतून स्फूर्ती घेऊन अदम्य वीर्याने आणि अप्रतिद्वंदी शक्तीने जगावर आघात करू लागले. समोर येईल त्याचा फन्ना उडवीत हा लोंढा पूर्व आणि पश्चिम दोन्ही बाजूंनी युरोपात घुसला. त्या स्रोताबरोबर भारताची आणि प्राचीन ग्रीसची विद्या व संस्कृती युरोपात शिरू लागली.

मुसलमानांचा भारतप्रभृतींवर विजय

जंबुद्वीपाच्या मध्यभागातील (मध्यआशियातील) सेलमुल तार्तर नामक असुर जातीने मुसलमान धर्म स्वीकारून आशियामायनर प्रभृती भाग कब्ज्यात घेतला. अरबांनी भारतवर्ष जिंकण्याचा अनेकदा यत्न केला, पण त्यांना यश आले नाही. मुसलमानांनी अलम दुनिया पादाक्रान्त केली, पण भारतवर्षापुढे त्यांना हार मानावी लागली. त्यांनी एकदा सिंधवर हल्ला केला, पण तो प्रांत कब्ज्यात ठेवणे मात्र त्यांना जमले नाही; त्यानंतर त्यांनी भारताचा पिच्छाच सोडला.

ह्याच्या कित्येक शतकांनंतर पुढे ज्या वेळी तुर्क प्रभृती तार्तर जाती

बौद्ध धर्म सोडून मुसलमान झाल्या, तेव्हा त्यांनी हिंदू, अरब, पारशी साऱ्यानांच जिंकून टाकले. भारतवर्ष जिंकणाऱ्या समस्त मुसलमानांपैकी कुणीही अरबी किंवा पारशी नव्हता, सर्वच तुर्क, तार्तर होते. भारतावर स्वाऱ्या करणाऱ्या समस्त मुसलमानांना राजपुतान्यात 'तुर्क' म्हणत – आणि तेच खरे आहे, तेच ऐतिहासिक सत्य आहे. राजपुतान्यातल्या भाटांनी जे गायले आहे – 'तुरुगनको बढिजोर' – 'तुर्क फार जबरदस्त' – तेच ठीक. कुतुबुद्दिनापासून तो मोगल बादशाहांपर्यंत सारेच तार्तर होते – ज्या जातीचे तिबेटी, त्याच जातीचे. फक्त ते मुसलमान बनले आणि हिंदूंशी व पारशांशी लग्नसंबंध जोडून त्यांनी आपले थापट, गोल चेहरे बदललेत, इतकेच. हा तोच प्राचीन असुर वंश. आजही ते काबूल, पर्शिया, अरबस्थान, कॉन्स्टँटिनोपलच्या सिंहासनांवर बसून राज्य करीत आहेत – तेच असुर तार्तर. आणि अजूनही गांधारचे (कंदहारचे) पर्शियाचे रहिवासी त्या तुर्कांची गुलामी करीत आहेत. चीनचे विराट साम्राज्यही त्याच मांचूरीयन तार्तरांच्या पायांशी लोळण घेत आहे – मात्र, ह्या मांचूरियनांनी आपला धर्म सोडला नाही, ते मुसलमान झाले नाहीत; ते लामाचे चेले आहेत. ही असुर जात कधीच विद्या, संस्कृती वगैरेंच्या वाटेस जात नाही. त्यांना एक गोष्ट समजते – लढाई. ते रक्त मिसळल्याखेरीज अंगी तितकीशी लढाऊ वृत्ती बाणणे शक्य नाही. उत्तरयुरोपच्या आणि विशेषत: रशियाच्या प्रबळ लढाऊ वृत्तीला कारण हे तार्तर रक्तच. रशियाच्या रक्तातले तीनचतुर्थांश रक्त तार्तर आहे. देवासुरांची लढाई बराच काळ अजूनही चालेल. देव हे असुरकन्यांशी विवाह करतात, असुर देवकन्या हिरावून नेतात – अशा तऱ्हेने प्रबळ खिचड जाती (संमिश्र जाती) निर्माण होतात.

ख्रिश्चन आणि मुसलमान यांचा संघर्ष

तार्तरांनी अरबी खलिफाचे सिंहासन हिसकून घेतले, ख्रिश्चनांची जेरुसलेम प्रभृती तीर्थस्थाने कब्ज्यात घेऊन ख्रिस्त्यांची तीर्थयात्रा बंद करून टाकली, अनेक ख्रिश्चन मारून टाकले. ख्रिस्ती धर्माचे गुरू खवळले. युरोपभर

त्यांचे रानटी चेले होते. त्यांनी राजे, प्रजा वगैरे साऱ्यांनाच चिथवून दिले. पाखंड्यांच्या तावडीतून जेरुसलेम सोडविण्यासाठी रानटी युरोपियनांच्या झुंडीच्या झुंडी आशियामायनरकडे निघाल्या. त्यांपैकी काही आपसातच लढून मेले, काही रोगांनी आटोपले आणि बाकीच्यांची मुसलमानांनी वाट लावली. पण चवताळलेले रानटी लोक ते – मुसलमान त्यांच्यातील जितके लोक मारीत तितके फिरून नवे येत. रानटी लोकांची जिद्द ती! इरेस पेटले नुसते. वेळ पडल्यास आपल्याच लोकांना लुटत, दुसरे काही खाण्यासारखे न सापडल्यास हाती लागतील त्या मुसलमानांनाच छाटून गट्ट करीत! इंग्रज राजा रिचर्ड याला मुसलमानांचे मांस खूप आवडत असे हे प्रसिद्धच आहे.

ख्रिश्चन-मुसलमानांच्या संघर्षाचे फल – युरोपात सभ्यतेचा प्रवेश

रानटी जाती आणि सभ्य लोक यांच्या लढाईत जे होत असतं तेच ह्या प्रसंगीही झालं – जेरुसलेम वगैरे ठिकाणे जिंकता आली नाहीत, परंतु युरोप सभ्य होऊ लागला. कातडी पांघरणारे नि कच्चे मांस खाणारे ते रानटी इंग्रज, फ्रेंच, जर्मन वगैरे लोक आशियाची सभ्यता शिकू लागले! इटली प्रभृती ठिकाणचे, आपल्याकडील नागांसारखे काही सैनिक तत्त्वज्ञान शिकू लागले. ख्रिस्ती नागांचा एक पंथ (Knights Templars) कट्टा अद्वैतवादी बनला. शेवटी तर ख्रिस्ती धर्माची टिंगल-टवाळी करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. त्यांनी धनही बरेच जमविले होते. मग पोपच्या हुकुमाने आणि धर्माचे रक्षण करण्याच्या नावाखाली युरोपीय राजांनी त्यांचा नि:पात करून त्यांचे धन लुबाडून घेतले.

इकडे मूर नामक एका मुसलमान जमातीने स्पेनमध्ये एक अत्यंत सभ्य राज्य उभारले, नाना विद्यांचे संवर्धन केले, युरोपातील पहिले विश्वविद्यालय स्थापले. तिथे इटली, फ्रान्स, फार काय पण इंग्लंडसारख्या दूरदूरच्या देशांहून विद्यार्थी विद्या शिकण्यासाठी येऊ लागले. राजेरजवाड्यांची मुले युद्धविद्या, रीतीभाती, सभ्यता वगैरे शिकायला येऊ लागली. घरेदारे, मंदिरे सारी नव्या धर्तीची बांधली जाऊ लागली.

युरोपला एका प्रचंड लष्करी तळाचे स्वरूप आले

परंतु उभा युरोप होऊन बसला एक प्रचंड लष्करी तळ – आणि तीच स्थिती आजही आहे. मुसलमानांची पद्धत अशी होती की, एखादा मुलुख जिंकल्यास राजा स्वत:कडे त्याचा एक मोठासा तुकडा ठेवून बाकीचा सेनापतींना वाटून देई. ते नियमित खंडणी देत नसत, परंतु राजाला गरज पडताच अमुक इतके सैन्य त्याच्या तैनातीत त्यांना हजर करावे लागे. यामुळे नेहमी खडी फौज बाळगण्याची भानगड उरत नसे आणि जरूर तेव्हा हजर होऊ शकणारी जबरदस्त फौज सदा जय्यत तयार राही. आजही राजपुतान्यात थोड्याशा प्रमाणात हा प्रघात आहे. मुसलमानांनी तो इकडे आणला. युरोपियनांनीही मुसलमानांची ही पद्धत उचलली. परंतु मुसलमानांची पद्धत म्हणजे राजा, त्याचे मांडलिक काही राजे, त्यांची सेना आणि बाकीची प्रजा – सगळे एक. ही प्रजा युद्धकाळात सुरक्षित असे, तिच्यावर अत्याचार होत नसत. युरोपातली स्थिती वेगळी. युरोपात एका बाजूला राजा नि त्याचे मांडलिक आणि दुसऱ्या बाजूला प्रजा – साऱ्या प्रजेला त्यांनी गुलाम करून ठेवले होते. प्रत्येक प्रजाजनाला कुण्यातरी मांडलिकांचा आश्रित म्हणून राहावे लागे – तरच त्याला जगणे शक्य असे. केव्हाही हुकूम होताच प्रत्येकाला लढण्यासाठी तयार व्हावे लागे.

युरोपियन सभ्यतारूपी वस्त्राची सामग्री

'युरोपियन सभ्यता'रूपी वस्त्राची सामग्री ही अशी आहे – त्याचा माग होय समुद्र किनाऱ्यालगतचा एक समशीतोष्ण पहाडी प्रदेश. त्याचा कापूस आहे – नाना जातींच्या मिश्रणाने उत्पन्न झालेली, सदा युद्धप्रिय, बलिष्ठ अशी एक संमिश्र जात. त्याचा उभा धागा आहे – युद्ध, आत्मसंरक्षणासाठी युद्ध, स्वत:च्या धर्माच्या रक्षणासाठी युद्ध. जो तलवार चालवू शकतो तो तिकडे मोठा बनतो. ज्याला तलवार पेलत नाही तो आपले स्वातंत्र्य विसर्जून कुणातरी तलवारबहाद्दराच्या आसऱ्याने राहून जिणे कंठतो. त्या वस्त्राचा आडवा धागा आहे – वाणिज्य, व्यापार. ह्या सभ्यतेचे साधन आहे तलवार,

साध्य आहे इहलौकिक नि पारलौकिक भोग; तिचा आधार आहे शौर्य – वीर्य – वीरत्व.

आमची सभ्यता शांतिप्रिय

आणि आमचं कसं आहे?

आर्य शांतिप्रिय. शेतीभाती करून धान्य पिकवता आलं, शांतीत राहून कुटुंबाचं पालनपोषण करता आलं की समाधान. असल्या जीवनात सवड पुष्कळ; साहजिकच विचारशील, चिंतनशील, सभ्य होण्याची संधी अधिक. आमचा जनक राजा स्वत: शेत नांगरी आणि त्या काळचा सर्वश्रेष्ठ आत्मवेत्ताही तोच. ऋषी, मुनी, योगी यांचा उदय आमच्यात सुरुवातीपासूनच. त्यांनी प्रथमपासूनच जाणले की संसार फसवा आहे; कितीही लढाया जिंका अन् कितीही लूटमार करा – ज्याच्यासाठी ह्या लढाया अन् ही लुटालूट, तो तुम्हाला हवा असलेला खरा भोग, खरा आनंद आहे केवळ शांतीत आणि शांती आहे शारीरिक भोगांच्या विसर्जनात. खरा भोग, खराखरा आनंद आहे मनाच्या उन्नतीत, बुद्धीच्या विकासात, शरीराचे चोचले पुरविण्यात नव्हे. जंगले लागवडीखाली आणण्याचे काम त्यांनीच केले.

त्यानंतर त्या साफ भूमीवर निर्मित झाली यज्ञवेदी, त्या निर्मल भारतीय आकाशात उठला यज्ञाचा पवित्र धूम, त्या शांतिमय वातावरणात निनादू लागले पावन वेदमंत्र. गायी वगैरे पशू निर्भय, नि:शंक चरू लागले. तरवारीला स्थान मिळाले विद्येच्या नि धर्माच्या पायाशी! तिचे, त्या तरवारीचे एकमेव काम म्हणजे धर्माचे रक्षण करणे, माणसे नि गायी वगैरे पशूंचे संरक्षण करणे. आमच्या वीरांचं नाव – आपत्त्राता – दुर्बलांचं संरक्षण करणारा – 'क्षत्रिय'. त्यांच्या वीर्याचा विनियोग – दुबळ्यांचं रक्षण करण्याकडे.

नांगर, तलवार वगैरे साऱ्यांचा अधिपती व रक्षक झाला – धर्म. धर्म राजांचाही राजा, जगत् निद्रिस्त झाले तरी तो जागृत – सदा जागा. धर्माच्या आश्रयानं सगळेच राहिले स्वाधीन, स्वतंत्र.

'आर्यांनी भारतातील आधीच्या रहिवाशांचा नाश केला' हे युरोपियनांचे एक केवळ निराधार अनुमान आहे

हे जे युरोपी पंडित बरळताहेत की, आर्य लोक बाहेरून कुठूनतरी उपटसुंभासारखे आले नि त्यांनी भारतातील आधीच्या रानटी रहिवाशांना काटून छाटून त्यांचा देश हिसकून घेऊन इथे वसाहत केली – ही सारी महामूर्खांची बडबड. आमच्याकडले पंडितही बघतो, ह्याच सुरात सूर मिळवीत आहेत. अन् हे सारं धादान्त खोटंनाटं आमच्या मुलाबाळांना शिकविण्यात येतं. हे काय आहे? किती अन्याय्य गोष्ट ही. किती अनुचित.

मी आपला मूर्ख माणूस, जे काही कळलं-समजलं-जाणलं त्यांच्या आधारानं, पॅरीसला भरलेल्या धर्मेतिहाससभेत मी ह्या साऱ्यांची कडकडून हजेरी घेतली, सडकून खंडन केलं. ह्या बाबतीत स्वदेशी विदेशी दोन्ही पंडितांशी मी विचारविनिमय करीत आहे, त्यांना प्रश्न विचारीत आहे, वेळ सापडल्यास आणखीही कितीतरी प्रश्न नि:संशय उभे करू शकेन अशी उमेद आहे. आणि हे मी तुम्हांलाही सांगतो आहे – पंडित लोक तुम्ही – आपली पोथ्यापुस्तकं अमळ उलटीसुलटी करून मगच काय ते मत बनवा. पाहूनसवरून स्वत:चे मत बनवा, दत्तक घेऊ नका याचे त्याचे – कुणाही ढुढ्ढाचार्यांचे.

युरोपियन लोक जिथे जिथे गेले, तिथे तिथे संधी सापडल्यास तिथल्या आदिवासींचा नाश करून तिथे मजेत राहिले आहेत. म्हणून त्यांच्या मते आर्यांनीही तसेच केले असले पाहिजे!!! पश्चिमेकडचे लोक घरी राहून केवळ घरच्या आमदानीवर जगतो म्हणतील तर उनाड, उडाणटप्पू ठरतील; म्हणून ह्याला लूट, त्याला छाट असे करून स्वत:ची तुमडी भरण्यासाठी ते चहूकडे पांगले. साहजिकच त्यांना वाटते की आर्यांनीही असेच केले असावे!! आपल्यावरून जग ओळखायचं! पण मी विचारतो की या तुमच्या म्हणण्याला-वाटण्याला काही प्रमाण? काही पुरावा? नुसता अंदाजच ना? चुलीत नेऊन लावा हे असले अंदाज!

कोणत्या वेदामधे, कोणत्या सूक्तात, कुठं तुम्हाला आढळलंय् की आर्य लोक कुण्या बाहेरच्या देशातून भारतात आले आहेत? कुठून, कशाच्या आधारावर शोधून काढली तुम्ही ही कल्पना की त्यांनी आदिवासी वन्य लोक छाटून टाकले? उगाच मूर्खासारखे आपले काहीतरी बरळायचे? म्हणे आम्ही रामायणाचा अभ्यास केला आहे. रामायणाचा अभ्यास करून काय बाहेर काढले? तर, एक बनावट खोटीनाटी गोष्ट – थाप नुसती.

रामायण ही आर्यांच्या अनार्यांवरील विजयाची कथा नव्हे

काय तर म्हणे रामायण म्हणजे दक्षिणी रानटी लोकांवरील आर्यांच्या विजयाची कहाणी!! वा रे निष्कर्ष! छान! रामचंद्र आर्य राजा – सुसभ्य. अन् लढला कुणाशी? तर लंकेचा राजा रावण, त्याच्याशी. राम म्हणे सभ्य, अन् रावण म्हणे आदिवासी, वन्य, रानटी! असं करा, एकदा रामायण वाचून काढाच! दिसेल – त्या रावणाची नि त्याच्या देशाची सभ्यता रामापेक्षा नि रामाच्या देशापेक्षा विशेष कमी प्रतीची नव्हती. लंकेची सभ्यता अयोध्येच्या सभ्यतेपेक्षा वरचढच होती, कमी प्रतीची तर नव्हतीच नव्हती. अन् वानर आदी दक्षिणी लोकांना रामाने 'जिंकले' कधी, केव्हा, कुठे? ते तर सारे रामचंद्रांचे मित्र, साहाय्यक होते. कोणत्या गुहकाचं, कोणत्या वालीचं राज्य हिरावून घेऊन रामचंद्रांनी स्वतःच्या राज्याला जोडलं – सांगा ना?

हं, हे शक्य आहे की कुठेकुठे आर्य आणि आदिवासी यांचं झमकलं. शक्य आहे की, एखाददुसरा कावेबाज मुनी राक्षसांच्या मालकीच्या जंगलात धुनी लावून बसला असेल – पालखट मारून डोळे मिटून ध्यान करीत – राक्षस कधी दगडधोंडे, हाडंबिडं फेकतात ह्याची वाटच बघत! बस्, आला हाडाचा तुकडा की उठले मुनी नि निघाले अं अं करीत राजाकडे. राजे मग लोखंडी चिलखत चढवून, लोखंडी शस्त्रास्त्रे परजत उमद्या घोड्यावर बसून येत. रानटी आदिवासी हाडांदगडांनी नि काठ्यासोट्यांनी त्यांच्यासमोर कितपत टिकाव धरूं शकणार? राजे त्यांना मारून पिटाळून आपल्या राजधानीस निघून जात. हं, असले प्रकार घडले असतील. परंतु ह्यांतही वन्य

आदिवासींची जंगले त्यांनी हिरावून घेतली हे तुम्हाला कुठे गवसलं? हा शोध तुम्ही कसल्या आधारावर लावला?

आर्य सभ्यतारूपी वस्त्राचा माग आहे – विशाल नदनदींनी समृद्ध आणि उष्ण असा विस्तीर्ण, समतल भूमिभाग. या वस्त्राचा कापूस आहे – अत्यंत सभ्य, अर्ध सभ्य नि असभ्य अशा नाना आर्यप्रधान जाती. त्याचा उभा धागा आहे – वर्णाश्रमाचार. त्याचा आडवा धागा आहे – नैसर्गिक द्वंद्वांवर नि संघर्षांवर विजय.

उपसंहार

तुम्हा युरोपियनांनी कोणता देश कधी बरं वर आणला आहे? आपल्या मानाने अवनत जातींना वर उचलण्याची तुमच्यात शक्ती आहे कुठे? जिथे जिथे तुमचा एखाद्या दुर्बळ जातीशी संबंध आला तिथे तिथे तुम्ही त्यांचा समूळ उच्छेदच केला आहे; त्यांच्या जागी तुम्ही नांदू लागला, त्या कायमच्या लोपल्या आहेत, तुम्ही नामशेष करून टाकल्या आहेत. काय सांगतो तुमच्या अमेरिकेचा इतिहास? – तुमच्या ऑस्ट्रेलियाचा, न्यूझीलंडचा, पॅसिफिक द्वीपसमुदायांचा – तुमच्या दक्षिण आफ्रिकेचा इतिहास? कुठे आहेत तिथल्या आदिवासी वन्य जाती आज? कुठे गेल्यात त्या? संपूर्ण नि:पात! नावदेखील राहिले नाही त्यांचे – जंगली जनावरांचा फडशा पाडावा तसा तुम्ही नायनाट केला आहे त्यांचा – त्यांना काटून छाटून मारून टाकलेत तुम्ही. जिथे तुम्हाला तसे करणे जमले नाही, जिथे तसे करणे तुमच्या आवाक्याबाहेरचे झाले, तिथे आणि फक्त तिथेच इतर जाती अजून जगून आहेत.

भारताने असले कधी – कधीही केले नाही. आर्य अतिशय दयाळू होते. अपार समुद्रासारख्या त्यांच्या विशाल हृदयात, त्यांच्या अमानवी प्रतिभासंपन्न डोक्यात ह्या असल्या वरवर गोंडस भासणाऱ्या परंतु वस्तुत: पाशवी पद्धती कधीच शिरू शकल्या नाहीत. दीडशहाण्या स्वदेशी पंडितांनो, आर्यांनी जर आदिवासी वन्य जातींना मारून-छाटून वसाहती केल्या असत्या तर हे वर्णाश्रम अस्तित्वात आले असते का?

युरोपचे उद्दिष्ट आहे – सगळ्यांचा नाश करून आम्ही जिवंत राहू. आर्यांचे उद्दिष्ट आहे – सगळ्यांना आपल्या बरोबरीचे करू, आपल्यापेक्षा मोठे करू. युरोपच्या सभ्यतेचा उपाय आहे – तलवार. आर्यांचा उपाय आहे – वर्णविभाग. हा वर्णविभाग शिक्षणाच्या नि संस्कृतीच्या, म्हणजेच अधिकारांच्या तारतम्यानुसार सर्वांना अधिकाधिक उन्नत बनविण्याचा सोपान (जिना) होय. युरोपात बलवानाचा जय, दुर्बलाचा मृत्यू. भारतवर्षाचा प्रत्येक सामाजिक नियम दुर्बलाचे संरक्षण करण्यासाठी आहे.

□□□

परिशिष्ट*

मानवजातीच्या उन्नतीस हातभार लावण्याच्या बाबतीत ख्रिस्ती आणि मुसलमानी धर्मांची परस्पर तुलना

युरोपियन लोक जिची इतकी बढाई करतात त्या 'सभ्यतेच्या उन्नती'चा (Progress of Civilization चा) अर्थ काय आहे? तिचा अर्थ आहे - अनुचित साधनांना उचित ठरवून आपला मतलब साधणे - कसेही आणि काहीही करून आपला उद्देश सिद्धीस नेणे. यालाच म्हणतात - "to make the end justify the means" - कार्यभाग साधला म्हणजे झाले, मग तो कसल्याही का उपायांनी साधेना, त्या उपायांना भलेच मानणे. कुणी नुसती चोरी, लबाडी केली किंवा बरोबरच्या भुकेल्या मुसलमान पहारेकऱ्यांनी घासभर अन्न चोरलं म्हणून स्टॅन्लेचे त्यांना चाबकाने फोडून काढणे आणि फाशी देणे ह्या साऱ्याला ही 'सभ्यतेची उन्नती' उचित ठरवून त्यांचे समर्थन करते. जिथे म्हणून युरोपियन गेले आहेत तिथल्या तिथल्या मूळ रहिवाशांचा पार फन्ना उडाला आहे. याला कारण 'दूर व्हा, मी इथे येऊ इच्छितो' ही सुप्रसिद्ध युरोपियन नीती. ह्या 'सभ्यतेच्या उन्नती'नुसार ही नीती उचित ठरते, समर्थनीय ठरते! ह्या 'सभ्यतेच्या उन्नती'नुसार लंडनमध्ये व्यभिचार आणि पॅरीसमध्ये बायकापोरांना असहाय अवस्थेत टाकून पळणे आणि आत्महत्त्या करणे 'अमळ चूक' ठरते, गुन्हा नव्हे.

आता इस्लामच्या पहिल्या तीन शतकांतील त्या (इस्लामी) सभ्यतेच्या द्रुत विस्ताराशी ख्रिस्तीधर्माच्या पहिल्या तीन शतकांची तुलना करून बघा.

---

* पूज्यपाद स्वामी विवेकानंदांच्या निर्याणानंतर 'पूर्व आणि पश्चिम'चा हा अंश त्यांच्या कागदपत्रांत सापडला होता.

आपल्या पहिल्या तीन शतकांत ख्रिस्तीधर्म जगाला पुरता माहीत देखील होऊ शकला नव्हता; आणि कॉन्स्टंटाईनने तलवारीच्या जोरावर आपल्या राज्यात त्याला प्रवेश दिला तेव्हापासून ख्रिस्ती धर्माने आध्यात्मिक वा भौतिक सभ्यतेच्या प्रसाराला कधी आणि कोणते बरे साहाय्य केले आहे? पृथ्वी स्थिर नसून ती फिरते आहे हे पहिल्यांदा सिद्ध करणाऱ्या युरोपीय विद्वानाला ख्रिस्तीधर्माने काय बक्षीस दिले आहे? ख्रिस्तीधर्माने कोणत्या शास्त्रज्ञाचे कधी बरे स्वागत केले आहे, स्वीकार केला आहे? ख्रिस्ती संघाचे लिखाण दिवाणी वा फौजदारी कायद्यांच्या, शिल्पकलेच्या किंवा व्यापारउदीमाच्या गरजा पुरवू शकते? 'Profane' (धर्माव्यतिरिक्त इतर विषयावरील) लिखाणाच्या प्रचाराला 'चर्च' अजूनदेखील अनुमती देत नाही. आज ज्याचा (आधुनिक) विद्येत आणि विज्ञानात प्रवेश झाला आहे त्याला खरोखर प्रामाणिक ख्रिस्ती असणे शक्य आहे? ख्रिश्चनांचा धर्मग्रंथ जे New Testament, त्यामध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही विज्ञानाची किंवा कलेची प्रशंसा नाही. परंतु असे एकही विज्ञान वा अशी एकही कला नाही की प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कुराणात अथवा हशिदमधे (महमदांच्या वचन-संग्रहामधे) जिला ठिकठिकाणी अनुमोदन नि प्रोत्साहन देण्यात आलेले नाही. व्हॉल्टेअर, डार्विन, बुकनेर, फ्लॅमॉरियन, व्हिक्टर ह्यूगो आणि युरोपातील अशाच साऱ्या श्रेष्ठ विचारवंत व्यक्तींना वर्तमानकाळीही ख्रिस्तीधर्माकडून धिक्कार आणि सनातनी ख्रिस्त्यांकडून शिव्याशाप लाभत आहेत. उलट या साऱ्या लोकांविषयी इस्लामचे असे मत आहे की, हे सगळे आस्तिक आहेत, फक्त यांचा पैगंबरावर विश्वास नाही, इतकेच. या दोन धर्मांपैकी कोण उन्नतीला साहाय्यक ठरला आहे आणि कोण उन्नतीला बाधक ठरला आहे याचा नीट तलास लावल्यास आढळून येईल की, इस्लाम जिथे गेला तिथल्या मूळ रहिवाशांचे त्याने रक्षण केले आहे – तिथे त्या जाती अजूनही अस्तित्वात आहेत, त्यांची भाषा, त्यांचे जातीयत्व अजूनही टिकून आहे.

घडले आहे का ख्रिस्तीधर्माकडून असे काही कुठेतरी? स्पेनमधले

अरब, ऑस्ट्रेलियातील आणि अमेरिकेतील आदिवासी आज कुठे आहेत? ख्रिस्ती लोक युरोपीय ज्यूंची आज काय दशा करीत आहेत? एक दान करण्याची प्रथा वगळली तर युरोपात अशी आणखी कोणतीही पद्धत नाही की जी बायबलशी जुळेल, जी बायबलविरोधी नसेल. युरोपात जी काय उन्नती झाली आहे, ती सारी ख्रिस्तीधर्माला विरोध करून – ख्रिस्तीधर्माविरुद्ध बंड करून. आज जर युरोपात ख्रिस्तीधर्माला ती पूर्वीची सत्ता असती तर 'पाश्चर' आणि 'कोक'सारखे वैज्ञानिक जिवंत जाळले गेले असते. आणि डार्विनसारख्यांना सुळी देण्यात आले असते. आधुनिक युरोपात ख्रिस्ती धर्म आणि सभ्यता ह्या दोन अगदी विभिन्न गोष्टी आहेत. आपला जुनावैरी जो ख्रिस्तीधर्म, त्याचा धुव्वा उडविण्यासाठी आणि पाद्र्यांचा नायनाट करून त्यांच्या कब्ज्यातून शैक्षणिक आणि धर्मार्थ संस्था हिसकावून घेण्यासाठी (युरोपीय) सभ्यतेने आज कंबर कसली आहे. अज्ञानात पिचणारा बहुजन समाज नसता तर ख्रिस्ती धर्म आजचे आपले किळसवाणे जिणे क्षणभर टिकवून धरू शकला नसता, त्याचा अगदी समूळ नाश झाला असता; कारण शहरातील गरीब समाज आजही ख्रिस्ती धर्माचा सख्खा शत्रू आहे! करा आता याच्याशी इस्लामची तुलना. मुसलमान देशांतील समस्त प्रथा-पद्धती इस्लामी धर्मावर उभारलेल्या आहेत, तेथील धर्मगुरूंना राज्यातील अधिकाऱ्यांकडून खूप सन्मान मिळतो आणि इतर धर्मांचे गुरूही तिथे सन्मानित होतात.

पूर्व आणि पश्चिम

पाश्चात्त्य देशांवर सांप्रत लक्ष्मी आणि सरस्वती दोघींचीही कृपा आहे. केवळ भोगाच्या वस्तू जमवूनच ते थांबत नाहीत, तर सर्वच कामात एकप्रकारची सुबकता त्यांना हवी असते. खाणे-पिणे, घरदार सगळेच कसे सुबक असावे असे त्यांना वाटते. आमच्या देशातही हा भाव एकदा होता – ज्यावेळी देशात सुबत्ता नांदत होती त्या वेळी. आता एक तर दारिद्र्य आणि त्यापेक्षा म्हणजे आम्ही कसे 'इतो नष्टस्ततो भ्रष्टः होत आहोत. आमच्या जातीचे जे गुण आमच्या अंगी होते तेही लोपताहेत आणि पाश्चात्त्यांचेही आम्हां

काही अंगी बाणवत नाही! उठणे-बसणे, बोलणे-चालणे वगैरेंचे आमचे जुनेएक वळण होते. तेही नाहीसे झाले आहे अन् पाश्चात्त्य वळण अंगवळणी पाडून घेण्याचीही कुवत आमच्यात नाही. पूजापाठप्रभृती जे काय होतं त्याचं तर आम्ही विसर्जन केलं, पण त्याऐवजी कालोपयोगी एक नवीन प्रकारचं काही मात्र अजूनही आम्ही घडवून घेऊ शकलो नाही. ना धड हे ना धड ते अशी त्रिशंकूसारखी गत झाली आहे आमची आज. भावी बंगाल अजूनही आपल्या पायांवर उभा राहिलेला नाही. विशेष दुर्दशा झाली आहे आमच्या कलांची. आमच्या जुन्या म्हाताऱ्या बाया रांगोळ्या काढून घर आंगण सजवीत, भिंतींवर नाना सुरेख चित्रे काढीत, सुंदर तऱ्हेनं केळीची पानं कापीत, खाण्याच्या जिनसा त्यांवर केवढ्या चातुर्याने कलात्मक पद्धतीने वाढीत. ते सारं चुलीत गेलं आहे किंवा जात आहे झपाट्याने!! नवीन अर्थातच शिकायला हवं, करायला हवं, पण म्हणून काय जुनं आहे ते सारं नदीत नेऊन बुडवून टाकायचं की काय? नवीन तर शिकत आहेत डोंबलं! – नुसती वटवट! कामाची विद्या किंवा शास्त्र काय शिकला आहात सांगा बघू? अजूनही दूरच्या खेडेगावातील जुनं लाकडी काम, विटांचं काम बघून या एकदा. तुमचे शहरी सुतार एक दरवाजासुद्धा नीट करू शकत नाहीत – तो महालासाठी केला आहे की एखाद्या झोपडीसाठी, सांगणं कठीण!! अवजारं मात्र बघा त्यांची – विलायती अवजारांची रेलचेल नुसती. जणूकाही विलायती अवजारं बाळगणं म्हणजे सुतारकी! सर्व बाबतीत हाच प्रकार झालेला आढळत आहे. स्वत:चं म्हणून जे काही होतं ते सारं लयाला जात आहे आणि परक्यांपासून आम्ही शिकतो आहो फक्त बडबड! नुसती पुस्तकं वाचायची अन् बडबड करायची! आमचे बंगाली आणि विलायतेतील आयरीश - दोघांचीही एकच गत. नुसती बडबड करतील. वाचाळतेत या दोन्ही जाती खूप निष्णात!! कामाच्या नावाने पूज्य-अन् त्याहीवर ताण म्हणजे रात्रंदिवस एकमेकांच्या अंगावर गुरगुरायचं नि भांडाभांडी करत बसायचं!!!

स्वच्छता, नीटनेटकेपणा, सुबकता वगैरेंवर या (पाश्चात्त्य) देशांचा

इतका कटाक्ष की अगदी गरीबदेखील त्यांविषयी अवधान बाळगेल. आणि अवधान न बाळगून करतील काय – स्वच्छ जामानिमा असल्याखेरीज नोकरीसाठी त्यांना कुणी दाराशीदेखील उभं राहू देणार नाही. नोकर-चाकर, सैपाकी-आचारी सगळ्यांचे कपडेबिपडे कसे पांढरेपांढरे चक्क - केव्हाही बघा. घरंदारं झाडूनपुसून लख्ख. ह्या लोकांचा सगळ्यात मोठा दंडक म्हणजे ते वाटेल तिथे वाटेल ते कधी फेकणार नाहीत. सैपाकघर कसं झकपक असतं – भाजी चिरून राहिलेली सालपटंबिलपट एखाद्या डब्यात टाकतील, नंतर दूर घेऊन जाऊन ते सारे फेकण्यात येईल. अंगणातही टाकणार नाहीत, रस्त्यावरही फेकणार नाहीत.

ज्यांच्या गाठी पैसा आहे त्यांची घरंदारं तर अगदी प्रेक्षणीय असतात – केव्हाही बघा, चकचक करतात! त्यातच परत देशदेशान्तरीच्या तऱ्हेतऱ्हेच्या कलेच्या वस्तू गोळा करून खोल्या-दिवाणखाने सजविलेले आढळतील. आम्हाला सध्या त्यांच्यासारख्या कलासंग्रहाची गरज नाही; परंतु आहे ते सारे नष्ट होऊन राहिले आहे ते तरी वाचविण्याचा प्रयत्न करायला हवा की नाही? की तेवढाही नको? चित्रकलेत आणि शिल्पकलेत त्यांच्यासारखं व्हायला आम्हाला अजून बराच वेळ लागेल! या दोन कलेंत आमचं नेहमीच उणं. आमच्या देव-देवता साऱ्या बघा ना – जगन्नाथच जाणे!! फार फार तर त्यांची (युरोपियनांची) नक्कल करून एखादा रविवर्मा निपजतो!! त्याच्यापेक्षा आमच्या बंगालमधील दुर्गादेवीची प्रभावळ रंगविणारे आमचे गावराणी चितारी बरे – त्यांच्या कामात निदान चकचकीत रंग तरी असतात. त्या तुमच्या रविवर्माफर्म्यांची चित्रं बघून शरमेनं मान खाली घालण्याची पाळी येते!! त्यापरीस जयपुरी सोनेरी चित्रं अन् दुर्गादेवीची प्रभावळ कितीतरी छान. युरोपीय चित्रकला आणि शिल्पकला यांविषयी दृष्टान्तासहित पुढे केव्हातरी सांगेन. सध्या नको, कारण तो एक विशाल विषय आहे.

□□□

ज्यांच्या गाठी पैसा आहे त्यांची घरंदारं तर अगदी
प्रेक्षणीय असतात - केव्हाही बघा, चकचक करतात!
त्यातच परत देशदेशान्तरीच्या तऱ्हेतऱ्हेच्या कलेच्या वस्तू
गोळा करून खोल्या-दिवाणखाने सजविलेले आढळतील.
आम्हाला सध्या त्यांच्यासारख्या कलासंग्रहाची गरज नाही;
परंतु आहे ते सारे नष्ट होऊन राहिले आहे ते तरी वाचविण्याचा
प्रयत्न करायला हवा की नाही? की तेवढाही नको?

- स्वामी विवेकानंद

पूर्व आणि पश्चिम

(M-017) Purva Ani Paschim: